**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या एकूण तीन सूचना आलेल्या असून पहिली सूचना सान्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांची असून दुसरी नियम 289 अन्वयेची सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी यांची असून तिसरी नियम 289 अन्वयेची सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील, जैनुद्दीन जव्हेरी यांनी दिलेली आहे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या नियम 289 अन्वयेच्या सूचनेत असे म्हटले आहे की, "रायगड जिल्हयातील एका महाविद्यालयामधील प्राध्यापकाने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल काढलेले बदनामीकारक उद्गार, सदर प्राध्यापकाची कृती ही जेम्स लेन्सची पुनरावृत्ती असणे". त्यामुळे याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हा नियम 289 अन्वयेचा विषय कसा होतो, यांसदर्भात त्रोटक निवेदन करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची निंदानालस्ती करावी अशा प्रकारची गंभीर घटना घडलेली असून काही दिवसापूर्वी या सभागृहात जेम्स लेनच्या संदर्भात चर्चा झालेली आहे व त्यावेळी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी जेम्स लेनला व्हिसा मिळू नये यासंदर्भात उल्लेख केला होता. जेम्स लेनने छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात जो उल्लेख केला होता ती बाब इतकी निंदनीय होती की, केवळ महाराष्ट्रातच नव्हेतर संपूर्ण देशातील कुठलाही नागरिक छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भातील तो उल्लेख सहन करु शकणार नाही. जेम्स लेनचे प्रकरण ज्या पध्दतीने हाताळले गेले, ज्या पध्दतीने प्रकरणाला संरक्षण मिळाले, त्यासंदर्भात एक वेगळेच वातावरण निर्माण झाले. जेम्स लेनची याचिका सुप्रिम कोर्टात खारीज झाली होती त्यावेळी जेम्स लेनच्या प्रकरणाच्या संदर्भात शासन काय करणार आहे असा प्रश्न या सभागृहात उपस्थित झाला होता परंतु त्याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रात शिवछत्रपतींच्या संदर्भात कोणीही, काहीही बोलले तरी कोर्ट काही करु शकत नाही, शासन काही करु शकत नाही असे वातावरण निर्माण झालेले आहे. जेम्स लेनने छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात जो निंदनीय उल्लेख केला होता, जी निर्भत्सना

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

केली होती त्यांसदर्भात सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी रायगडमध्ये होती आणि त्याच रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यातील जनता शिक्षण मंडळातील एका प्राध्यापकाने वर्गामध्ये शिकवतांना जेम्स लेनने जे उद्गार काढले होते तशाच प्रकारचे उद्गार काढलेले आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा जपणारे विद्यार्थी जसे महाराष्ट्रात आहेत त्याचप्रमाणे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा वारसा जपणारे विद्यार्थी देखील या महाराष्ट्रात आहेत. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांबाबत प्राध्यापकाने अनुद्गार काढले त्यावेळी त्या विद्यार्थ्याने उभे राहून "छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अवमानास्पद उद्गार ऐकून घेणार नाही" असे प्राध्यापकाला सांगितले. त्यावर प्राध्यापकाने त्या विद्यार्थ्याला चूप बसण्यास सांगून पुढे बोलण्यास सुरुवात केली. या संदर्भात विद्यार्थ्याने रितसर तक्रार नोंदवून प्राध्यापकाबद्दल नापसंती व्यक्त केली म्हणून त्यास दोन दिवस वर्गात बसू दिले नाही. माझ्याकडे त्या विद्यार्थ्याने पत्र दिलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अवमानासंदर्भात कोणतीही बाब महाराष्ट्र सहन करणार नाही. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आजच्या कामकाजपत्रिकेतील सर्व कामकाज बाजूला ठेवून या संदर्भात प्रथम चर्चा घ्यावी. या संदर्भात फक्त चर्चा करुन चालणार नाही तर या प्रकरणातील इत्यंभू माहिती आली पाहिजे. भविष्यात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल कोणाचाही वाकडा डोळा खपवून घेणार नाही अशा प्रकरचा धाक शासनाला निर्माण करावा लागणार आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अवमानास्पद उद्गार काढल्यासंदर्भातील बातमी वर्तमानपत्रात आलेली आहे. रायगड जिल्ह्यातील प्रसिध्द वर्तमानपत्र " कृषीवल" या दैनिकात अग्रलेख आलेला आहे.

सभापती महोदय, त्या विद्यार्थ्याने दिलेले पत्र माझ्याकडे आहे. चर्चेच्या वेळी मी त्याचा सविस्तर उल्लेख करीन. आपण ते पत्र वाचू शकणार नाही, वाचण्यालायक नाही. ही अतिशय गंभीर घटना आहे. तेव्हा माझी आपणास नम्र विनंती आहे की,सभागृहात चर्चा करुन सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करण्यास परवानगी द्यावी. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अनुद्गार काढण्यास कोणीही धजावणार नाही असा धाक शासनाने निर्माण केला पाहिजे. तेव्हा आपण चर्चेला अनुमती द्यावी अशी मी पुन्हा एकदा विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये एका अतिशय गंभीर विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. जो महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने ओळखला जातो त्या महाराष्ट्रातच एका प्राध्यापकाने त्यांच्याबद्दल अनुद्‌गार काढले ही अतिशय दुर्दैवी अशी घटना आहे. संपूर्ण महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजास दैवत मानतो. तसेच संपूर्ण देशही शिवाजी महाराजांस दैवत मानतो. एका प्राध्यापकाने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अवमानकारक उद्‌गार काढून मराठी माणसाचे नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या भावनेला इजा पोहोचविण्याचे काम त्या दृष्ट प्राध्यापकाने केलेले आहे.

सभापती महोदय, काही महिन्यांपूर्वी जेम्स लेन या लेखकाने छत्रपती शिवाजी महाराजाबद्दल अवमानकारक लिखाण केले होते. त्या लिखाणाबद्दल संपूर्ण महाराष्ट्रात गदारोळ उठला होता. त्या संदर्भात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. परंतु ती याचिका फेटाळली गेली. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अशाप्रकारचे अनुद्‌गार काढण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना बदनाम करुन त्यांचा इतिहास पुसून टाकावा अशाप्रकारचा कट शिजतो की काय अशाप्रकारची शंका निर्माण होते.

सभापती महोदय, या महाराष्ट्रातील एक प्राध्यापक छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करण्याचे धाडस करतो ही अतिशय शरमेची बाब आहे. हे प्रकरण साधे नाही. त्या विद्यार्थ्याने दिलेले पत्र मी देखील वाचलेले आहे. अतिशय गंभीर स्वरुपाची तक्रार त्या विद्यार्थ्यांने केलेली आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा वारसा जपणारे या महाराष्ट्रात आहेत. त्या विद्यार्थ्याने प्राध्यापकास रोखण्याचा प्रयत्न केला, परंतु ते थांबले नाहीतच,

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

उलट त्यापुढे जाऊन थांबवण्याचा ज्यावेळी प्रयत्न केला गेला त्यावेळी त्या विद्यार्थ्याला वर्गाबाहेर घालविण्यात आले, त्याला वर्गात येऊ नकोस अशाप्रकारची तंबी दिली गेली. त्यामुळे अशाप्रकारे छत्रपती शिवरायांचा अवमान करणारा हा जो मग्रुर प्राध्यापक आहे, ती व्यक्ती नसून एक प्रवृत्ती आहे. त्या प्रवृत्तीस महाराष्ट्र शासनाने ठेचून काढले पाहिजे व पुन्हा छत्रपती शिवरायांबद्दल वाईट अर्थाने अनुद्गार काढणार नाहीत, यादृष्टीने कडक उपाययोजना केली पाहिजे. त्यामुळे याविषयी चर्चा होणे आवश्यक असून माझी विनंती आहे की, आपण याबाबतीतील चर्चेला वेळ कमी दिला तरी चालेल परंतु या याबाबतीत आपण सभागृहाच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत व या विषयी चर्चा झाली पाहिजे.

श्री.मुधकर सरपोतदार : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी एक अतिशय गंभीर बाब सदनासमोर मांडलेली आहे. परदेशी लोक अत्याचार आणि अन्याय तर करतातच, परंतु ज्यावेळी आमच्या देशातील व राज्यातील नागरिक जर आपल्या दैवताच्या विरोधात अशाप्रकारे अनुद्गार काढत असतील तर त्यावेळी याबाबतीत काय इलाज केला पाहिजे हा प्रश्न आपल्यासमोर येतो. खरे म्हणजे, या प्राध्यापकाच्याविरुध्द लोकांच्या भावना भडकाविल्याचा गुन्हा पोलीस स्टेशनमध्ये नोंदविला गेला पाहिजे. आमच्या महापुरुषांबद्दल, युगपुरुषांबद्दल असे अनुद्गार काढण्याचे त्याला काय अधिकार आहेत ? आज आपण या महापुरुषांच्या व युगपुरुषांच्या नावावर संपूर्ण महाराष्ट्राचा कारभार पाहत आहोत, ज्यांचा आदर्श आपण या महाराष्ट्रामध्ये जपलेला आहे आणि भविष्यातही जपणार आहोत, अशा महापुरुषांच्या विरुध्द असे उद्गार काढणे योग्य नाही. जेम्स लेन हा परदेशी असून त्याला देशात येऊ दिले जाणार नाही, त्याला पासपोर्ट किंवा त्याचे इतरही मार्ग बंद पडतील. तो येथे आला तरी त्याच्या तोंडाला काळे फासून त्याला परत पाठविण्याचे काम आम्ही करु. परंतु आमच्याकडीलच जेम्स लेन अशापध्दतीने जर उभे राहिले तर त्याला कशा स्वरुपाची सजा दिली पाहिजे, याबाबतीत आपण पाहिले पाहिजे. त्याला याठिकाणी राहण्याचा अधिकार राहता कामा नये. एका कॉलेजमधील प्राध्यापकाने अशाप्रकारचे वाईट काम केलेले आहे. आपण प्राध्यापक आहात, आपण विद्यार्थ्यांवर कोणते संस्कार केले पाहिजे हे तरी त्यांना समजले पाहिजे. माननीय प्रा.पुरके सर





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

आपण महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री आहात. या महाराष्ट्राच्या शिक्षण खात्यात काय शिकविले जाते ? त्याठिकाणी जर अशाप्रकारची संस्कार करणारी व्यक्ती जन्माला येत असेल तर त्याची जोडयानेच पुजा होऊ शकते. या माणसाला त्या संस्थेच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात व देशात कुठेही परत नोकरी मिळणार नाही अशाप्रकारचे पाऊल उचलून त्याच्या विरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. हा प्रश्न नुसती चर्चा करुन मिटणार नाही, याबाबतीत आपण कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळी येथे जेम्स लेनचा प्रश्न निघाला त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील जनतेने आवाज उठवून आपली प्रतिक्रिया व्यक्त केली होती. त्याबाबतीत सुप्रिम कोर्टानेही निर्णय दिला की, हा महाराष्ट्राचा प्रश्न असून महाराष्ट्र शासन याबाबतीत कोणतीही कारवाई करु शकते. परंतु महाराष्ट्र शासनाने ती कारवाई केलेली नाही. अशाप्रकारे जर कोणी आपल्या महापुरुषांच्याविरुध्द् अवैध, बेकायदेशीर व अपशब्द वापरत असेल तर त्याबाबतीत सरकारने कडक पाऊले उचलावयास पाहिजेत. जोपर्यंत आपण अशाप्रकारचे कडक पाऊल त्यांच्याविरुध्द् उचलत नाहीत तोपर्यंत कोणताही सोम्या-गोम्या उठून अशाप्रकारचे काम करीत राहील. त्यामुळे याबाबतीत माझी सरकारला सूचना आहे की, यासंदर्भात आपण त्या प्रवृत्तीचा प्रथम बंदोबस्त करावा, नाहीतर जनतेला बंदोबस्त करावा लागेल. त्यामुळे सरकारने याबाबतीत कडक भूमिका घेतली पाहिजे. माननीय डॉ.पतंगराव कदम साहेब, आपण कॅबिनेटमध्ये मंत्री म्हणून बसता. हा विषय आपल्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. आपण महाराष्ट्र शासनाचे एक मंत्री आहात, आपण भविष्यामध्ये जे स्पप्न पाहिलेले आहे, त्या दृष्टीकोनातून विचार करुन आपण याबाबतीत धाडसी पाऊल टाकावे व याबाबतीत जर अशाप्रकारे धाडसी पाऊल सरकार टाकणार नसेल तर त्यामध्ये आणखी दुसरी नामर्दकी कोणती असू शकेल ? याठिकाणी सगळे मंत्रिमंडळ आहे, माननीय शिक्षण मंत्री येथे आहेत, माननीय संसदीय कार्यमंत्री आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.रोझेकर...

श्री.मधुकर सरपोतदार....

कुठे आहे आपला अभिमान ? ही जी बातमी आली आहे, ती वस्तुस्थिती आहे, ताबडतोबीने क्लास बंद व्हावा, जे शिकविणे चालू आहे, ते बंद व्हावे, ही जी भूमिका एका विद्यार्थ्यांने पत्राव्दारे मांडली आहे, ती लोकमान्य टिळकांच्या वर्तनाला शोभणारी आहे. खरं म्हणजे, या विद्यार्थ्यांचा सत्कार व्हायला हवा. अशाप्रकारे महापुरुषांना अपमानित करणा-यांविरुध्द पेटून उठले पाहिजे. ही महाराष्ट्राची संस्कृती आहे व त्या संस्कृतिच्या स्वाभिमानाचा प्रश्न आहे, अस्मितेचा प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या दैवतांचा अपमान करणारे, महाराष्ट्राच्या अस्मितेला तडा जाईल, असे एखादे वाक्य जरी कुणी उच्चारले तरी त्यांना त्यांच्या पूर्वजांची आठवण करुन देण्याची गरज आहे. सभापती महोदय, आपणही यासंदर्भात कडक भूमिका स्वीकारुन याबाबतीतील निर्णय घ्यावा व चर्चा घडवून आणावी आणि या चर्चेच्या मागणीचा कृपया आपण स्वीकार करावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड :सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी एका गंभीर विषयाला तोंड फोडलेले आहे. गेल्या दशकात शिवप्रभूंचा इतिहास बदलण्याचे काम काही मंडळी करतात, असा जो मुद्दा सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडला, त्याला माझा पाठिबा आहे. भावनेच्या भरात त्या दिवशी काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, जेम्स लेनला व्हिसा देऊ नका. या जेम्स लेनने भांडारकर इन्स्टिटयूटच्या माध्यमातून इतिहास संशोधन केले. जेम्स लेन ब्रिटनमधून आला होता, त्याला आपला इतिहास काय माहीत ? आपल्याला हवा तसा इतिहास जेम्स लेनच्या तोंडात घालून पुस्तकात आणला गेला. जेम्स लेन हा ब्रिटनला राहिला तर महाराष्ट्राच्या दैवताचा इतिहास पुसण्याचे काम कुणी केले, हे आपल्याला कळणार नाही आणि त्यामुळे त्यांचे धैर्यही वाढेल. त्यामुळे जेम्स लेनचा व्हिसा रद्द करु नका, त्याला महाराष्ट्रात आणा, तो महाराष्ट्राचा गुन्हेगार आहे. जेम्स लेनला इतिहासाचे दाखले कुणी पुरविले ? जेम्स लेनचे चोचले कुणी पुरविले ? It is Jokingly said in Poona. असे म्हणून जेम्स लेन आपल्या पुस्तकाची सुरुवात करतो आणि आमच्या दैवतांचा अपमान करतो, हे त्याला कुणी सांगितले ? पुस्तकावर बंदी घातली असली तरी पुढे 20-30 वर्षांनी विद्यार्थी जेव्हा शिवप्रभूंवर पी.एच.डी.करतील त्यावेळी ते कदाचित याच पुस्तकाचा संदर्भ घेतील, त्यावेळी

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड..........

होणारा अपमान आपल्याला सहन होणार नाही. त्यामुळे शिवप्रभूंच्या बाबतीत जे चालू आहे ते महाराष्ट्राला शोभणारे नाही व त्यासाठी ही चर्चा करणे गरजेचे आहे. सर्व सभागृहाने त्वेषाने सांगितले की, जेम्स लेनला व्हिसा देऊ नका, पण मी विश्वासपूर्वक सांगतो की, त्याला व्हिसा द्या आणि त्याला या महाराष्ट्रात आणा. त्याला ही सर्व माहिती कुणी पुरविली, ते कोण होते, महाराष्ट्राच्या पोटात खंजीर कुणी खूपसला, त्यांना पकडा आणि सजा द्या. आपल्याच मातीतील माणसे आपल्याच पोटात खंजीर खूपसणार असतील तर तो जेम्स लेनचा दोष नाही, तो आपला दोष आहे. असे जे गद्दार आहेत त्यांना धडा शिकविण्याची वेळ आता आली आहे आणि त्यादृष्टीने ही चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी एक गंभीर बाब सदनासमोर आणली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी जी गोष्ट सांगितली त्याच्याशीही मी सहमत आहे. प्रश्न एका व्यक्तिचा नसून प्रवृत्तीचा आहे आणि अशी प्रवृत्ती ठेचून काढली पाहिजे. सन्माननीय सदस्य, श्री.जितेंद्र आव्हाड यांनी उल्लेख केला की, जेम्स लेन हा तथाकथित इतिहास संशोधक होतो आणि भांडारकर इतिहास संशोधन संस्थेने त्याला माहिती पुरविली. कुचेष्टेने त्यांनी काही बाबींचा उल्लेख आपल्या पुस्तकात केला. इतिहासाचा जाणुनबुजून विपर्यास करण्याचा प्रयत्न सातत्याने काही मंडळी करीत आहेत. महापुरुषांवर येथील जनतेची नितांत श्रद्धा आहे. अशा दैवतांचा अपमान करण्याचा प्रयत्न जाणुनबुजून काही मंडळी करीत आहेत आणि ही मंडळी कोण आहेत, हे सर्वांना माहीत आहे. या सगळयांना दुरुस्त करण्याचे काम, ठेचून काढण्याचे काम, केले पाहिजे. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांचे मी यासाठी अभिनंदन करतो की, त्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. जेम्स लेन प्रकरणावर ज्यावेळी सभागृहात चर्चा झाली त्यावेळी ज्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या, त्या महाराष्ट्राच्या भावना होत्या. त्यावेळी जेम्स लेनविरुद्ध आगडोंब उसळला होता, सर्वसामान्य माणसांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या, त्या प्रतिक्रियेमध्ये भांडारकर इन्स्टिटयूटला थोडी हानी पोहोचली. त्यावेळी जेम्स लेनची माफी मागणारी आणि जेम्स लेनला माफी देणारी मंडळी देखील या महाराष्ट्रात होऊन गेली. खरं तर त्यांनी महाराष्ट्राचा अपमान केलेला आहे. ही माफी

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...........

मागणारी मंडळी कोण आहेत, जेम्स लेनला माहिती देणारी मंडळी कोण आहेत, याची चौकशी झ ाली पाहिजे, भांडारकर इन्स्टिटयूटची चौकशी झाली पाहिजे आणि भांडारकर इन्स्टिटयूट शासनाने ताब्यात घेतली पाहिजे, अशी या निमित्ताने मी मागणी करतो. या प्रस्तावावर सखोल चर्चा झाली पाहिजे, अशीही मी मागणी करतो.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विधानपरिषद नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, ब्रिटिश राज्यकर्त्यांनी त्या कालखंडामध्ये एका अत्यंत वाईट मार्गाचा वापर केला. भारतीयांचे मानबिंदू अवमानीत करुन भारतीयांमध्ये न्युनगंडाची भावना कशी निर्माण होईल, यासाठी त्यांचे इतिहासकार आणि त्यांच्या नेत्यांनी स्वातंत्र्य काळामध्ये कोणते उद्‌गार काढले, लोकमान्य टिळकांबद्दल कोणते उद्‌गार काढले, पंडित जवाहरलाल नेहरु यांच्याबद्दल कोणते उद्‌गार काढले हे सांगण्याची आवश्यकता नाही. भारतीयांचा मानभंग करण्याची त्यांची योजना होती. आज काय झालेले आहे, रायगड जिल्हयातील एका महाविद्यालयामधील प्राध्यापकाने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जे बदनामीकारक उद्‌गार काढले ते वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहेत. यासंदर्भात सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. परंतु ती चर्चा होत असतांना शासनाकडून याबाबतीत काय चौकशी झाली, चौकशी केली किंवा नाही, जे आरोप आहेत ते अपराध म्हणून समोर आले पाहिजेत, तरच त्याला न्याय देण्यासारखे हाईल. आम्हाला शासनाची नेहमीची पद्धत नको आहे. आपल्या मानबिंदूचा भंग करण्यामागे काही योजना आहेत काय ? याची चौकशी झाली पाहिजे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दिलेल्या 289 च्या प्रस्तावावर चर्चा झ ाली पाहिजे. शासनाने हा विषय गांभीर्याने घेऊन खुलासा केला पाहिजे, अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 चे एकूण तीन प्रस्ताव आलेले आहेत. ते प्रस्ताव मांडण्यास मी परवानगी देतो. यानंतर सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी यांनी विधानपरिषद नियम 289 चा प्रस्ताव दिलेला आहे. "डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर येथे शिक्षण घेणा-या डॉ.दिग्विजय पाटील यांनी प्राध्यापकाच्या जाचाला कंटाळून केलेली आत्महत्या" यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी त्यांचे म्हणणे मांडावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, विधानपरिषद नियम 289 च्या प्रस्तावावर आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी प्रथम आपल्याला धन्यवाद देतो. सभापती महोदय, एक अत्यंत गंभीर विषय मी सभागृहामध्ये मांडत आहे. रॅगिंगचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांचे रॅगिंग होण्याचे प्रकार आजही मोठया प्रमाणावर सुरु आहेत. रॅगिंगचे प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणत्याही प्रकारची कठोर उपाययोजना न केल्यामुळे आज रॅगिंगचे प्रकार होत आहेत. डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर येथे शिक्षण घेणा-या डॉ.दिग्विजय पंढरीनाथ पाटील या विद्यार्थ्याला परवा संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आणि त्यामध्ये सहभागी असलेल्या प्राध्यापकांनी जे रॅगिंग केले, त्याच्यावर जे अत्याचार केले, छळ केला, त्रास दिला म्हणून शेवटी कंटाळून त्या विद्यार्थ्यांने आत्महत्या केली. हे शाळकरी विद्यार्थ्याचे रॅगिंग नाही. एम.बी.बी.एस. झालेला हा मुलगा पदव्युत्तर शिक्षण घेत होता. पदव्युत्तर शिक्षण घेत असलेला एक डॉक्टर आत्महत्या करतो, म्हणजे त्याचा किती भयानक स्वरुपाचा छळ केला गेला असेल, रॅगिंग केले गेले असेल, हे यावरुन दिसून येते. आत्महत्या करण्यापूर्वी त्या विद्यार्थ्याने एक चिठ्ठी लिहून ठेवली होती, त्या चिठ्ठीमध्ये त्याने काही महिला डॉक्टरांचा सुध्दा उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते .....

काही विद्यार्थी, डॉक्टर व प्राध्यापकांनी त्यास त्रास दिला आहे, त्याचा छळ केला आहे, हे सर्व असहय झाल्यामुळे त्या विद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे म्हणून हा विषय अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. सर्वोच्च न्यायालनाने अनेक वेळा याबाबत आदेश दिलेले आहेत. याबाबत नुकताच दिनांक 16 जुलै रोजी एक आदेश दिलेला आहे. तरीही शासनाने कोणत्याही उपाययोजना केलेल्या नाहीत. अशा प्रकारच्या गंभीर घटना महाराष्ट्रात घडतच आहेत. महाराष्ट्रामध्ये परदेशातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत आहेत. महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रामध्ये व सर्व पालकांमध्ये अत्यंत भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. विद्यार्थ्यांमध्येसुध्दा असुरक्षिततेचे व भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. हा गंभीर विषय विचारात घेऊन यावर सभागृहात चर्चा व्हावी, अशी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, रॅगिंग हा प्रकार महाराष्ट्रामध्ये खूप गती घेत आहे. या संदर्भात न्यायालयाने आदेश दिले असून मार्गदर्शन केलेले आहे. शिक्षण क्षेत्रात काम करणारी मंडळी माझ्या समोरच्या बाकावर बसली आहेत त्यांनी गांभीर्याने याची नोंद घेतलेली दिसत नाही. आपण महाराष्ट्र शासनामध्ये बसलेले आहात. महाराष्ट्र शासनाला रॅगिंगबद्दल गांभीर्याने विचार करुन निर्णय घेण्याची कोणतीही सुबुध्दी परमेश्वराने दिलेली नाही असे मला नाईलाजाने म्हणावे लागत आहे. मेडीकलचे पदव्युत्तर शिक्षण घेणारा विद्यार्थी रॅगिंगच्या जाचाला कंटाळून आत्महत्येला प्रवृत्त होऊन आत्महत्या करतो म्हणजे याचे कारण किती गंभीर असेल ? शिक्षण खात्यामध्ये कशा पध्दतीची पावले पडत आहेत त्याचे हे दुसरे उदाहरण आहे. पहिले उदाहरण छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अतिशय हीन प्रकारचे उद्‌गार काढल्याबद्दलचे आहे. त्याच्या पाठोपाठ शिक्षण क्षेत्रातील रॅगिंगचे प्रकरण आले आहेत. याचा अर्थ असा आहे की, ज्या क्षेत्रामध्ये संस्कार करावयाचे, ज्या संस्कारातून मुले पुढे जायची, स्वत:च्या जीवनाला दिशा द्यायची, त्या क्षेत्रामध्ये काय गोंधळ चालू आहे ? हे तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. विकृतीतून निर्माण झालेली प्रवृत्ती कशी वाढत आहे व पोसली जात आहे, याबाबत महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण खाते, उच्च शिक्षण व इतर संबंधित खाते कधी लक्ष देणार आहे ? हा विषय वैद्यकीय शिक्षण खात्याशी संबंधित आहे. हे खाते कधी लक्ष घालणार आहे ? या गोष्टी कधी थांबणार आहेत ?

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार .....

महाराष्ट्र शासन असहाय झाले आहे काय ? कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्यासाठी असमर्थ बनले आहे का ? असा त्याचा अर्थ होऊ शकतो का ? महाराष्ट्र शासन असहाय बनले असेल, अतिशय बेजबाबदारपणे वागणार असेल, अशा प्रकारच्या लोकांवर कायदेशीर नियंत्रण नसेल तर ते योग्य नाही. अशा प्रकारचे कोणतेही बंधन व भिती लोकांना वाटत नसेल तर ती महाराष्ट्राची शोकांतिका आहे. महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकावरील राज्य आहे असे प्रत्येकवेळी बोलले जाते. प्रत्येक मुलाखतीत व पत्रकार परिषदेत बहुतेक मंत्री महोदय हेच सांगत असतात की महाराष्ट्र हे प्रगतीशिल राज्य आहे. अशा प्रकारे मेडीकलच्या विद्यार्थ्याने रॅगिंगमुळे स्वत:हून आत्महत्या केली असेल तर हे प्रगतिशील राज्याचे लक्षण आहे का ? हा प्रश्न मला विचारावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी हा विषय मांडल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. हा विषय तितकाच महत्वाचा असून तो चर्चेला यावा, अशी मी विनंती करतो.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.कपिल पाटील, जयंत प्र.पाटील, जैनुद्दीन झवेरी, वि.प.स. यांनी "जानकीदेवी हायस्कूल अंधेरी येथे पोहोण्याच्या तलावात बुडून मुलाचा मृत्यू" झाल्यामुळे नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधी सूचना दिलेली आहे. यापैकी एका सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, गेल्या आठवडयामध्ये अंधेरी येथील जानकीदेवी हायस्कूलमध्ये पोहण्याच्या तलावात एका मुलाचा बुडून मृत्य झाला आहे. शाळेमध्ये कोणतीही सुरक्षा यंत्रणा नव्हती. शाळेने त्याच्या आईलाही कळविण्याचे सौजन्य दाखविले नाही, त्यामुळे मुलाचा जीव वाचला नाही.

सभापती महोदय याबाबत 289 चा प्रस्ताव देण्यामागे माझा उद्देश हा आहे की, अशा प्रकारची ही दुसरी घटना आहे. केशवसृष्टीमध्ये दोन वर्षापूर्वी अशा प्रकारची घटना घडली होती. तामिळनाडूमध्ये जळीत प्रकरण झाल्यानंतर केंद्र सरकारने सर्व राज्यांना सूचना दिल्या होत्या.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

की, मुलांच्या, शाळांच्या सुरक्षिततेसोठी उपाय योजना केली पाहिजे. परंतु या दृष्टीने कोणतीही व्यवस्था अजून झाल्याचे दिसत नाही. साधी प्रथमोपचाराची पेटी देखील शाळांमध्ये नसते वा अन्य कोणत्याही प्रतिबंधक उपाय योजनाही केलेल्या नसतात. आज शाळांच्या इमारती 8 ते 10 मजल्यांच्या उभ्या राहतात पण अशा इमारतींमध्येही सुरक्षिततेच्यादृष्टीने कोणतीही व्यवस्था असत नाही. 50 वर्षांहून अधिक जुन्या इमारतींमध्येही अनेक शाळा आहेत आणि त्या शाळांच्या इमारतींची अवस्था पाहिली तर ती इमारत केव्हाही कोसळ शकेल अशी असते. त्यातील शेकडो मुलांचे जीव त्यात टांगणीला लागतात. तीच गोष्ट शाळांमध्ये ने-आण करणाऱ्या स्कूल बसेसची आहे. त्यांच्या बाबतीत देखील त्यात बसणाऱ्या मुलांच्या सुरक्षिततेत्यादृष्टीने कोणतीही यंत्रणा वा व्यवस्था केलेली नसते. इतकेच नाही तर ॲटो रिक्षांतून शाळकरी मुलांची ने-आण केली जाते त्यावेळी देखील एका रिक्षामध्ये चार मुलांपेक्षा अधिक मुले बसविता कामा नयेत असे असताना 15-15, 20-20 मुले रिक्षामध्ये बसविली जातात आणि अशा रिक्षांचे, बसेसचे अपघात होऊन अनेक मुले जायबंदी होतात, प्रसंगी मृत्यूमुखी पडतात. अशा घटना गेल्या 2-4 वर्षांमध्ये अनेक झाल्या आहेत व होत आहेत. म्हणून या अत्यंत संवेदनशील, लहान शाळकरी मुलांच्या जीविताचा प्रश्न ज्यात गुंतलेला आहे अशा विषयासंबंधात या ठिकाणी प्राथम्याने चर्चा होणे आवश्यक आहे यासाठी म्हणून मी नियम 289 खाली प्रस्तावाची सूचना आपणाला दिली आहे, आपण ती स्वीकारावी आणि या विषयावर तातडीने चर्चा घडवून आणावी अशी मी आपणास विनंती करतो.

**सभापती** : माझ्यासमोर आज नियम 289 खाली एकंदर तीन प्रस्ताव आहेत. त्यापैकी पहिला प्रस्ताव हा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेला असून त्यावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंगजी फुंडकर, ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, प्रा.बी.टी.देशमुख, श्री. जितेंद्र आव्हाड आणि श्री.कपिल पाटील यांनी या प्रस्तावाबाबतचे महत्त्व येथे विशद केलेले आहे. नियम 289 खाली दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते, श्री.संजय केळकर आणि श्री.श्रीकांत जोशी यांनी दिलेला आहे तर तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, श्री.जयंत पाटील आणि श्री.जैनुद्दिन जव्हेरी यांनी दिलेला आहे. या तिन्ही प्रस्तावांच्या बाबतीत तांत्रिकदृष्ट्या विचार केला आणि आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर असणारे विषय पाहता हे तिन्ही प्रस्ताव नियम 289 च्या कसोटीमध्ये बसू शकत नाहीत.

...... जी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

यातील पहिला प्रस्ताव, जो सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि अन्य सदस्यांनी दिला आहे त्याबाबतीत मी सांगेन की, येथे उपस्थित मंत्री महोदय, ना. डॉ. पतंगराव कदम आणि संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी याबाबत शासनाचे म्हणणे काय आहे, शासनाची भूमिका काय आहे हे सांगितले तर बरे होईल.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रश्न नियम 289 च्या माध्यमातून येथे उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत शासन निश्चितपणे येथे निवेदन करील आणि त्याप्रमाणे पुढील कारवाई देखील करील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केवळ निवेदन देऊन काय होणार आहे आणि यावर निवेदन तरी कशासाठी ? ...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, संसदीय कार्य मंत्र्यांनी याबाबत त्यांचे मत काय आहे ते सांगितले आहे, मात्र त्यांचे ते मत आणि आपण सर्वांनी या विषयी येथे व्यक्त केलेल्या भावना लक्षात घेऊन शेवटी मी याबाबत निर्णय घेणार आहे हे आपण लक्षात घ्यावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, त्या दिवशी देखील हा विषय येथे उपस्थित झाला हाता तेव्हा सर्व सभागृहाने सांगितले होते की, जेम्स लेन हे भारतात येऊ पाहत आहेत मात्र अशा व्यक्तीला येथे येण्यासाठी भारत सरकारने व्हिसा देऊ नये आणि त्या दृष्टीने राज्य सरकारने केंद्र सरकारला पत्र पाठवून कळवावे.... सभागृहाच्या भावना केंद्र सरकारला कळवाव्यात ...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांना सांगू इच्छितो की, त्यांनी खाली बसावे, मी त्यांना बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही... मी आपणा सर्वांनाच सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी नियम 289 खाली दिलेला प्रस्ताव अत्यंत गंभीर अशा विषयासंबंधात आहे. महाराष्ट्राचे दैवत असलेल्या शिवछत्रपतींच्या चरित्राच्या अनुषंगाने त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याची प्रवृत्ती महाराष्ट्रात कोणत्या ना कोणत्या पद्धतीने डोके वर काढत आहे ती वेळीच रोखणे हे आपले काम आहे. त्याबद्दल आता येथे माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे शासन याबाबत संपूर्ण चौकशी करील. शिक्षण विभाग असेल, उच्च शिक्षण विभाग असेल त्यांच्यामार्फत ही चौकशी शासनाने करावी तसेच गृहविभागाच्या मार्फत देखील चौकशी व्हावी. या प्रस्तावाच्या संबंधात सन्माननीय सदस्य श्री.रावते आणि दोन्ही बाजूंच्या

....... जी 3 ...



KBS/MAP/SBT. श्री. गागरे नंतर--- 13:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

अन्य सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना येथे मांडल्या आहेत त्या लक्षात घेऊन मी या विषयावर एक तासाची चर्चा देण्याचे ठरविले आहे. आता ती चर्चा केव्हा घ्यायची ते आपण ठरवू. मात्र या विषयावर एक तासाची चर्चा मी आपल्याला देणार आहे, हे आपण लक्षात घ्यावे.

( यानंतर श्री. सरफरे ..... एच 1 ...

--

+

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण दिलेल्या आदेशानुसार शासनाच्या वतीने सभागृहामध्ये निवेदन करण्यात येईल व चर्चेला उत्तर देण्यात येईल.

**सभापती** : त्याचप्रमाणे माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची जी सूचना दिली आहे त्या सूचनेतील विषय गंभीर आहे. त्या अनुषंगाने या संपूर्ण प्रकरणाची वैद्यकीय शिक्षण विभाग व गृह विभागामार्फत चौकशी करण्यात यावी. आणि या अत्यंत गंभीर असलेल्या प्रकरणासंबंधी शासनातर्फे एक-दोन दिवसात म्हणजेच उद्या किंवा परवा निवेदन करण्यात यावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी देखील शासनातर्फे उद्या निवेदन करण्यात येईल.

**सभापती** : त्याचप्रमाणे माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील, जैनुद्दीन झ ावेरी यांनी "एका सहा वर्षाच्या मुलाच्या झालेल्या दुर्दैवी मृत्यूबाबत" नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. ही सूचना मी स्वीकारीत नसून या संबंधी शासनातर्फे निवेदन करण्यात यावे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर हे मघाशी सहज बोलले की, माननीय सदस्यांकडून काही विषय नियम 93 अन्वये उपस्थित करता येऊ शकतात, त्याऐवजी नियम 289 अन्वये उपस्थित केले जातात. या संदर्भात मी माझ्या दालनामध्ये आपणाबरोबर चर्चा करीन. आणि माननीय सदस्यांकडून देण्यात आलेला एखादा प्रस्ताव नियम 289 अन्वये होत नसेल तर त्याला माझ्या दालनामध्ये अनुमती नाकारणे अधिक उचित होईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्यांकडून नियम 289 चा आधार घेऊन सूचना दिली जाण्याचे कारण असे की, नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचनेची शासनाकडून गंभीरपणे दखल घेतली जात नाही. व त्या सूचनेवर शासनाकडून लवकर निवेदन करण्यात येत नाही. त्यामुळे माननीय सदस्य आपले प्रश्न वेगवेगळया मार्गानी उपस्थित करतात.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेवर आपण निदेश दिल्यानंतर शासनातर्फे त्याची गंभीरपणे दखल घेतली जाते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेवर आपण निदेश दिल्यानंतर शासनाकडून त्या सूचनेबाबत गंभीरपणे दखल घेतली जात नाही हे माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर नाही. सभागृहाच्या कामकाजामध्ये चुकीची नोंद होऊ नये याकरिता मी सांगू इच्छितो की, आपण निदेश दिल्यानंतर शासनातर्फे नियम 93 च्या सूचनेवर निवेदन केले जाते.

**सभापती** : माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, यापूर्वीच्या अधिवेशन काळातील परिस्थिती यावेळी बदलण्याचा आपण कसोशीने प्रयत्न केला आहे. सभागृहामध्ये एकावेळी 20 निवेदने मांडण्यात आलेली आहेत. त्यामुळे सभागृहाच्या कामकाजामध्ये चुकीची नोंद होऊ नये अशी मंत्रिमहोदयांची इच्छा आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण शासनाला निदेश दिल्यानंतर शासनाकडून तीन दिवसात निवेदन करण्यात आले पाहिजे. परंतु तसे होत नसल्यामुळे माननीय सदस्य अन्य मार्ग अवलंबितात.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माझी आपणामार्फत सदनाला विनंती करावयाची आहे की, एका माननीय सदस्यांकडून नियम 93 अन्वये सूचना किती वेळा उपस्थित करावयाच्या? याचा सुध्दा आपण विचार केला पाहिजे. आणि म्हणून निश्चितपणे.....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जर गंभीर आणि महत्वाचे प्रश्न उपस्थित होत असतील तर ते मांडण्याचा आम्हाला अधिकार आहे...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, नियम 289 अन्वये तीन प्रस्ताव माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये मांडले व त्यावर आपण शासनाला निदेश दिले. वास्तविक पहाता, माननीय सदस्यांकडून उपस्थित करण्यात आलेले विषय नियम 93 अन्वये उपस्थित करता आले असते. नियम 289 मधील तरतूद आपण वाचली तर त्यामध्ये एक्स्ट्रा ऑर्डिनरी सर्कमस्टंसेस अशाप्रकारे तातडीची गरज आहे. अशा गरजेच्या वेळी नियम 289 चा आपण अवलंब करु शकता. नियम 93 खालील सूचनेकरिता नियम 289 मधील परिणामकारक संसदीय आयुधाचा वापर करुन सभागृहापुढील सर्व कामकाज सस्पेंड करुन चर्चेला अनुमती मागणे योग्य नाही. त्यामुळे मांडण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी एकही प्रस्ताव नियम 289 च्या तरतुदीमध्ये बसत नसून जास्तीत जास्त शासनाकडून त्यावर निवेदन मागता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अडथळा)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांकडून आम्ही सभागृहापुढे मांडलेल्या प्रस्तावावर आपण निर्णय दिल्यानंतर त्या प्रस्तावाच्या मेरिटबद्दल बोलणे आणि आपण दिलेल्या निर्णयासंबंधी भाष्य करणे अजिबात बरोबर नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (पुढे सुरू....

289 च्या प्रस्तावाबाबत सभागृहामध्ये भावना व्यक्त केलेल्या आहेत. .... (अडथळा).... सभापती महोदय. महाराष्ट्राच्या शिवछत्रपतींबद्दल, मुलांच्या जीवितांबद्दलच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांना लहान मुलांबद्दल काळजी नसेल तर ते मान्य करू शकतो, परंतु त्यांची सभागृहाला काळजी आहे....

**सभापती** : अजून पश्नोत्तराच्या तासाला सुरुवात झलेली नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी 289 अन्वये प्रस्ताव दिलेला होता, त्यावर मला माझे म्हणणे मांडण्यास परवानगी दिली. त्यानंतर प्रथेप्रमाणे रॅगिंगच्या संबंधातील प्रस्ताव आणि तलावात झालेल्या मृत्यूसंबंधीचा प्रस्ताव असे दोन प्रस्ताव आलेले होते. सभागृहाचे असे मत आहे की, यामधील काही विषय हे 93 च्या सूचनेद्वारे मांडता आले असते. परंतु येथे अशाप्रकारे प्रस्ताव आले तर त्या विषयाचे गांभीर्य निघून जाईल. सभापती महोदय, माझ्या प्रस्तावावर मला माझे म्हणणे मांडण्यास अनुमती दिली. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकणी यांनी नियमाचे पुस्तक दाखवून हे प्रस्ताव नियमामध्ये बसत नसल्याचे सांगितले. मी माझ्या प्रस्तावावर भावना व्यक्त केल्या आणि आपण त्या संदर्भात निर्णय दिला. त्या संदर्भात सन्माननीय सदस्य सहमत नाहीत काय ? छत्रपती शिवरायांचा अवमान हा विषय नियम 93 च्या सूचनेद्वारा मांडायला पाहिजे होता, असे सन्माननीय सदस्यांचे मत आहे काय ?

**सभापती** : मी माझा निर्णय दिलेला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 93 आणि नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावासंबंधात उल्लेख करण्यात आलेला आहे, त्यावर मला बोलायचे आहे.

सभापती महोदय, या नियमांच्या संबंधात उल्लेख करून सन्मानीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी आपले मत मांडले. त्यांच्या एका मताशी मी सहमत नाही. आज आपल्याकडे नियम 289 अन्वये तीन प्रस्ताव आलेले होते. हे तिन्ही प्रस्ताव नियम 289 मध्ये बसणारे नाहीत, असे विधान त्यांनी केलेले आहे. त्या विधानला माझा विरोध आहे. सन्माननीय सदस्यांना मला विचारावयाचे आहे की, सार्वजनिक विषयाचे महत्व हे सर्वसामान्य जनतेवर ज्या गोष्टींमुळे परिणाम होऊन प्रक्षोभ निर्माण होऊ शकतो, ही सार्वजनिक महत्वाची गोष्ट नाही काय ? असे विषय 289 अन्वये मोडत नाहीत, अशाप्रकारचे धाडशी विधान सन्माननीय सदस्यांनी केले, याचा मला खेद



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू.....

वाटतो. दुसरे असे की, नियमामध्ये जी तरतूद आहे, त्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, "कोणत्याही सदस्यास विधनपरिषदेपुढील एखाद्या विशिष्ट प्रस्तावाबाबत कोणताही नियम तहकूब करावा असा, सभापतीच्या संमतीने प्रस्ताव मांडता येईल आणि जर प्रस्ताव संमत झाला तर, संबंधित नियम त्यावेळेपुरता तहकूब होईल." सभापती महोदयांची परवानगी घेऊनच प्रस्ताव मांडलेला आहे, सभापती महोदयांची परवानगी न घेता तो मांडलेला नाही. अशाप्रकारे नियमांचा विपर्यास होईल, लोकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण होईल, अशाप्रकारे सदस्यांनी बोलणे अपेक्षित नाही, हे मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे.

दुसरे असे की 93 च्या सूचनेसंबंधात सांगण्यात आले. नियम 93 ची किंमत कमी करायला आपणही थोडे जबाबदार आहोत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

त्याचे कारण असे आहे की, तो स्थगन प्रस्ताव आहे. स्थगन प्रस्तावाचे जे गांभीर्य आहे ते आपण कमी करतो. कोणत्या विषयावर आपण स्थगन प्रस्ताव द्यावयाचा याचे एक अनन्यसाधारण महत्व आहे. बारीकसारीक गोष्टीवर स्थगन प्रस्ताव दिल्यानंतर जो प्रस्ताव सदनासमोर मांडला जात नाही त्यावर निवेदन केले जाते. त्या निवेदनावर एक दोन प्रश्न विचारले जातात आणि निवेदन बाजूला केले जाते. त्यातून फक्त शासनाची प्रतिक्रिया कळते. इतर माध्यमातूनही ती प्रतिक्रिया आपण शासनाकडून काढू शकतो. परंतु नियम 93 ची किंमत सन्माननीय सदस्यांनी कमी करु नये असे माझे स्पष्ट मत आहे. माझी सर्व सहकाऱ्यांना एकच विनंती आहे की, नियम 93 चा विषय अतिशय महत्वाचा आहे. आपण विषयाचे गांभीर्य लक्षात घ्यावे. त्याचे सार्वजनिक महत्व विचारात घ्यावे. तो किती तोलामोलाचा प्रश्न आहे, त्याची जनमानसामध्ये काय प्रतिक्रिया उमटू शकते याचा विचार करावा. कोठे बलात्कार झाला, कोठे अपघात झाला, कोणी नदीत बुडाला हे सार्वजनिक महत्वाचे विषय होऊ शकत नाहीत. यादृष्टीकोनातून हे गांभीर्य सर्व सदस्यांनी ओळखले पाहिजे असे माझे स्वत:चे स्पष्ट मत आहे. एवढेच मला अतिशय विनम्रपणे नमूद करावयाचे आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो मुद्दा मांडला त्याच्याविषयी गैरसमज होऊ नये एवढ्याच दृष्टीने मी बोलतो. ज्याबाबतीत नियम 289 अन्वये परवानगी घेतली तो विषय आपल्यासमोर मांडण्यात आल्यानंतर तो विषय त्या ठिकाणी संपतो. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यातील जो एक भाग होता त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे की, नोटीसवर चर्चा असेल तर या ठिकाणी काहीतरी पदरात पडते. 93 ची सूचना एक तास अगोदर त्यांच्याकडे जाते आणि Shorter the Notice, greater the strain on the entire machinery हा त्याचा साधा नियम आहे. सदस्य, सभापती आणि त्यांचे कार्यालय, मंत्री आणि त्यांचे कार्यालय यांच्या दृष्टीने Shorter the Notice, greater the strain असे आहे. म्हणून नियम 93 चा जो रिलीफ आहे तो एक तासाच्या नोटीसने गरगर फिरतो आणि त्या दिवशी फक्त हे ॲडमिट करावे की करु नये याबाबतचे हिअरींग घेणे एवढा भाग राहतो. याचे जे गांभीर्य आहे ते विचारात घेऊन त्याचा वापर करावा हे सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे होते. डाव्या बाजूच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT

प्रा. बी. टी. देशमुख .....

सन्माननीय सदस्यांनीही तेच सांगितले आहे. नियम 289 ही वेगळी गोष्ट आहे. एक्स्ट्राऑर्डिनरी परिस्थितीमध्येच तो नियम वापरला जातो. प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याचा प्रस्ताव त्यामध्ये असतो. ही गोष्ट आपण लक्षात घ्यावी. मी या मताशी पूर्णपणे सहमत आहे की, विदाऊट नोटीस चर्चा झाली तर त्याचा काही उपयोग होत नाही. प्रश्नामध्ये सुध्दा अनेकदा माननीय मंत्रिमहोदय असे म्हणतात की, I would require a notice. ज्याची नोटीस दिली जाते तो मुद्दा नसेल तर आपण असे म्हणता की, बरोबर आहे, हे आपल्याला विचारता येणार नाही. अनेकदा आपण असे म्हणता की, यामध्ये याचा उल्लेख आहे, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे. जर नियम 93 ची शॉर्टर नोटीस असेल तर तिचा मान व्हावा. अगोदर नोटीस देणे शक्य नव्हते अशी परिस्थिती असेल तरच ते व्हावे आणि त्या नियमाची कोटेकोपणे अंमलबजावणी व्हावी. नियम 289 चा वापर अपवाद म्हणूनच केला जावा या सन्माननीय सदस्यांच्या विचाराशी मी सहमत आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, गेल्या वर्षी सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते साहेब यांनी या सभागृहामध्ये नियम 289 अन्वये जो एक प्रस्ताव मांडला होता त्यावेळी मी नियम 289 अन्वये कोणता प्रस्ताव होऊ शकतो आणि कोणता होऊ शकत नाही यासंदर्भात हरकत घेतली होती. त्यावर चर्चा झाली होती. आज पुन्हा त्यावर चर्चा होत आहे आणि ही चर्चा होत असताना या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय ॲड. गुरुनाथ कुलकर्णीसाहेब यांच्या वक्तव्याबद्दल आक्षेप घेऊन काही भावनिक प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आदर नाही अशी कोणतीही व्यक्ती महाराष्ट्रात शोधून सापडणार नाही. ज्यावेळी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांच्या बाजूचे सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड बोलण्यासाठी उभे राहिले त्यावेळी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांना त्यांच्या बोलण्याबद्दल आक्षेप वाटला असता, या प्रस्तावाबद्दल आक्षेप वाटला असता तर त्यांनी सन्माननीय सदस्यांना थांबविले असते. त्यांनी तसा कोणताही प्रकार केलेला नाही. त्यामुळे त्यांचा या प्रस्तावाला पाठिंबा आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. नियम 289 चा कशा पध्दतीने गैरवापर केला जातो याबाबतीत सर्वांचे एकमत आहे त्यामुळे त्यावर मी जास्त भाष्य करीत

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT

श्री. भास्कर जाधव .....

नाही. परंतु नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात भाष्य करावेसे वाटते. या ठिकाणी वापरावयाच्या प्रत्येक आयुधाच्या बाबतीत कालमर्यादा ठरलेली आहे. 30 दिवसाच्या आत प्रश्न द्यावयाचा, प्रश्न देण्याची मुदत संपल्यानंतर एखादी घटना झाली तर लक्षवेधी सूचना द्यावी असा नियम आहे. तशाच पध्दतीने सभागृहाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर नियम 93 अन्वये सूचना द्यावयाची असते. त्याचा अर्थ असा की, जी घटना तात्काळ घडलेली असते, ज्या घटनेकडे शासनाने तात्काळ लक्ष देणे आवश्यक असते अशी घटना ताबडतोब सभागृहासमोर आणावी आणि शासनाचे लक्ष त्याकडे वेधावे हा त्याच्या पाठीमागचा प्रमुख हेतू आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 13:50

(श्री. भास्करराव जाधव....

पण असे होते की, ज्यावेळी 93च्या सूचना वाचल्या जातात त्यावेळी त्या 6 महिन्यापूर्वी, वर्षभरापूर्वी किंवा दोन वर्षापूर्वी घडलेल्या घटनासंबंधीच्या असतात. त्यासंबंधी निवेदन करण्यास सांगितले जाते. 93च्या निवेदनांवर तासनतास प्रश्नोत्तरे चालतात. शासनाच्या धोरणाबद्दल, निर्णयाबद्दल मतदारसंघामध्ये घडलेल्या कोणत्या कामकाजाबद्दल नियम 93अन्वये सूचना येतात. विरोधी पक्षालाच सर्व आयुधे दिलेली आहेत अशा भावनेमुळे सत्ताधारी पक्षाचे सदस्य अस्वसथ होतात. सभापती महोदय, एका सन्माननीय सदस्यांनी नियम 93च्या किती सूचना दिल्या पाहिजेत हे सुध्दा एकदा निश्चित करण्याची आवश्यकता आहे, नियम 93च्याबाबतीत डेफिनेशन करण्याची आवश्यकता आहे. नियम 93 अन्वयेच्या सूचनेद्वारे विरोधी पक्षाला कामकाजामध्ये भाग घेण्याची संधी जास्त मिळते आणि सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना कामकाजामध्ये भाग घेण्यास कमी संधी उपलब्ध होते हे मी माननीय सभापतींच्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते ने जो प्रस्ताव लाया है, उस प्रस्ताव के कंटेन्ट्स के बारे में किसी की भावना अलग नहीं है. ट्रेजरी बँच के माननीय सदस्यों की और सभापति महोदय, खुद आपकी भी छत्रपति शिवाजी महाराज के बारे में कोई दूसरी भावना नहीं हो सकती है. इस सभागृह के सभी माननीय सदस्य रावते जी के साथ में है. कोई भी छत्रपति शिवाजी महाराज का अनादर नहीं कर सकता है और हम सभी चाहते हैं कि अनादर करने वाले व्यक्ति पर कार्रवाई होनी चाहिए. सवाल यह है कि यहां पर नियम 289 का इस्तेमाल किया गया है. यह बिल्कुल आखिरी सेक्शन है और नियम की पुस्तक में इसके बाद कोई सेक्शन नहीं है. इसके अन्तर्गत हम अर्जेंट पब्लिक इम्पोरेटेंस का मुद्दा उठा सकते हैं. मा. सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी का यही कहना है कि नियम 93 के अन्तर्गत अर्जेंट पब्लिक इम्पोरेटेंस के सारे मुद्दे उठाने का अधिकार है और उसके लिए प्रश्नोत्तर काल को स्थगित करने की आवश्यकता नहीं है. रावते जी ने जो मुद्दा उठाया है, उसके कंटेन्ट्स के बारे में कोई शिकायत नहीं है, लेकिन इस मुद्दे को हम नियम 93 के अन्तर्गत उठा सकते हैं. इस प्रश्न को नियम 289 के अन्तर्गत लेने पर पूरा समय चर्चा में चला जाता है और बाकी मेम्बर्स के प्रश्न नहीं आ सकते हैं. इसलिए इन नियमों के बारे में निर्णय होना चाहिए और उसके लिए उचित समय निर्धारित होना चाहिए, ताकि सभी मेम्बर्स को मौका मिल सके. . . . K 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी 10 वर्षे विधानसभेमध्ये काढली आणि काही वर्षे त्यांनी विधानपरिषदेमध्ये काढली. यामुळे ते परिपक्व विचार मांडत असतील म्हणून त्यांचे विचार मी कान देऊन ऐकत होतो...(अडथळा.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी एवढेच सांगण्यासाठी उभा आहे की, सन्माननीय सदस्य नियम 93च्या सूचना ह्या वेळ काढण्यासाठी किंवा टाईमपास करण्यासाठी म्हणून देत नाहीत. विषय निकडीचा असतो म्हणून नियम 93 अन्वये सूचना दिल्या जातात. नियम 93च्या सूचनांना मान्यता देणे किंवा त्या अमान्य करणे या बाबतीत माननीय सभापती निर्णय घेतात. त्यामुळे नियम 93 अन्वयेच्या सूचनांबाबत सन्माननीय सदस्यांनी केलेले वक्तव्य योग्य नाही असे मला वाटते. सभापती महोदय, आपण नियम 93च्या सूचनांबाबत निर्णय देत असता. त्यामुळे ज्या बाबीवर माननीय सभापतीं निर्णय देत असतात त्यावर सन्माननीय सदस्यांनी भाष्य करणे योग्य नाही असे माझे मत आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांनी केलेले वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे...(अडथळा...) मला एवढेच सांगावयाचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांच्या काहीही भावना असतील. ते नेहमी प्रमाणे न बोलता माननीय सभापतींच्या निर्णयावर बोलले आहेत. म्हणून तेवढा मजकूर कामकाजातून काढून टाकावा अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, घायकुतीला आलेला.... बाडगा जास्त कडवा असतो....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, अशा प्रकारचे वक्तव्य कोणी ऐकून घेणार नाही. याठिकाणी कोण बाटगा आहे ? बाटगा बोलण्याची कोणाची हिंमत आहे, कोणी बाटगेगिरी केली ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी माझे शब्द मागे घेतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी त्यांचे शब्द मागे घेतलेले आहेत.

.....नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : माननीय सभापती महोदय, एखाद्या सन्माननीय सदस्यांनी नकळत किंवा अजाणतेपणाने का होईना बोललेले अपशब्द मागे घेतले, हे आपण समजू शकतो परंतु आता हे सर्व जाणुनबुजून चाललेले आहे, म्हणून आता या ठिकाणी बोललेले अपशब्द संबंधित सन्माननीय सदस्यांनी माफी मागून किंवा दिलगीरी व्यक्त करुन मागे घेतले पाहिजेत.

**सभापती** : सुदैवाने सदनामध्ये नियम 289 आणि नियम 93 च्या अनुषंगाने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी पुष्कळ सखोल अशा प्रकारची चर्चा या ठिकाणी केली. या चर्चेमध्ये एखाद दुसरा अयोग्य किंवा चूकीचा शब्द जर वापरला गेला असेल तर तो जरुर तपासून घेण्यात येईल आणि अयोग्य असलेला शब्द बाजूला काढण्यात येईल. नियम 289 च्या अनुषंगाने जे आयुध आहे, त्या आयुधांचा वापर कशा पध्दतीने व्हावा तसेच किती व्हावा या अनुषंगाने मी स्वत: सुध्दा काटेकोर आहे. यापुढच्या काळात या अनुषंगाने सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जसे त्याचे विश्लेषण करुन सांगितले त्या अनुषंगाने निवेदन करावयाची परवानगी देत असतांना माझ्या दालनात मी अधिक काटेकोरपणे तपासणी करीन. समजा एखादा नियम 289चा प्रस्ताव आहे. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाची एखादी बाब असेल आणि दैनंदिन कामकाजामध्ये त्या अनुषंगाने दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये दुसरा कोणता विषय नसेल तर सभागृहामधील प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन निर्णय घेतला जाईल. मघाशी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सूचना केली की, या पुढच्या काळामध्ये नियम 289 खाली एखादा प्रस्ताव किंवा सूचना असेल तर ती माझ्या दालनातच मी तपासेन आणि सदर सूचना जर नियम 289च्या नियमाची पूर्तता करीत असेल तरच तो प्रस्ताव किंवा सूचना या ठिकाणी येईल, अन्यथा ती दालनातच नाकारली जाईल. सदर नियम 289 अन्वये दालनातच अनुमती नाकारलेल्या सूचनेला इतर कोणत्या माध्यमातून अनुमती देता येते का ते पाहण्यात येईल. प्रश्नोत्तराच्या तासाची आता 57 मिनिटे संपलेली आहेत.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**आदिवासी जिल्हयांमध्ये खावटी अर्जाच्या अनुदानात वाढ होणेबाबत**

**(१) * ३०५८८ श्री. रमेश निकोसे , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री.सय्यद जामा , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , मेजर सुधीर सावंत , श्रीमती सुधा जोशी , श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. प्रतापराव सोनवणे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आदिवासींसाठी खावटी कर्जाची योजना राज्यात किती व कोणत्या जिल्हयांमध्ये सुरू आहे,
(२) सदर योजनेचे स्वरूप काय आहे,
(३) गेल्या तीन वर्षात ९० टक्के लाभार्थ्यांनी खावटी खर्चाची परतफेड न केल्याने त्यांना नवीन खावटी कर्ज मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जव्हार प्रादेशिक कार्यालयांतर्गत ९० टक्के कर्जफेड न केल्याने नवीन खावटी कर्जापासून वंचित लाभार्थी किती आहेत,
(५) असल्यास, आदिवासी विकास महामंडळाच्या संचालकांनी थकीत कर्ज माफ करून अनुदानात वाढ करण्याच्या मागणीच्या संदर्भात काय निर्णय घेतला आहे,
(६) माणिकगड ( राजूरा ) पहाडावरील आदिवासी विविध कार्यकारी संस्था मारईपाटण व कोरेपूर ता. जिवतीद्वारा आदिवासी व कोलमांना सन २००५-२००६ व २००६-२००७ मध्ये खावटी वाटपात गैरप्रकार केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्याविरूध्द खाते चौकशी सुरू करण्याचे महाव्यवस्थापक ( गोंडवन ) नागपूर यांना निर्देश देण्यात आले आहेत हे खरे आहे काय,
(७) असल्यास चौकशीत काय आढळून आले, व त्यावर कोणती कारवाई करण्यात आली,
(८) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.विजयकुमार गावीत**: (१) सदर खावटी कर्ज योजना आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ज्या १५ जिल्हयांमध्ये सुरु आहे ते जिल्हे पुढीलप्रमाणे आहेत : १) ठाणे २) नाशिक ३) नंदूरबार ४) अमरावती ५) गडचिरोली ६) रायगड ७) जळगाव ८) अहमदनगर ९) पुणे १०) नांदेड ११) यवतमाळ १२) गोंदिया १३) नागपूर १४) चंद्रपूर १५) धुळे तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींना देखिल योजनेचा लाभ देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(२) १) सदर योजना ७०% कर्ज व ३० % अनुदान या स्वरुपात आहे
२) योजनेचा लाभ ७०% वस्तूरुपाने व ३०% रोख या स्वरुपात देण्यात येतो.
३) खावटी कर्जाचा दर कुंटुंबातील युनिटनुसार म्हणजे ४ युनिटपर्यंत रु २०००/-, ४ ते ८ युनिटपर्यंत रु ३०००/-, ८ युनिटच्या पुढे रु ४०००/- असा आहे.
४) खावटी कर्ज वाटप करताना १) दारिद्रय रेषेखालील कुटुंबे २) कोलाम, कातकरी व माडिया या आदिम जमाती ३) नंदूरबार, नाशिक, ठाणे, अमरावती व गडचिरोली या ५ संवेदनशील आदिवासी जिल्हयांना प्राधान्य देण्यात येते.
५) लाभार्थी विविध कार्यकारी सहकारी सोसाट्यांचे सभासद नसले तरी त्यांना लाभ देण्यात येतो.
६) आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींना देखिल योजनेचा लाभ देण्याचे निर्देश आहेत.

L - 3



JPK/ SBT/SBT/ प्रथम श्री.शिगम एम. .......... 13:55

७) दारिद्र रेषेखालील व्यक्तींनाच लाभधारक म्हणून निवडण्यात येते.

८) तथापि ज्या कुटुंबात ग्रेड-३ व ४ ची मुले आहेत ती कुटुंबे जरी दारीद्रय रेषेच्या वर असली तरी त्यांना या योजनेचा लाभ देण्याचे निर्देश दिले आहेत.

(३) होय. हे खरे आहे.

(४) प्रादेशिक कार्यालय जव्हार अंतर्गत मागिल तीन वर्षात खावटी कर्जाचा लाभ १,२१,४६३ लाभार्थ्यांना दिला असून त्यापैकी ३,६३० लाभार्थ्यांनी कर्जाची परतफेड केली आहे. १,१७,८३३ लाभार्थ्यंना कर्जाची परतफेड न केल्याने थकबाकीदार झाल्याने ते नवीन खावटी कर्जापासून वंचित झाले आहेत.

(५) याबाबत शासन स्तरावर निर्णय घेतला जातो, मात्र याबाबत अद्याप शासनाने निर्णय घेतलेला नाही.

(६) हे खरे आहे.

(७) या प्रकरणी महामंडळाने केलेल्या चौकशीत मारईपाटण ता. जिवती आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे सचिव श्री. यशवंत तानबा कोवे व संस्थेचे संचालक श्री.मलकु भादु कोटनाके रा. राहपन्नी यांनी सन २००४-२००५ व २००५-२००६ च्या हंगामात खावटी कर्ज वाटपात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्याने तेच या प्रकरणी प्रामुख्याने कसूरवार आढळून आले आहेत. तसेच उपप्रादेशिक व्यवस्थापक श्री.एन.एन.खेकाळे व विपणन निरिक्षक श्री.जे.एन.कुमरे तसेच विपणन निरिक्षक श्री.एन.एस.चौधरी यांचेवर खावटी कर्ज वाटपाच्या कामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महामंडळाने सोपविली होती. या कामात त्यांनी कसूर केल्याचे प्राथमिकचौकशीत निदर्शनास आले आहे. त्यानुसार वरील आरोपींवर महामंडळाने खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. १. याप्रकरणी संस्थेचे सचिव श्री यशवंत तानबा कोवे व संस्था संचालक श्री.मलकु भादु कोटनाके रा.राहपन्नी यांचे विरुध्द पोलीस स्टेशन टेकामांडवा ता.जिवती येथे कलम ४०९, ४२० अनुसार काही लाभार्थीनी व महामंडळाने गुन्हा दाखल केला आहे. सदर संस्था ही सहकारी कायद्यानुसार नोंदणीकृत संस्था असल्याने सहकारी खात्यामार्फत संस्थेचे कामकाजावर नियंत्रण ठेवले जाते म्हणून महामंडळाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, चंद्रपूर यांना संस्थेच्या विरुध्द सहकारी कायद्याचे आधीन राहून संस्था कार्यकारणी बरखास्त करणेस तथा संस्थेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करणेस विनंती करावी असे निर्देश प्रादेशिक व्यवस्थापक, चंद्रपूर यांना देण्यात आलेले आहेत.

३. या प्रकरणी महामंडळाचे उप प्रादेशिक व्यवस्थापक श्री. खेकाळे एन.एन. व विपणन निरिक्षक श्री. जे.एन. कुमरे तसेच विपणन निरिक्षक श्री. एन.एस. चौधरी यांना खावटी कर्ज वाटपाच्या कामावर नियंत्रण ठेवण्यात कसूर केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्याविरुध्द खाते चौकशी सुरु करण्याबाबत महाव्यवस्थापक (गोंडवन) नागपूर यांना निर्देश देण्यात आले.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त:सभापती महोदय,आदिवासी विभागातील कुपोषणाची समस्या लक्षात घेता खावटी कर्जाच्या अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे?खावटी कर्ज फेडण्यामध्ये येणा-या अडचणी दूर करण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करीत आहे ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सध्या तरी खावटी कर्जामध्ये वाढ करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कारण तीन वर्षापूर्वी खावटी कर्जामध्ये मोठया प्रमाणात वाढ केलेली आहे परंतु एक गोष्ट निश्चितपणे लक्षात आली आहे की, स्थलांतर खूप मोठया प्रमाणामध्ये होत आहे त्याचप्रमाणे एका बाजूला सातत्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे आणि अतिवृष्टीची परिस्थिती निर्माण होत आहे, त्यामुळे हे खावटी कर्ज फेडण्यामध्ये ब-याचशा अडचणी निर्माण होत आहेत, म्हणून आदिवासी विकास महामंडळाने जाहीर केले आहे की, शासनाकडे हे खावटी कर्ज माफ करण्याबाबत विनंती करण्यात येईल. लवकरच आम्ही महामंडळातर्फे खावटी कर्ज माफ करण्याचा मुद्दा मांडणार आहोत.

श्री.सुधाकर गणगणे : अध्यक्ष महाराज, उत्तर क्रमांक ०५ मध्ये असे म्हटलेले आहे की, आदिवासी विकास महामंडळाच्या संचालकांनी थकीत कर्ज माफ करुन अनुदानात वाढ करण्याच्या मागणीच्या संदर्भात अंतिम निर्णय घेण्यात येईल. आता हा जो निर्णय आहे त्या निर्णयाप्रमाणे कर्जाचे हफ्ते न फेडलेल्या लाभार्थ्यांना पुन्हा कर्ज दिले जात नाही याची कारणे कोणती याचा शासन खुलासा करेल का ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मोठया प्रमाणात स्थलांतर होत आहे आणि जे दारिद्रय रेषेखालील लोक आहेत त्यांना तेवढे उत्पन्न मिळत नाही, म्हणून ते वेळेवर कर्ज भरु शकत नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे अतिवृष्टी किंवा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे त्यांना खावटी कर्जाचे हप्ते फेडण्याएवढे उत्पन्न मिळत नाही म्हणून ते हप्ते फेडू शकत नाहीत. यापूर्वी आपण दोनदा खावटी कर्ज माफ केलेले आहे, म्हणून लोकांना वाटते की, आताही आपले हे कर्ज शासन माफ करेल आणि म्हणून या मानसिकतेपोटी सुध्दा लोक कर्जाचे हप्ते भरीत नाहीत.

यानंतर श्री.कानडे......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30588 पुढे सुरु....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, खावटी कर्ज योजना ही बीपीएल कार्डधारकांसाठी शासनाने लागू केलेली योजना आहे. मागील तीन वर्षात ज्यांना कर्ज दिले गेले त्या 1 लाख 21 हजार 463 कर्जदारांपैकी फक्त 3 हजार कर्जधारकांनी या कर्जाची परतफेड केलेली आहे. 1 लाख 17 हजार 833 कर्जधारक कर्ज फेडू शकलेले नाहीत अशी परिस्थिती आहे. खावटी कर्जाच्या बाबतीत शासनाकडून 70 टक्के कर्ज आणि 30 टक्के रोख स्वरुपात दिलेले जातात. त्याऐवजी 70 टक्के अनुदान आणि 30 टक्के कर्ज अशा प्रकारची योजना शासन राबविण्याचा विचार करु शकेल काय ?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेवर कारवाई करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, खावटी कर्ज योजनेमध्ये 70 टक्के वस्तूरुपाने आणि 30 टक्के रोखीने दिले जातात. वस्तूरुपाने ज्या वस्तू दिल्या जातात त्याची खरेदी केली जाते ती बाजारभावापेक्षा जास्त असते ही गोष्ट खरी आहे काय ? उदा. गोडेतेलाचा भाव जर बाजारामध्ये 30 रु. लिटर असेल तर या योजनेमध्ये 70 रु. लिटर या दराने तेल खरेदी केले जाते. गव्हाचा भाव बाजारामध्ये 800 रु.क्विंटल असेल तर या योजनेमध्ये 1200 रु.क्विंटल या दराने गहू खरेदी केला जातो. ही गोष्ट खरी आहे काय ? त्याचप्रमाणे लोकलेखा समितीच्या अहवालामध्ये जे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत त्यामध्ये या योजनेमध्ये चढया भावाने खरेदी केली जाते असा मुद्दा समाविष्ट करण्यात आलेला आहे. म्हणून या योजनेतील वस्तूंची खरेदी पारदर्शक होण्याच्या दृष्टीने शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, बाजारभावापेक्षा दुप्पट भावाने या योजनेमध्ये वस्तूंची खरेदी केली जात नाही. आदिवासी विकास आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली या योजनेतील वस्तूंची खरेदी करण्यासाठी एक खरेदी समिती असते. समितीमध्ये अप्पर आयुक्त, आदिवासी विकास तसेच पणन महामंडळाचे महाव्यवस्थापक यांचा देखील समावेश असतो. वस्तूंची खरेदी करताना वस्तूंचा खरेदीपूर्वीच्या 4/5 दिवसातील दर त्याचप्रमाणे या विषयातील माहिती असणारे सांख्यिकी अधिकारी व व्यापारी संघाचे प्रतिनिधी यासर्वांचा मध्य काढून खरेदीचे दर ठरविले जातात.

....2

SSK/ MAP/ SBT/ SBT/ MAP/ 14:00

ता.प्र.क्र. 30588 पुढे सुरु....

डॉ. विजयकुमार गावीत ....

बऱ्याचवेळेला कमी-जास्त रेट होतात. उदा. 26 आणि 27 तारखेचे वस्तूंचे भाव आणि आजचे वस्तूंचे भाव यामध्ये फरक पडतो. आजचे वस्तूंचे भाव भरपूर जास्त असू शकतात. त्यामुळे या योजनेतील वस्तूंची खरेदी करताना डबल रेटने केली असे घडलेले नाही. खरेदीमध्ये निश्चितपणाने पारदर्शकता राहिलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे लोकलेखा समितीच्या अहवालामध्ये या खरेदीच्या संदर्भात ताशेरे ओढलेले आहेत काय ? अशा प्रकारे चढया भावाने वस्तूंची खरेदी केली जाते ही गोष्ट खरी आहे काय ? त्याचप्रमाणे या योजनेमध्ये पैशाचे वाटप केले जाते त्यावेळी तालुक्याच्या ठिकाणी जाऊन पैसे बँकेतून घ्यावे लागतात. कर्जदाराची बँकेमध्ये 100 रु. ठेऊन खाते उघडण्याची देखील ऐपत नसते. म्हणून यासंदर्भात शासन काही वेगळी योजना सुरु करणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, लोकलेखा समितीच्या अहवालामध्ये यासंबंधातील ऑडीट पॅरा आता माझ्याकडे उपलब्ध नाही. मी ही बाब तपासून घेतो. याबाबतची माहिती पुढीलवेळी निश्तितपणाने मी सभागृहात देईन....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, लोकलेखा समितीचा अहवाल सदनाला सादर केला जातो. या अहवालात नमूद केलेल्या ताशेऱ्यांबाबत शासनाकडे माहिती उपलब्ध नाही असे उत्तर दिले आहे. माझा प्रश्न असा आहे की, सभागृहाला अहवाल सादर झाल्यानंतर या अहवालावर पुढे कोणती कार्यवाही केली जाते ?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षातील लोकलेखा समितीच्या अहवालात या योजनेसंदर्भात कोणतेही ताशेरे ओढलेले नाहीत. त्यापूर्वीच्या अहवालात अशा प्रकारची जर काही माहिती असेल तर मी ती तपासून घेईन. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे खावटी कर्जदार 100 रु. देखील बँकेत भरुन खाते उघडू शकत नाही. मध्यंतरीच्या काळात डायरेक्ट पैसे देता येतील काय याचाही विचार केला गेला त्याचप्रमाणे बेअरर चेक देता येतील काय याचाही विचार केला गेला परंतु हे करताना काही आरोप होण्याची शक्यता आहे..

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु काही ठिकाणाहून आदिवासी लाभार्थी पैसे भरु शकत नाहीत असे रिजनल मॅनेजरकडून शासनास लेखी स्वरुपात कळविण्यात आल्यामुळे या प्रश्नात योग्य तो मार्ग काढला जाईल. बेअरर चेक दिल्यानंतर तो कोणीही घेऊ शकतो आणि पैसे दिले नाही म्हणूनही सांगितले जाऊ शकते. म्हणून योग्य तो मार्ग काढून पैसे भरावे लागणार नाहीत याची काळजी घेतली जाईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासींना देखील योजनेचा लाभ देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील कोणत्या क्षेत्रातील आदिवासींना हा लाभ देण्यात आला? आतापर्यंत किती आदिवासींना लाभ दिलेला आहे? जव्हार तालुक्यामध्ये कुपोषित बालकांचे प्रमाण अधिक आहे. असे असताना 1,17,833 लाभार्थी हे थकबाकीदार आहेत, त्यामुळे ते नवीन खावटी कर्जापासून वंचित झाले आहेत. यामुळे कुपोषण वाढणार नाही का? कुपोषण वाढू नये म्हणून काय उपाययोजना करण्यात येत आहे?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, ग्रेड 3 आणि 4 ची बालके असतात त्यांची थकबाकी असली तरी त्यांना आपण पुन्हा खावटी कर्ज देत असतो. महाराष्ट्रामध्ये पूर्वी आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये खावटी कर्ज दिले जात होते. मागील दोन वर्षापासून शासनाने निर्णय घेतला की, महाराष्ट्रामध्ये कुठेही आदिवासी असल्यास आणि ते दारिद्र्य रेषेखालील असल्यास किंवा दारिद्र्य रेषेवरील असले तरी ग्रेड 3 आणि 4 मधील कुपोषणाची बालके असली तर त्यांना लाभ देण्यात येईल आणि त्याप्रमाणे लाभ देण्यास सुरुवात केलेली आहे. मागील वर्षी शासनाने ठाणे, नाशिक, नंदूरबार, अमरावती, गडचिरोली, रायगड, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, यवतमाळ, गोदिया, नागपूर, चंद्रपूर, धुळे या जिल्हयांमध्ये खावटी कर्जाचे वाटप केले आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, 70 टक्के वस्तूरुपाने वाटप केले जाते. त्या वस्तू कोणत्या आहेत? त्यांचे दर काय आहेत?

डॉ.विजयकुमार गावीत : ज्या वस्तू वाटप केल्या जातात त्यामध्ये गहू, तांदूळ, चणा, वाटाणा, मटकी, तूरडाळ, सूर्यफूल यांचा समावेश असतो. सर्वसाधारणपणे गहू 1315, तांदूळ 1350, चणा 3100, वाटाणा 2100, मटकी 3600, तूरडाळ 3400 रुपये याप्रमाणे क्विंटलचा दर आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30588....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. आज महाराष्ट्रामध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढलेले आहे आणि कुपोषण वाढलेले नाही असे सरकारचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी आवर्जून उल्लेख केला की, कुपोषण वाढत आहे. त्या संदर्भात मंत्रीमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. थकबाकी असलेल्या आदिवासींना खावटी कर्ज मिळत नाही. मागील तीन वर्षातील कुपोषणाची परिस्थिती काय आहे?

डॉ.विजयकुमार गावीत : कुपोषणाची आकडेवारी वाढलेले नाही. कारण कुपोषण किती आहे, कुठे आहे याची माहिती महिला व बालकल्याण विभाग सांगू शकतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGB/ MAP/ SBT/ 14:05

**बोरीवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये**
**असलेली अतिक्रमणे हटविण्याबाबत**

**(२) * ३१०७१ श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये असलेल्या हजारो अतिक्रमणे हटविण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २९ मार्च, २००७ रोजी वा त्या सुमारास दिलेले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, कमीत कमी शब्दात उत्तर देण्याची वन विभागाच्या अधिकाऱ्यांची परंपरा आहे की काय हे मला समजून येत नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 31071 .........**

श्री. जितेंद्र आवाड...

सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, अतिक्रमण हटविण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिनांक 29 मार्च, 2007 रोजी वा त्या सुमारास दिलेले होते हे खरे आहे काय? या प्रश्नाला "होय" असे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यानंतर प्रश्न विचारण्यात आला होता की, "उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई किली वा करण्यात येत आहे?" या प्रश्नाच्या संदर्भात काहीही उत्तर दिलेले नाही . तसेच तिसरा प्रश्न असा विचारला होता की, उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत? तिस-या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देण्यात आलेले आहे की, "मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे." त्यामुळे मी जे प्रश्न विचारले होते त्या प्रश्नांना उत्तरे आलेली नसल्यामुळे मी पूरक प्रश्न विचारु शकत नाही तरी मी जे प्रश्न विचारलेले आहेत प्रथम त्या प्रश्नांना मंत्री महोदयांकडून उत्तरे मिळाल्यानंतर मी पूरक प्रश्न उपस्थित करणार आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न विचारला होता की, "हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला "हे खरे आहे" असे उत्तर देण्यात आलेले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला होता की, "उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आलें, व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आलेली आहे? " सभापती महोदय, एखादे प्रकरण जर कोर्टात असेल तर त्यासंदर्भात काही सांगणे योग्य नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : माननीय सभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात उच्च न्यायालयाने कोणते आदेश दिलेले आहेत, व त्यावर काय कारवाई करण्यात आलेली आहे?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, उच्च न्यायालयाने पहिल्यांदा अतिक्रमण काढून टाका असे आदेश दिले होते व त्यानंतर उच्च न्यायालयाने "थांबा" असे आदेश दिलेले आहेत. महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात फायनल सुनावणी 1.8.2007 रोजी होणार असून त्यानंतर पुढील कारवाई सुरु होईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 31071 .........**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी विचारले होते की, या प्रकरणाच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने 29 मार्च , 2007 रोजी जे आदेश दिले होते त्यानुसार कोणती कारवाई केलेली आहे? परंतु या प्रकरणाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी हे प्रकरण न्यायालयात असल्यामुळे असल्यामुळे माहिती देऊ शकत नाही असे उत्तरात सांगितले नाही. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, आरे वसाहतीतील दुग्ध विभागाच्या जागेवर या आदेशाप्रमाणेच उच्च न्यायालयाने पुनर्वसन करण्याचे आदेश दिले होते हे खरे काय? या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदय अनिस अहमद यांनी निं:सदिग्ध असे उत्तर दिले होते. असे आदेश दिले होते हे खरे आहे यात संदिग्धता नाही हे क्लिअर आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाने या प्रकरणाच्या संदर्भात कोणते आदेश दिलेले आहेत व येथील लोकांचे पुनर्वसन कोठे करण्यात येणार आहे तेथेच पुनर्वसन करणार आहात की दुस-या जागेवर?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, बोरीवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या आसपास अतिक्रमण निश्चित झालेले आहे. या ठिकाणी 61 हजार झोपडयांनी अतिक्रमण केलेले असून अतिक्रमण केलेल्या लोकांचे कल्याण, अंबरनाथ येथे पुनर्वसन करावे असे न्यायालयाने सांगितले होते त्याप्रमाणे या मध्ये ज्या व्यक्तींनी 7 हजार रुपये भरले आहेत अशांनाच अधिकृत धरण्यात यावे, असे ठरले होते त्या प्रमाणे 11,600 व्यक्तींनी 7 हजार रुपये भरलेले आहेत. या व्यक्तींना कल्याण, अंबरनाथ या ठिकाणची जागा दाखविण्यात आली होती परंतु या लोकांनी ही जागा पसंत केली नाही त्यानंतर हे लोक पुन्हा न्यायालयात गेले. त्यांनतर या लोकांचे चांदिवली येथे पुनर्वसन करावे असे आदेश देण्यात आले त्यानंतर उरलेल्या लोकांना तेथून हटवावे असा ओदश कोर्टाने दिले होते त्या प्रमाणे काही लोकांचे पुनर्वसन करण्यात आले असून, जागाही देण्यात आलेली आहे. परंतु त्या ठिकाणी सुविधा नसल्यामुळे संबंधित लोक कोर्टात गेले व उच्च न्यायालयाने यासंदर्भात स्थगिती दिली. आता दिनांक 1.8.2007 रोजी यासंदर्भात कोर्टात फायनल सुनावणी होणार असून त्यांनतर पुढील कारवाई केली जाईल.

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, बोरीवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये जे आदिवासी राहतात ते अतिक्रमित नाहीत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान घोषित होण्याच्या आधी हे आदिवासी त्या ठिकाणी राहत होते त्यामुळे येथे पूर्वीपार राहत असलेले आदिवासी हे अतिक्रमित नाहीत अशी भूमिका शासन कोर्टात मांडणार आहे काय?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 31071......

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे स्वरुप वेगळे आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, संजय गांधी उद्यान घोषित होण्याच्या पूर्वी त्याठिकाणी राहत असलेले आदिवासी हे अतिक्रमित नाहीत अशी भूमिका शासन न्यायालयात मांडणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, संजय गांधी उद्यानाच्या बाहेर अतिक्रमणे आहेत. संजय गांधी उद्यानाच्या कक्षेत अतिक्रमणे आहेत त्या संदर्भातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी संजय गांधी उद्यानात काही पाडे आहेत त्या संदर्भातील प्रश्न विचारलेला आहे. या संदर्भात सांगू इच्छितो की, पाड्यामध्ये राहणाऱ्यांचे पुनर्वसन करण्याची शासनाची भूमिका आहे. परंतु तेथील लोक पुनर्वसनास तयार नव्हते, परंतु आता काही लोक तयार झालेले आहेत. त्या जागेतून बाहेर येण्याची ज्यांची तयारी आहे त्यांचे पुनर्वसन करण्यास शासन तयार आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, त्याठिकाणी जे पाडे आहेत ते जुने झालेले आहेत. आता त्याठिकाणी वन विभागातील अधिकाऱ्यांना हाताशी धरुन, त्यांना 10-15 हजार रुपयांची मलई देऊन नव्याने पाडे बांधून ते परप्रांतियांना विकण्याचा धंदा सुरु आहे. त्याठिकाणी मूळ 17-18 पाड्या व्यतिरिक्त कोअर एरियामध्ये नवीन पाडे निर्माण झालेले आहेतत. त्याठिकाणी आदिवासी कमी आणि परप्रांतीय लोक जास्त आहेत. तेव्हा पाड्यांमध्ये जी अनधिकृतपणे घरे बांधलेली आहेत त्याबाबत शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आदिवासींचे हक्क संरक्षित आहेत. पाड्यांमध्ये नवीन घरे बांधलेली नाहीत. तेथील लोकांचे पुनर्वसन करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. जे लोक तेथून बाहेर येतील त्यांचे पुनवर्सन करण्यास शासन प्रयत्नशील राहील. जर त्याठिकाणी अतिक्रमण झाले असेल तर ते काढून टाकण्यात येईल.

--------------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात विशेषतः ठाणे जिल्ह्यात गत दहा वर्षापासून**
**विनावेतन प्रतिलिपिक म्हणून सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना**
**शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत**

**(3) * 29525** **श्री. संजय केळकर** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात विशेषत: ठाणे जिल्ह्यात गत दहा वर्षे विनावेतन प्रतिलिपिक म्हणून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत शासनाने जिल्हाधिकारी ठाणे यांना वेळोवेळी कळवूनही अद्यापही अशा कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेतले गेले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, कर्मचाऱ्यांचे वाढते वय व नोकरीअभावी बऱ्याच युवकांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ झाली व यामुळे शासनाची उदासिनता आत्महत्येस प्रवृत्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत शासन काय कारवाई करणार आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे , श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) शासन निर्णय, महसूल व वन विभाग दिनांक 10.3.2005 नुसार पात्र असलेल्या उमेदवारांना शासन सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, एका बाजूला लाखो तरुण बेरोजगार आहेत, तर दुसऱ्या बाजूला निरनिराळ्या जिल्ह्यांमध्ये, तहसिलदार कार्यालयामध्ये तरुण विनावेतन प्रतिलिपिक म्हणून काम करीत आहेत. ठाणे, वाडा, इत्यादी तालुक्यांमध्ये तरुण विनावेतन प्रतिलिपिक म्हणून काम करीत आहेत. अशा विनावेतन प्रतिलिपिक म्हणून काम करणाऱ्यांची दहा वर्षे सेवा झाली असेल आणि त्यांनी 70 टक्के मोबदला घेतला असेल त्यांनाच शासनाच्या सेवेत घेतले जाईल असा नियम आहे. परंतु काही तरुणांची सेवा 10 वर्षे पूर्ण होण्यास काही दिवसच कमी पडत आहेत. तेव्हा त्यांच्या बाबतीत शासन नियम शिथिल करणार आहे काय ? नसल्यास, अशा तरुणांना पुढील काळात प्राधान्य देणार आहात काय ? कारण त्या कर्मचाऱ्यांना दुसरीकडे नोकरी मिळत नाही आणि त्यांचे वय देखील वाढत आहे. तेव्हा या संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29525..........

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, प्रादेशिक मंडळ अस्तित्वात येण्यापूर्वी राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात अशाप्रकारची प्रतिक्षा यादी तयार करुन उमेदवारांना नियुक्ती देण्यात येत होती. विनावेतन प्रतिलिपिक म्हणून काम करणाऱ्या उमेदवाराने 70 टक्के मोबदला घ्यायचा आणि 30 टक्के मोबदला शासनास द्यायचा अशी ती पध्दत होती. सन्माननीय सदस्यांनी ठाणे जिल्ह्यातील प्रश्न मांडलेला आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये जवळपास 22 ते 23 उमेदवार प्रतिलिपिक म्हणून काम करीत होते. त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे यासाठी त्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, औरंगाबाद यांच्या खंडपीठाकडे अर्ज केला. शासनाच्या 22.10.1996 रोजीच्या जी.आर.मध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, "...अशा उमेदवारांनी 10 वर्षाचा आणि 70 टक्के मोबदला घेतल्याचा पुरावा सादर करावा." त्याप्रमाणे तहसिलदार कार्यालयामध्ये किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात विनावेतन प्रतिलिपिक म्हणून दहा वर्षे काम केल्याचा पुरावा सादर केल्यास त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**"शिर्डी (ता.राहता, जि.अहमदनगर) येथील आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींच्या नावे करण्याबाबत**

**(4) * 33391 श्री.परशुराम उपरकर : तारांकित प्रश्न क्रमांक 26374 ला दिनांक 30 मार्च, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) "शिर्डी (ता.राहता, जि.अहमदनगर) येथील आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींच्या नावे करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(2) मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून संबंधीत फेरफार नोंदी रद्द करण्यात आल्या आहेत काय, असल्यास, केव्हा,

(3) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे दिनांक 16 जून, 2007 रोजीच्या पत्रानुसार उक्त प्रकरणातील मिळकतीचा ताबा अर्जदारांस देणे कामी काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, या प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री. नारायण राणे यांच्याकरिता** : (1) व (2) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील रिट पिटीशन क्रमांक 3003/91 मध्ये होणारा निर्णय संबंधितांवर बंधनकारक ठेवून मौजे शिर्डी येथील फेर नं.6452, 12326 व 15559 या नोंदी उपविभागीय अधिकारी, संगमनेर यांच्या दिनांक 5.03.2006 च्या आदेशान्वये रद्द करण्यात आलेल्या आहेत.

(3) व (4) उपविभागीय अधिकारी, संगमनेर यांच्या दिनांक 5.03.2006 च्या आदेशाविरुध्द अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे रिव्हीजन अर्ज सुनावणीसाठी दाखल आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33391.....

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सदर जमिनीबाबत उप विभागीय अधिकाऱ्यांनी दिलेले स्थगिती आदेश उठवून दिनांक 18 जुलै,2007 रोजी अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले असताना, त्या गावचे तलाठी सदरचा कब्जा 85 वर्षांच्या महिलेला देण्यास टाळाटाळ करीत आहेत, हे खरे आहे काय ? असल्यास, संबंधितांवर कारवाई होणार का ? व ही जमीन बिगर आदिवासी कोण खरेदी करणार आहे, त्याचे नांव कळेल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, शिर्डी, ता.राहता, जि.अहमदनगर येथील प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. श्रीमती ताराबाई कोळी यांच्या मुख्यत्यार अय्यपन पिल्लई होत्या. श्रीमती ताराबाई आणि भागुबाई कोळी यांची ही जमीन होती. सन्माननीय सदस्यांनी ज्या जमिनीबाबत विचारले त्याबाबत मी सांगू इच्छितो की, सर्वश्री सदाशिव शेळके, राजेंद्र शेळके, माधव शेळके, प्रकाश शेळके व इतर तीन यांनी त्यांचे कूळ विकत घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणून यासंदर्भात तक्रारी आल्यानंतर उप विभागीय अधिका-यांनी जमीन खरेदी केल्याची नोंद नसल्यामुळे ते रद्द केलेले आहे. मी या प्रश्नाच्या संदर्भातील माहिती घेतली असता, ख-या अर्थाने ब-याच गोष्टी समोर येतात. ही जमीन आदिवासी लोकांची असून हा प्रश्न कूळ जमिनीचा आहे. त्यामुळे या सर्व बाबी तपासणे अत्यंत आवश्यक आहेत. महसूल विभागाच्या तलाठी, तहसिलदार, विशेष कार्य अधिकारी किंवा अप्पर आयुक्तांनी या जमिनीच्या खरेदी विक्रीच्या संदर्भात जे निर्णय घेतले असतील ते निर्णय पुढच्या काळात तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. ही आदिवासींची जमीन असेल तर ती विकण्याच्या दृष्टीने शासनाच्या मान्यतेने खरेदी केली आहे काय ? तसेच कुळाचा प्रश्न असेल तर तो औरंगाबाद खंडपीठाकडे अजून प्रलंबित असून त्याबाबतीत अजून निर्णय होणे बाकी आहे. म्हणून यासंदर्भातील निर्णय लागल्यानंतरच यासंदर्भात निर्णय घेता येतील. परंतु हा प्रश्न महत्वाचा असल्यामुळे शासनाच्या माध्यमातून या सगळया प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्तांच्यामार्फत केली जाईल व संबंधितांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आदिवासींची जमीन आदिवासींनेच खरेदी केली पाहिजे, असा कायदा असून तो अजूनही अस्तित्वात आहे. परंतु ज्या रजिस्ट्रेशन कार्यालयातील रजिस्टारने रजिस्ट्रेशन केले आहे, त्यांवर राज्य शासन कोणती कारवाई करणार आहे ?

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33391.....

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अशी जमीन खरेदी करीत असताना, रजिस्ट्रेशन कार्यालयामध्ये त्याबाबत तपासले जात नाही. परंतु जमीन खरेदीचे प्रकरण दाखल झाल्यानंतर त्याची तपासणी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली पाहिजे. सदरची जमीन आदिवासींची असून ती जर बिगर आदिवासींना विकली जात असेल तर त्याबाबतीत 36 (अ) व 36 (ग) प्रमाणे परवानगीची आवश्यकता असते. परंतु तशा प्रकारची परवानगी घेतली आहे, असे प्रथमदर्शनी तरी दिसून येत नाही. त्यामुळे मी सुरुवातीसच सांगितले की, या सगळया प्रकरणाची चौकशी शासन विभागीय आयुक्तांकडून करणार आहे. तसेच या सगळया चौकशीमध्ये सर्व मुद्दे आणले जातील व या प्रकरणाच्या बाबतीत तक्रार दाखल करणाऱ्यास न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

---------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील ३३ सहकारी साखर कारखान्यांना कर्ज दिल्याबाबत**

**(५) * २९६२१ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे, श्री. रमेश निकोसे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.सय्यद जामा : तारांकित प्रश्न क्रमांक २१४७३ ला दिनांक ५ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३३ सहकारी साखर कारखान्यांना सन २००६-२००७ या हंगामी वर्षात ७३.२४ कोटी रुपये पूर्ण हंगामी कर्ज व सुमारे २२ कारखान्यांना एकूण रुपये २७.१२ कोटी इतके कर्ज देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्ज वसुली करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयप्रकाश दांडेगांवकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) हंगाम २००६-२००७ मध्ये राज्यातील ४० सहकारी साखर कारखान्यांना रुपये १०८८१.१७ लाख पूर्व हंगामी कर्ज आणि २३ कारखान्यांना रुपये ३६५२.९१ लाख वाढीव अल्प मुदत कर्जास शासनाने मान्यता दिलेली आहे.

(२) कर्जाची रक्कम संबंधित बँकाकडून साखरेच्या मालतारण खात्यावरील उचलीतून टँगीगद्वारे वसूल करण्यात येते व शासकीय कर्जे संबंधित कारखान्यांकडून शासकीय कोषागारात परस्पर भरणा करुन घेणेबाबत कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "राज्यातील ४० सहकारी साखर कारखान्यांना रुपये १०८८१.१७ लाख पूर्व हंगामी कर्ज आणि २३ कारखान्यांना रुपये ३६५२.९१ लाख रुपये वाढीव अल्प मुदत कर्जास शासनाने मान्यता दिलेली आहे." त्यामुळे याबाबतीत माझा असा प्रश्न आहे की, आतापर्यंत केलेल्या वसुलीबाबतची माहिती माननीय मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, सदरचे कर्ज राज्य सहकारी बँकेकडून व जिल्हा बँकेकडून दिले जाते. ज्या कारखान्यांचे मायनस नेटवर्क होते, त्या कारखान्यांना त्या त्या बँकांनी थक हमीवर पूर्व हंगामी कर्ज दिलेले आहे. त्यांचे बॅचशीटप्रमाणे कर्जाच्या रक्कमेची वसूली होते. त्यांच्या वसुलीच्या रक्कमेची माहिती सगळया बँकांकडे आहे. शासनाने फक्त थक हमी दिली असून कर्ज हे बँकांनीच दिलेले आहे.

नंतर श्री.रोझेकर....

**<u>ता.प्र.क्र.29621 पुढे सुरु........</u>**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, किती साखर कारखान्यांनी मागील वेळी सरकारची थकबाकी ठेवली होती, त्या कारखान्यांना पुन्हा कर्ज देण्यात आले का ? यापूर्वी किती कारखान्यांनी आर्थिक घोटाळे केले आणि त्यांची चौकशी सुरु आहे, त्यांना कर्ज देण्यात आले आहे का ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, थोडासा प्रश्न वेगळा आहे. मागील वेळी चाळीस कारखान्यांना 108 कोटी रुपये दिलेले आहेत. त्यापैकी थकबाकी किती आहे, याबाबतची माहिती हवी असेल तर ती तपासून पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याविषयी परवा सभागृहात प्रश्न उपस्थित झाला होता. ज्यांची थकबाकी होती त्यांना शासनाने कर्ज दिले आहे. शासनाकडून कर्ज घ्यायचे, थकबाकी ठेवायची आणि पुन्हा पुढील वर्षी कर्ज घ्यायचे. माझा मुद्दा हा आहे की, ज्यांनी आर्थिक घोटाळे केले असे साखर कारखाने किती आहेत आणि त्यांना कर्ज देण्यात आले आहे का ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, जे मायनस नेटवर्क होते त्यांना राज्य शासनाची हमी देण्यात येते. कर्ज नाबार्डच्या माध्यमातून देण्यात येते व त्या कर्जाला राज्य शासनाची हमी असते. ज्या साखर कारखान्यांनी घोटाळे केले आहेत त्यांची चौकशी सुरु आहे. एकूण चाळीस कारखान्यांना राज्य शासनाने कर्ज हमी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती विचारलेली आहे ती तपासून पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, जे साखर कारखाने सुरु होते पण त्यांना केंद्राच्या पॅकेजचा लाभ दिला नाही, असे 28 साखर कारखाने आहेत. त्यांचा समावेश या वर्षीच्या पॅकेजमध्ये करण्यात येईल काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर :सभापती महोदय, याबाबत नाबार्डसमवेत राज्य शासनाची चर्चा झाली आहे. सुरुवातीच्या काळामध्ये 92 साखर कारखान्यांचा समावेश पॅकेजमध्ये करण्यात आला होता. 75 कारखान्यांनी एम.ओ.यू.साईन केला आहे. 27/28 कारखाने नाबार्डच्या अटीत बसले नव्हते, 15 वर्षाऐवजी 20 वर्षापर्यन्त रिशेडयूल करण्याचे नाबार्डने आता मान्य केले आहे. यासंदर्भात एक उच्चाधिकार समिती आहे, त्यामध्ये या प्रस्तावांची छाननी करुन जे पात्र ठरतील त्यांना राज्य शासनाची हमी देण्यात येईल.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.29621 पुढे सुरु........**

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, 40 साखर कारखान्यांना हंगामी कर्ज दिलेले आहे. मागील वर्षी थकित असलेल्या कारखान्यांचा समावेश त्यामध्ये आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, हे पूर्व हंगामी कर्ज आहे, हंगामी कर्ज नाही.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..........

**भंडारा जिल्ह्यातील तालुका गोंदिया येथील**
**गिरोली/लांजी ह्या गावांचे केलेले विभाजन**

**(६) * ३१८५४ श्री.केशवराव मानकर , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. नितीन गडकरी , श्री.सागर मेघे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २ मार्च, १९७२ च्या राजपत्रात भंडारा जिल्ह्यातील तालुका गोंदिया येथे ग्राम गिरोला/लांजी ह्या गावांचे विभाजन करण्यात आले आणि लंबाटोला या नवीन गावाची निर्मिती करण्यात आली त्यावेळी हे विभाजन गिरोला/लांजी येथील गावकऱ्यांना विश्वासात घेऊन करण्यात आले होते काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत गिरोला व ग्रामपंचायत लंबाटोला यांचे मूळ गाव गिरोला या राजस्व गावांची निर्मिती करुन आमगांव तालुक्यात समाविष्ट करण्याची सततची मागणी आहे यावर शासनाने कोणती कार्यवाही केली,

(३) मा.जिल्हाधिकारी, गोंदिया ह्यांना मा.प्रधान सचिव (महसूल) यांना सदर गावांचे नामांतर गिरोला असे घोषित करण्यास हरकत नसल्याबाबतचे दिनांक ६ ऑगस्ट, २००२ चे पत्र दिले आहे त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर ( Write Petition no.4516, Dated 10 October, 2005 )ने शासनाला दिलेल्या आदेशावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) होय,

(२) या प्रकारची कोणतीही मागणी अथवा निवेदन जिल्हाधिकारी गोंदिया यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाहीत.

(३) व (४) भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार प्रकरणाची तपासणी केली असता गोंदिया तालुक्यात पांढराबोडी जवळ गिरोला या नावाचे दुसरे महसुली गांव अस्तित्वात आहे. लंबाटोला गावाचे नांव गिरोला केल्यास गोंदिया तालुक्यात गिरोला नावाची दोन गांवे अस्तित्वात येऊन संभ्रम निर्माण होईल. त्यामुळे याचिकाकर्त्यांची मागणी अमान्य करण्यात आली असून, त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आले आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, प्रश्न दोन व तीनच्या उत्तरात शासनाने जे नमूद केले आहे ते अगदी अमान्य करण्यासारखे आहे. जिल्हाधिका-यांचे पत्र, श्री.सुधाकर चव्हाण, उप सचिव यांचे पत्र, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांचे पत्र, जिल्हाधिकारी, गोंदिया यांचा अहवाल आणि संबंधित ग्राम पंचायतीने वारंवार केलेली मागणी, हे लक्षात घेता ते मान्य करता येण्यासारखे नाही.

सभापती महोदय, ख-या अर्थाने दिनांक 21/02/1072 रोजी या दोन गावांचे विभाजन करण्यात आले. गिरोला गाव हे मुख्य राजस्व गाव म्हणून आणि लंबाटोला ही गट ग्राम पंचायत

..4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र. ३१८५४ पुढे सुरु............</u>**

श्री.केशवराव मानकर.........

म्हणून या गावांची निर्मिती झाली. ही सर्व गावे गोंदिया तालुक्यात होती. या तालुक्याची फेररचना करण्यात आली. लंबाटोला हे गाव पूर्ववत गोंदिया तालुक्यात आले. गोदा, गिरोला व घाटोली यांच्या मध्ये असलेल्या लंबाटोला या गावाची निर्मिती झाली व हे गाव गोंदियामध्येच राहिले आहे. लंबाटोला येथील गावक-यांची व ग्रामपंचायतीची अशी मागणी आहे की, हे गाव 600 ते 700 लोकसंख्येचे छोटे गाव आहे, हे गाव आमगाव पंचायत समितीमध्ये समाविष्ट करावे. त्यामुळे शासन ही मागणी पूर्ण करणार काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे दिनांक 21/2/1972 रोजी या दोन गावांची विभागणी झाली आहे. गिरोला गावाची विभागणी करुन गिरोला व लंबाटोला अशा दोन गावांची निर्मिती केली आहे.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31854.........

डॉ.राजेंद्र शिंगणे ........

लंबाटोला हे गाव गोंदिया तालुक्यामध्ये आहे आणि गिरोला हे गाव आमगाव तालुक्यामध्ये आहे. दिनाक 2 मार्च, 1972 च्या राजपत्रात भंडारा जिल्हयातील गोंदिया तालुक्यातील दोन गावांचे विभाजन करण्यात आले आणि लंबाटोला या नवीन गावाची निर्मिती करण्यात आली. परंतु याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर देखील पत्रव्यवहार गिरोला याच नावाने होत होता. त्यामुळे लंबाटोला गावातील जनतेला शासकीय मदत व शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्यामुळे पुन्हा या गावाचे नाव गिरोला असे करावे, अशी ग्रामस्थांनी मागणी केली होती. गावाचे नाव बदलण्याचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांनी आयुक्तांकडे पुन्हा पाठविला होता. गावाचे नाव बदलण्यासंदर्भात भारत सरकारचे परिपत्रक आहे. त्या परिपत्रकानुसार 4-5 नियम ठरवून दिलेले आहेत. प्रामुख्याने गावाचे नाव बदलावयाचे असेल तर एकाच तालुक्यामध्ये दोन गावांची समान नावे येत असतील तर गावाच्या नावामध्ये बदल करु नये, असा नियम आहे. या गावाचे नाव बदलले तर एकाच तालुक्यामध्ये एकाच नावाची दोन गावे येऊ शकतात, म्हणून शासनाने हा प्रस्ताव अमान्य केलेला आहे.

---------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कोथरुडच्या मयुर कॉलनीत झोपड्यांना लागलेली आग

**(७) * २९८८५ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अरविंद सावंत :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १६ मे, २००७ रोजी वा त्यासुमारास पुणे जिल्ह्यातील कोथरुडच्या मयूर कॉलनीत लागलेल्या आगीत सुमारे २७ झोपड्या जळून खाक झाल्या हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर झोपड्यांना आग लागण्याची काय कारणे आहेत,
(३) असल्यास, आगीमुळे निराधार झालेल्या बाधितांना शासनाने काही आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) होय,
(२) सदरची आग आकस्मीकपणे लागली आहे,
(३) सदर आगीमूळे बाधीत झालेल्या २७ कुटूंबियांना रुपये १.०७ लाखाचे सानूग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, पुणे शहरामध्ये आग लागण्याच्या घटना अनेक वेळा घडत असतात. कोथरुडच्या मयुर कॉलनीमध्ये कोणत्या कारणामुळे आग लागली ? सिलेंडरमुळे आग लागली, शॉर्ट सर्किट झाल्यामुळे आग लागली, देवासमोर लावलेल्या दिव्याने पेट घेतल्यामुळे आग लागली अशा वेगवेगळया प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या आहेत. कोथरुडच्या मयुर कॉलनीतील झोपडपट्टीवासीय तात्पुरत्या घरांमध्ये राहत होते. त्या ठिकाणी ही आग लागलेली आहे. शासनाने उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "सदर आगीमुळे बाधित झालेल्या २७ कुटुंबियांना रुपये १.०७ लाखाचे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे." आग लागल्यानंतर त्या लोकांना किती दिवसात निधी आणि मदत दिली जाते ? कारण आग लागल्यानंतर १०-१५ दिवसांनी त्या लोकांना मदत मिळते, असे आमच्या निदर्शनास आले आहे. माझा प्रश्न असा आहे की, त्या लोकांना किती दिवसात निधी आणि मदत मिळणार आहे ? दोन वर्षापूर्वी पुण्यातील कासेवाडी झोपडपट्टीमध्ये आग लागली होती. बिल्डरने कासेवाडी झापडपट्टीची जमीन ताब्यात घेण्यासाठी केलेले हे कटकारस्थान होते, असे दिसते. दोन वर्षे होऊन सुध्दा अद्याप कासेवाडी झ ोपडपट्टीतील लोकांचे पुनर्वसन झालेले नाही. आग लागू नये म्हणून शासने कोणती पावले उचलली आहेत आणि तपासणीमध्ये काय आढळून आले आहे ?

..३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २९८८५ ..........

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, दिनांक १६ मे, २००७ रोजी पुणे जिल्हयातील कोथरुडच्या मयुर कॉलनीमध्ये ही आग लागलेली आहे. या आगीमध्ये २७ झोपडया जळून खाक झाल्या होत्या. मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना सांगू इच्छितो की, दिनांक १६ मे, २००७ रोजी आग लागल्यानंतर दिनांक १८ मे, २००७ रोजी त्या लोकांना १८ लाख रुपये सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे. शासनाच्या मदतीशिवाय संबंधित बिल्डरने सुध्दा ६-७ दिवस त्या लोकांची रहाण्याची, पिण्याच्या पाण्याची, जेवणाची व्यवस्था केली होती. आग का लागली याची पोलिसांनी चौकशी केली असता गॅस सिलेंडरमुळे आग लागली, असे प्रथम दर्शनी दिसून येते.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, गॅस सिलेंडरमुळे आग लागली असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. तसेच २७ कुटुंबांना सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे, असेही माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. या आगीमुळे एकूण किती लाखाचे नुकसान झाले. शासनाने जे अनुदान दिले ते प्रत्येक कुटुंबाला दिले की प्रत्येक व्यक्तीला दिले ? तेथील सर्व कुटुंबांना शासन अजून किती अनुदान देणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अशा घटना घडतात त्यावेळी शासनाच्या निकषानुसार मदत केली जाते. कुटुंबातील एका व्यक्तीला एक हजार रुपये याप्रमाणे पाच हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाते. यापूर्वी देखील शासनाने प्रत्येकी एक हजार रुपये याप्रमाणे अनुदान दिलेले आहे.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29885.....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कोथरुडच्या मयुर कॉलनीतील सर्व झोपडपट्टयांचे सर्वेक्षण झाले आहे का ? त्यांना फोटोपास देण्यात आले आहेत का ? या झोपडपट्टयांचे एस.आर.ए. योजनेअंतर्गत बांधकाम झालेले असल्यामुळे त्यांना मदत देण्यासाठी कोणता विकासक पुढे आला आहे का ? तसेच त्याने काही योजना सादर केलेल्या आहेत का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये हे लोक राहात होते. एस.आर.ए. योजनेंअंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात हया झोपडया उभ्या केल्या होत्या व त्या टेंपररी शेडला आग लागली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एस.आर.ए. योजनेअंतर्गत या झोपडया असतील तर शासनाने मदत देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. एस.आर.ए. योजनेत हया झोपडया असतील तर त्याची जबाबदारी उचलून सर्व खर्च विकासकाने केला पाहिजे. शासनाने स्वत: ही जबाबदारी घेऊ नये. हा 30 झोपडयांचा प्रश्न असून मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. झालेले नुकसान भरुन देणे व त्यांच्या निवासाची पर्यायी व्यवस्था करणे ही संबंधित विकासकाची जबाबदारी आहे. शासन त्यांची जबाबदारी का घेत आहे ? शासन व विकासकाचे काही साटेलोटे आहे का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अशा प्रकारे आपत्तीच्या आकस्मिक घटना घडतात तेव्हा शासनाकडून त्यांना तात्पुरती मदत दिली जाते. महाराष्ट्रात अशा प्रकारची मदत नेहमीच केली जाते. त्यांचे उघडयावर पडलेले संसार नीट उभे राहण्याकरिता व अडचणीच्या वेळी घरामध्ये जीवनावश्यक वस्तु मिळण्याकरिता मदत दिली जाते. शासनाने त्यांना मदत देऊन काही वेगळे केले आहे, अशातला भाग नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांचा प्रश्न असा आहे की, ही योजना एस.आर.ए. खाली असेल तर संबंधित विकासकाने मदत करणे गरजेचे आहे, याबाबत मंत्री महोदयांचे काय मत आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, शासनाने मदत केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सागितल्याप्रमाणे ही जबाबदारी विकासकाची असेल तर त्यांच्या माध्यमातूनसुध्दा वेगळी मदत करण्याचे निर्देश निश्चितपणे शासनाकडून दिले जातील.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29885.....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या योजनेतील विकासक कोण आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या आगीमध्ये 50 लाख 82 हजाराचे नुकसान झालेले आहे. या योजनेच्या विकासकाचे नाव सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. विकासकाचे नाव नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची परवानगी देण्यात यावी.

**सभापती** : ठीक आहे.

-----

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

**राज्यात ३५ जिल्ह्यांपैकी रत्नागिरी जिल्ह्यात सन २००६-२००७ मध्ये**
**फेरफार नोंदी बाकी असल्याबाबत**

**(८) * ३००९९ श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३५ जिल्ह्यापैंकी रत्नागिरी जिल्ह्यात २००६-२००७ या वर्षात सर्वात जास्त म्हणजे ३१३९२ जमिनीच्या फेरफार नोंदी बाकी आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर फेरफार नोंदीच्या प्रकरणाचा तातडीने निपटारा करण्यासाठी कोणती उपाययोजना व कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) नाही,
(२) विलंब झालेला नाही,
(३) व (४) विहित मुदतीत फेरफार नोंदीचा निपटारा होत असल्यामुळे, स्वतंत्र उपाययोजना करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील ३५ जिल्हयापैकी रत्नागिरी जिल्हयामध्ये सर्वात जास्त फेरफार नोंदी करणे बाकी आहे, हे खरे आहे का ? असा प्रश्न विचारल्यानंतर "नाही" असे उत्तर दिलेले आहे. परंतु माझ्याकडे आलेल्या माहितीनुसार ३१३९२ जमिनीच्या फेरफार नोंदी करणे बाकी आहे. असे असतानाही मंत्री महोदयांनी कोणत्या आधारावर "नाही" असे उत्तर दिले आहे. यातील किती प्रकरणे अद्याप बाकी आहेत ? याची माहिती मंत्री महोदय देतील का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयामध्ये फेरफाराच्या नोंदीबाबत सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी स्पेशिफिक प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या माहितीकरिता मी सांगू इच्छितो की, २००६-०७ मध्ये दिनांक ३१.३.२००७ पर्यत ३८३१० नोंदीपैकी ३६४२१ पूर्ण झालेल्या असून १८८९ नोंदी प्रलंबित होत्या. यापैकी २८ नोंदीमध्ये तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. २००७-०८ मध्ये उर्वरित १८८९ नोंदीचा निपटारा करण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्हयामध्ये २००६-०७ मधील कोणत्याही नोंदी करणे प्रलंबित नाही.

यानंतर श्री.सुंबरे.....

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 30099 ....

त्यामुळे अनिर्णित अशा प्रकारचे कुळांच्या नोंदी 2006-07 च्या रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये राहिलेल्या नाहीत.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, विहित मुदतीत फेरफार नोंदींचा निपटारा होत असल्याने स्वतंत्र उपाय योजना करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु या संदर्भात संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यामध्येच दोन प्रमुख अडचणी आहेत. ज्या जमिनींवरील नोंदी आहेत त्या एका उताऱ्यावर 100-100 लोकांची नावे असतात आणि तेथे जमिनीचे होल्डिंग हे कमी आहे त्यामुळे अनेक उतारे असतात. त्यामुळेच हा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे या ठिकाणी हे जे उत्तर दिलेले आहे ते साफ चुकीचे आहे. म्हणून यासाठी खास उपाय योजना करण्याची गरज आहे जेणे करून फेरफाराच्या नोंदी लवकर करता येईल, तरी त्या दृष्टीने शासन काय करणार आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी 2006-07 च्या बाबतीतील स्पेसिफिक प्रश्न विचारलेला होता. मी सुरूवातीस देखील उत्तर देताना याबाबत सांगितले आहे की, त्या वर्षातील नोंदी अनिर्णित राहिलेल्या नाहीत. मात्र सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली एक गोष्ट खरी आहे की, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या कोकणातील जिल्ह्यांमध्ये लॅण्ड होल्डिंग फार कमी आहे. आज सकाळीच या प्रश्नाच्या अनुषंगाने विभागाच्या अधिकाऱ्यांकडून मी माहिती घेतली तेव्हा एक गोष्ट लक्षात आली की, तेथे खरेदी-विक्रीच्या व्यवहारापेक्षाही वारसाहक्कांची प्रकरणे अधिक आहेत आणि त्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे ती विचारात घेऊन अनिर्णित नोंदींचा निपटारा करण्याच्या बाबतीत, .. कारण या वर्षीदेखील जवळपास 7240 नोंदी नव्याने तेथे दाखल झालेल्या आहेत. म्हणजे नवीन प्रकरणे अजूनही तेथे दाखल होत आहेत त्यामुळे या सर्वच प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने असलेल्या यंत्रणेमध्ये आवश्यकत तेथे वाढ करून लवकरात लवकर नोंदी निकालात काढण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी एकंदरीत राज्यातील एकट्या रत्नागिरी जिल्ह्यात 31392 जमिनींच्या फेरफाराच्या नोंदींच्या बाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. पण त्या मागील पार्श्वभूमी पाहता, लक्षात घेता हे उत्तर बरोबर वाटत नाही. खरे तर

....... यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुलकर्णी (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 30099 ....

हा बेदखल कुळांचा प्रश्न आहे आणि विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यात मुख्यत्वे करून व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही भागांमध्ये बेदखल कुळांचा हा प्रश्न अद्यापही मोठ्या प्रमाणात शिल्लक राहिलेला आहे. ज्या बेदखल कुळांना ते जमीन कसत असूनही, वहिवाट करीत असूनही ती जमीन त्यांना मिळालेली नाही, ती त्यांना मिळावी यासाठी शासनाने नियम केले, कायदा केला आणि अशा कुळांना ते कसत असलेली जमीन देण्याचा निर्णय घेऊन त्यांची नावे 7-12 उताऱ्यावर लावण्याचा तो प्रश्न होता. तेव्हा या निमित्ताने माझा नेमका प्रश्न असा आहे की, बेदखल कुळांची अशी किती प्रकरणे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये आपल्यासमोर आलेली आहेत आणि ती बेदखल कुळे असतील तर त्यांच्या बाबतीतील नोंदी, फेरफार पूर्ण झालेले आहेत काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी यांनी सांगितली ती गोष्ट खरी आहे. कोकणामध्ये बेदखल कुळांचा प्रश्न फार मोठा आहे आणि त्यांच्या नोंदींचा प्रश्न देखील फार मोठ्या प्रमाणात आहे. म्हणूनच मागील वर्षी आपले या बाबतीतील धोरण आपण जाहीर केलेले आहे आणि कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्ये या कुळांच्या नोंदी होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक खास कॅम्प घेण्यात येईल आणि त्यासत बेदखल कुळांच्या नोंदी घेण्याचे काम केले जाईल.

****

( यानंतर श्री. सरफरे ..... व्ही 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हस्तलिखित ७/१२ उताऱ्याची पध्दत बंद केल्याबाबत**

**(९) * ३०३२८ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. रमेश निकोसे , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. धनाजी साठे , श्री. चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगणीकृत ७/१२ चे उतारे देण्यात येत असल्याने हस्तलिखित ७/१२ उतारे देण्याची पध्दती माहे एप्रिल, २००७ वा त्यासुमारास बंद करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हस्तलिखित ७/१२ पध्दत बंद करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) होय, संगणकीकृत ७/१२ चे उतारे सक्तीचे केले नसल्यामुळे, हस्तलिखीत सातबारा देण्याची पध्दतही चालू आहे.

(२) राज्यातील संपूर्ण सातबाराचे संगणकीकरणाचे काम १००% केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत पूर्ण झ ालेले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार हस्तलिखीत ७/१२ बंद करुन संगणकीकृत सातबाराचे वाटप करणेचे आहे. तथापि, संगणकीकृत सातबारा देण्याची व्यवस्था तालुका स्तरापर्यंत उपलब्ध असल्याने मागणीनुसार हस्तलिखीत ७/१२ देण्याची पध्दत अजून सुरु ठेवलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, छापील उत्तराच्या दुसऱ्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, "केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार हस्तलिखित ७/१२ बंद करुन संगणकीकृत सातबाराचे वाटप करणेचे आहे. तथापि, संगणकीकृत सातबारा देण्याची व्यवस्था तालुका स्तरापर्यंत उपलब्ध असल्याने मागणीनुसार हस्तलिखित ७/१२ देण्याची पध्दत अजून सुरु ठेवलेली आहे". तेव्हा प्रश्न असा आहे की, हस्तलिखित ७/१२ बंद करण्यासंबंधी शासनाचे धोरण काय आहे? आणि केंद्र शासनाची मार्गदर्शक तत्वे काय आहेत?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, संगणकीकरणाच्या आजच्या युगामध्ये महसूल विभागाने केंद्र सरकारच्या माध्यमातून मिळालेले जवळपास १०० टक्के म्हणजे ३२ कोटी रुपये खर्च करुन सन २००५ पर्यंत २११ लाख ७/१२ च्या उताऱ्याचे संगणकीकरणाचे काम पूर्ण केले आहे. त्यामुळे सन १९८९ पासून २००५ सालापर्यंत संगणकीकृत ७/१२ चा उतारा प्रत्येक तहसिल कार्यालयामध्ये आपल्याला मिळतो. परंतु तालुक्यापासून दूर गावामध्ये रहाणाऱ्या माणसाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

*** ३०३२८ ...** डॉ.राजेंद्र शिंगणे.....

तालुक्याच्या ठिकाणी तहसिल कार्यालयामध्ये ७/१२ चा उतारा मिळविणे महाग ठरत होते. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये सुध्दा हस्तलिखित ७/१२ चा उतारा देण्याची पध्दत चालू ठेवली आहे. भविष्यात सुध्दा संगणकीकृत सातबाराच्या उताऱ्याबरोबर हस्तलिखित सातबाराचा उतारा देण्याचे काम त्या ठिकाणी सुरु राहील.

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, तालुक्याच्या मंडल कार्यालयामध्ये संगणकीकृत सातबाराचा उतारा देण्याबाबत शासन विचार करील काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, भविष्यातील शासनाची योजना तशीच आहे. आज आपण तालुका पातळीपर्यंत संगणकीकृत सातबाराचा उतारा देत आहोत. यापुढील काळात मंडल कार्यालयामध्ये देखील संगणकीकृत सातबाराचा उतारा देण्याबाबत आपण निश्चितपणे कार्यवाही करु.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, दहा वर्षापूर्वी घरपोच सातबाराचा उतारा देण्याची पध्दत सुरु होती. भविष्यात अशी पध्दत पुन्हा सुरु करण्यासंबंधी शासन कोणती पावले उचलणार आहे?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, युती सरकारच्या काळात माननीय सदस्य संबंधित खात्याचे राज्यमंत्री होते. त्यांच्या काळात सातबाराचा उतारा घरपोच देण्याची योजना सुरु होती. पुढील काळात ती योजना चालू ठेवण्यात आली नाही. माननीय सदस्यांचा आदर करुन सांगू इच्छितो की, त्या काळामध्ये चालू असलेल्या योजनेला लोकांचा कसा प्रतिसाद होता? आणि ते काम कशापध्दतीने करण्यात येत होते? तसेच, ती योजना पुन्हा सुरु केल्यास ती लोकांना फायदेशीर ठरेल काय? याचा विचार करुन आवश्यकता असल्यास यापुढील काळात सातबाराचा उतारा घरपोच देण्याबाबत शासन विचार करील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अनेक तालुक्याच्या ठिकाणी संगणकीकरणामुळे सुध्दा लोकांना सातबाराचे उतारे मिळाले नाहीत. तालुका स्तरावर सुरु असलेली ही व्यवस्था आपण गाव स्तरावर कां नेली नाही? लोकांना या सेवेचा लाभ कां मिळत नाही? केंद्र सरकार पुरस्कृत असलेल्या या योजनेची अंमलबजावणी आपल्या राज्यात झाली पाहिजे. याकरिता आपण ऑनलाईनची व्यवस्था अद्याप कां चालू केली नाही?

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30328 (पुढे सुरू....

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू...

संगणकाची सुरुवात केव्हा झाली आणि आजची सद्य:स्थिती काय आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, 1989 पासून संगणकाचे काम सुरु झालेले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये जवळपास 2 कोटी 11 लाख रुपये संगणकीकृत 7/12 चे उतारे देण्यामध्ये खर्च केलेले आहेत. संगणकाचे काम 1989 साली सुरु होऊन 2005 पर्यन्त काम झालेले आहे. 100 टक्के केंद्र सरकारच्या मदतीने हे काम केलेले आहे. यावर आतापर्यन्त 32 कोटी रुपये खर्च झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी संगणकीकृत 7/12 चे उतारे देण्याचे काम तालुका पातळीपर्यन्त, ग्रामपातळीपर्यन्त केव्हा पोहोचणार आहे ? असा प्रश्न उपस्थित केला. ग्राम पातळीपर्यन्त पोहोचण्याचा शासनाचा मानस आहे. मंडल पातळीपर्यन्त काम झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने ग्रामपातळीपर्यन्त देखील पोहोचणार आहोत. केंद्र सरकारच्या नॅशनल प्रोग्राम ऑन लॅन्ड रिसोर्सेस मॅनेजमेंट मार्फत 7/12 चे उतारे, तसेच लगतच्या जमिनीच्या सुधारित नकाशाची मागणी केल्यानंतर ताबडतोब देण्याची व्यवस्था केलेली आहे. सर्व रजिस्टार कार्यालये व तहसिल कार्यालये यांना संगणीकरणाने लिंकअप करण्याचे काम नॅशनल प्रोग्राम ऑन लॅन्ड रिसोर्सेस मॅनेजमेंट या योजनेमार्फत आखलेले आहे. या योजनेअंतर्गत सुरुवातीला पुणे आणि सिंधुदूर्ग जिल्ह्याची निवड केलेली आहे. यामध्ये 16 कोटी रुपये इतका खर्च केंद्र सरकार महाराष्ट्राला देणार आहे.

कर्नल सुधीर सावंत : तंत्रज्ञानाचा वापर लोकांच्या सेवेसाठी कसा आहे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे संगणक आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, खर्च कमी व्हावा म्हणून हस्तलिखित 7/12 चे उतारे देण्यात येतात. परंतु मी याच्याशी सहमत नाही. हस्तलिखित 7/12 चा उतारा हा महाग मिळतो. माझा प्रश्न आहे की, या संबंधाने आपण नवीन कार्यक्रम घेतलेला आहे त्यामध्ये ऑन लाईन 7/12 चा उतारा केव्हा मिळणार आहे ? या कार्यक्रमाची केव्हापर्यन्त अंमलबजावणी होणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : ऑन लाईन 7/12 चे उतारे देण्याचे काम सुरू झालेले आहे. आज मुंबईमधून संगणकावर कोणत्याही तहसिल कार्यालयातील ऑनलाईन उतारा मिळू शकतो.

श्री.प्रकाश शेंडगे : ऑनलाईन 7/12 चा उतारा देण्यास सुरू झालेली आहे,त्याबरोबरच 8-अ चा उताराही ऑनलाईन उपलब्ध करून देणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.30328..

डॉ.राजेंद्र शिंगणे : सातबाराच्या उताऱ्याबरोबर 8-अ चा उताराही उपलब्ध करून देणार आहोत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : प्रश्न असा विचारलेला होता की, संगणकीकृत 7/12 चे उतारे देण्यात येत असल्याने हस्तलिखित 7/12 उतारे देण्याची पध्दती माहे एप्रिल,2007 वा त्यासुमारास बंद करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय ? या उपप्रश्नाला उत्तर दिलेले नाही. सभापती महोदय, मालवणच्या तहसिलदारांकडे चौकशी केली तर त्या ठिकाणी 7/12 संगणकीकृत उतारा हा ग्राह्य धरला जात नाही तर तलाठी जे स्वत:च्या हस्ताक्षरामध्ये उतारे देतात,ते ग्राह्य धरले जातात असे आढळून येईल. संगणकीकृत 7/12 चा उतारा हा सप्लीमेंटरी म्हणून ग्राह्य धरला जातो. तहसिलदारांकडून चौकशी करून जर तसा दोष असेल तर त्यामध्ये सुधारणा करणार आहात काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अशाप्रकारची तक्रार मी पहिल्यांदाच ऐकलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतीत चौकशी केली जाईल आणि त्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले जातील.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, संगणकीकृत 7/12 चा उताऱ्यावर तलाठयांची सही व त्यावर शिक्का वगैरे नसतो. परंतु हस्तलिखित असलेल्या उताऱ्यावर तलाठ्यांची सही व शिक्का असतो त्यामुळे तो कोर्टामध्ये साक्षीपुराव्यामध्ये ग्राह्य मानला जाईल, तेव्हा यामध्ये काही सुधारणा करण्यात येणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : संगणकीकृत 7/12 चा उतारा हा हस्तलिखित उताऱ्याबरोबरच ग्राह्य धरलेला आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : महसूल विभागाच्या जिल्हा कार्यालयामध्ये, तालुक्याच्या कार्यालयांमध्ये संगणकीकृत 7/12 चा उतारा देण्याचे काम चालू आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30328 ............ डॉ. नीलम गोऱ्हे ......

पूर्वीची जी कार्यालये होती त्या ठिकाणी दर तासाला दोन व्यक्ती यावयाच्या आणि त्यांनी मागितलेले उतारे त्यांना दिले जात असत. परंतु आता ज्या ठिकाणी संगणक सेक्शन असतो त्या ठिकाणी 50-100 लोकांची रांग असते. काही कार्यालयांमध्ये मी स्वत: गेलेली आहे. त्या ठिकाणी संगणकावर उतारे दिले जातात. पूर्वीची जी कार्यालये आहेत त्यांना जागा वाढवून देणार काय की जेणेकरुन त्या ठिकाणी सातबाराचे उतारे घेण्यासाठी गेलेल्या लोकांची जी प्रचंड गर्दी होते त्यांची आणि अधिकारीवर्गाची थोडी सोय होऊ शकेल ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सेतू केंद्र सुरु केलेले आहेत. खाजगी लोकांना सेतू केंद्र भाडे तत्वावर देऊन त्यांच्या माध्यमातून लोकांना जे काही दाखले लागतात, मग सातबाराचे उतारे असतील, जातीचे दाखले असतील किंवा इतर दाखले असतील ते दाखले तालुक्याच्या ठिकाणी अशा प्रकारच्या सेतू केंद्रातून दिले जातात. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, काही ठिकाणी या सेतू केंद्राची जागा अपुरी पडते किंवा जागा लहान आहे. अनेक ठिकाणी तहसील कार्यालयामध्ये त्यांना छोट्या छोट्या जागा दिलेल्या आहेत. ज्यावेळी ॲडमिशन सुरु होते किंवा एखाद्या महत्वाच्या कामाच्या वेळी अनेक तालुक्यांच्या ठिकाणी गर्दी होते. विशेषत: पेरणीच्या हंगामाच्या वेळी शेतकऱ्यांना बँकेचे कर्ज घ्यावयाचे असते त्यासाठी त्यांना सातबाराच्या उताऱ्याची आवश्यकता असते. त्यावेळी प्रत्येक सेतू केंद्राच्या ठिकाणी गर्दी झालेली दिसून येते. म्हणून सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या ठिकाणी हे सर्व दाखले मिळतात त्या सेतू केंद्राची जागा वाढवून देण्याच्या संदर्भात शासनाने विचार केलेला आहे आणि याबाबतीत शासनामार्फत पॉझिटिव्ह निर्णय घेण्यात येईल.

-----

**तारांकित प्रश्न क्रमांक 33278**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूरातील खामला येथील सिंधी कॉलनी येथील**
**विस्थापितांना मालकी हक्काचे पट्टे देण्याबाबत**

**(११) * ३०००८ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री.केशवराव मानकर : तारांकित प्रश्न क्रमांक २५५०६ ला दिनांक ३० मार्च, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरातील खामला सिंधी कॉलनी येथे गेल्या ५८ वर्षापासून शरणार्थी म्हणून राहत असलेल्या विस्थापितांना नझुल विभागाकडून देण्यात आलेले भूखंडाचे नुतनीकरण व मालकी हक्काचे पट्टे अद्यापपावेतो करुन देण्यात आले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विस्थापितांना ते राहत असलेल्या जागेचे मालकी हक्काचे पट्टे ताब्यात देण्याबाबत माहे एप्रिल, २००७ च्या अधिवेशनात विधानपरिषद सभागृहात मा.राज्यमंत्री महसूल यांनी आश्वासन दिले आहे हे खरे आहे काय,

(३) उक्त प्रश्नी भाग (१) व (२) मधील प्रकरणी अद्यापपावेतो कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) व (३) नाही. तथापि पश्चिम पाकिस्तानातून विस्थापित झालेल्या आणि निर्वासीत म्हणून नागपूरात आलेल्या व्यक्तींपैकी आतापर्यंत २४४ व्यक्तींना स्थायी लीज पट्टे देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे २६३ व्यक्तींना शासन निर्णयानुसार अटींनुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. परंतु त्यांचेकडून अद्याप कागदपत्रे प्राप्त झालेली नसल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पाकिस्तानातून हे जे निर्वासित आले त्याचा प्रश्न गेल्या 58 वर्षापासून प्रलंबित आहे. या ठिकाणी दिलेल्या उत्तराप्रमाणे शासनाने 244 व्यक्तींना स्थायी लीज पट्टे दिलेले आहेत. ज्या 263 व्यक्तींनी अर्ज केलेले आहेत त्यांनी वेळोवेळी कागदपत्रे दिलेली आहेत. या ठिकाणी देण्यात आलेले उत्तर सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. या 263 व्यक्तींनी सर्व कागदपत्रे दिलेली आहेत परंतु दरवेळी निर्णय घेतला जात नाही. अनेक वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. म्हणून याबाबतीत जनता दरबार सारखा कार्यक्रम घ्यावा. त्या व्यक्तींना बोलवावे आणि जी काही कागदपत्रे पाहिजे असतील ती मागवून घ्यावीत आणि ही प्रकरणे निकाली काढावीत. हा प्रश्न 30 ते 40 वर्षे असाच पडलेला आहे. सर्व कागदपत्रे दिली असतील तर प्रोसीजन निश्चित करुन शासन हा प्रश्न केव्हा निकाली काढणार ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT

ता. प्र. क्र. 30008 .......

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे हा प्रश्न वारंवार या सभागृहामध्ये येत आहे, ही गोष्ट खरी आहे. मागच्या अधिवेशनामध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी लक्षवेधी सूचनेव्दारे हा प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देत असताना मी सांगितले होते की, यामध्ये ज्या अडचणी येत आहेत त्यामध्ये प्रामुख्याने त्या ठिकाणी कागदपत्रांची पूर्तता होत नाही. खरे म्हटले तर 507 लोकांपैकी 244 लोकांना स्थायी लीज पट्टे दिलेले आहेत. 263 लोक शिल्लक राहतात. प्रत्यक्षात पाहिले तर 1997 मध्ये 269 लोक त्या ठिकाणी जास्तीचे आढळून आले. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व कागदपत्रांची पूर्तता झाली असेल तर त्यांना ताबडतोब पट्टे देण्यास काही अडचण नाही.

श्री. नितीन गडकरी : ही कागदपत्रे असतानाही देखील जिल्हा परिषदेने कळविलेले आहे. ही कागदपत्रे घेऊन या अशी नोटीस शासनाने प्रत्येकाला द्यावी तसेच कोणत्या तरी तारखेला जनता दरबार ध्यावा. त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना बसवावे. जेवढे लोक येतील आणि ज्यांची कागदपत्रे पूर्ण असतील ती प्रकरणे निकाली काढावीत. पुढच्या अधिवेशनात हा प्रश्न विचारण्याची वेळ येऊ देऊ नये. याप्रमाणे शासन कार्यवाही करणार काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आजच जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातील. पुढच्या 15 दिवसामध्ये त्यांनी कागदपत्रे आणावीत. 15 दिवसामध्ये त्या ठिकाणी एक वेगळा कॅम्प घेतला जावा. त्या माध्यमातून सर्व कागदपत्रे सादर करावीत. जे जे लोक 15 दिवसात कागदपत्रे देतील त्यांना पट्टे देण्याचा निर्णय शासन घेईल.

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांचा आभारी आहे. प्रत्यक्षात सिंधी कॉलनी माझ्या घराच्या समोर आहे. 58 वर्षापासून ते त्या ठिकाणी राहात आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे आपण कॅम्प घेण्याचा शब्द दिलेला आहे. माझी एवढीच विनंती आहे की, आपण हा कॅम्प 15 दिवात घ्यावा. पुढील अधिवेशनात हा प्रश्न विचारण्याची वेळ आमच्यावर येऊ नये. शासन 15 दिवसात हा कॅम्प घेणार काय ?

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 30008....

डॉ. राजेंद्र शिंगणे : हा प्रश्न सुटावा यासाठी शासन सुध्दा प्रयत्नशील आहे. 369 लोकांचा प्रश्न सोडवित असताना शासनाने त्याबाबतीत एक योजना केली होती. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या माहितीसाठी मी सांगू इचिछतो की , दि. 1.5.1964 पूर्वीची जी अतिक्रमणे असतील त्यांना 200 रुपये ऑक्युपन्सी प्राईस, म्हणजे 200 रुपये दंड भरुन आणि 1964 नंतर ज्यांचे अतिक्रमण असेल त्यांना त्यावेळची मार्केट प्राईस अधिक व्याज भरुन हे लिज पट्टे देण्यात येणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे निश्चितपणे 15 दिवसात एक कॅम्पेन हाती घेऊन हा प्रश्न निकालात काढला जाईल.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्रश्न, लक्षवेधी इत्यादी बाबत घ्यावयाच्या बैठकीबाबत घोषणा**

**सभापती** : मी एक घोषणा करतो. आज दुपारी 3.30 वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे विधानपरिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांची एक मिटींग आयोजित केली होती. प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना, नियम 93 अन्वयेच्या सूचना इत्यादी बाबत ही मिटींग बोलावण्यात आलेली होती. सदरहू मिटींग ही आज दुपारी 3.30 वा. घेण्याऐवजी आजचे सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर घेण्यात येईल....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी खेदपूर्वक बोलत आहे. आज आपण सकाळी 1 तास नियम 93अन्वयेच्या सूचनांच्या मेरिट-डिमेरिटवर चर्चा केली. ही चर्चा आपण मिटींगच्यावेळी देखील करु शकलो असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अवमानाबद्दल या ठिकाणी मी प्रश्न उपस्थित केला...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी बोलण्याची परवानगी दिलेली नाही.

श्री. दिवाकर रावते : आज मिटींग असताना देखील त्या विषयावर आज 1 तास चर्चा करण्यात आली. सभापती महोदय, मला माफ करावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी असे म्हणणे इष्ट नाही. सन्माननीय सदस्यांनी जो विषय सदनामध्ये उपस्थित केला होत्या त्यावर मी 1 तासाची चर्चा दिलेली आहे...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला माफ करावे, माझी चूक झाली...

**सभापती** : शिवछत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे दैवत आहे. त्या दैवताच्या अनुषंगाने सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्यानंतर मी माझा निर्णय दिला. आज मी या विषयासाठी 1 तासाची चर्चा दिलेली आहे. या व्यतिरिक्त काही विषय सदनामध्ये उपस्थित करण्यात आले. त्यामध्ये नियम 289चा विषय प्रथम उपस्थित करण्यात आला. त्यानंतर नियम 93च्या सूचनांचा विषय उपस्थित करण्यात आला. जेव्हा विरोधी पक्षाचे दोन-पाच सन्माननीय सदस्य बोलतात त्यावेळी सत्ताधारी पक्षाचे देखील एक-दोन सदस्य बोलतात. या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती...

ठिकाणी नियम 93च्या सूचनांसंबंधी अनेक सन्माननीय सदस्य बोलले. जेव्हा नियम 93च्या सूचनांसंबंधी सन्माननीय सदस्य बोलत होते त्याच वेळी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले असते की, आज वेगळी मिटींग ठेवलेली असून त्यावेळी ही चर्चा करु, तर मग ती चर्चा थांबली असती. मी सदनाच्या भावना समजून घेत असताना सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 च्या संदर्भात माझे लक्ष वेधले, ही वस्तुस्थिती आहे. त्या अनुषंगाने चर्चा वाढली. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे सांगितले ते चुकीचे नव्हते. त्यांनी इतकेच सांगितले की, प्रत्येक वेळी नियम 289चे आयुध वापरले तर ते ब्लण्ट होईल. आपणा सर्वांचे म्हणणे सुध्दा तेच होते. नियम 289 अन्वयेचा विषय जर दालनात स्वीकारला नाही तर अन्य आयुधांच्या माध्यमातून त्या विषयाकडे सन्माननीय सदस्य शासनाचे लक्ष वेधू शकतात. नियम 93च्या सूचनांबाबत चर्चा झाली. ती चर्चा किती महत्वाची आहे हे सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी देशमुख सांगत असताना त्यांनी असे सांगितले की, नियम 93अन्वयेच्या सूचने द्वारे सन्माननीय सदस्य शॉर्ट डयुरेशनमध्ये माझे, संबंधित मंत्र्यांचे आणि शासनाचे लक्ष वेधू शकतात. एकंदरीत ॲकेडेमिक चर्चा झाली....

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्यावर हेत्वारोप केले जात आहेत.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, नियम 289 अन्वये जो संदर्भ या सभागृहामध्ये मांडला गेला त्यावेळेला आपण सांगितले की, सरकारच्या वतीने निवेदन करण्यात येईल आणि आपण असाही निर्णय दिला की, निवेदन करण्याऐवजी मी या संदर्भातील एक तासाची चर्चा घेईन आणि त्यावेळेस तो विषय तेथेच संपला. त्यानंतरच्या काळामध्ये नियम 93 अन्वयेचा विषय निघाला व त्याबाबत प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या अनेक प्रकारची वक्तव्ये केली. यासदंर्भात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना एवढीच विनंती आहे की, त्यांनी याचा तसा अर्थ कसा लावला ? छत्रपती शिवाजी महाराजांच्या अपमानासंदर्भातील नियम 289 अन्वयेची सूचना असतांना देखील त्यावर चर्चा घेण्यात येत नाही व या सूचनेला कुठेतरी बगल देण्यासाठी हा नियम 93 व नियम 289च्या चर्चेबाबतचा विषय येथे आणला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अपमानासंदर्भातील सूचनेचे कोणालाही गांभीर्य नाही अशी कोणत्याही प्रकारची सभागृहाची भूमिका नव्हती आणि यापुढेही असणार नाही. सभापती महोदय, यासंदर्भात आपण रेकॉर्ड तपासून पाहावे. सभापती महोदयांनी निर्णय दिला की, यासंदर्भात एक तासाची चर्चा घेण्याचे मान्य केले त्यावेळेस विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उठून उभे राहिले आणि म्हणाले की, यासंदर्भात आजच शासनाकडून निवेदनझाले पाहिजे म्हणून यासंदर्भात निवेदन देण्याऐवजी आपण एक तासाची विस्तृत चर्चा आयोजित केलेली आहे त्याबाबत....

(गोंधळ)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, औकाफच्यासंदर्भात ज्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांवर आरोप झाले, त्यावेळी आपण लगेच सांगितले की........

(गोंधळ)

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हे सभागृह आपल्या आदेशांवर चालते आणि अशी जर पध्दत असेल की, सभापतींच्या निर्णयावर आपण पुन्हा चर्चा करीत असू तर ती बाब योग्य नाही,असे मला वाटते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी यासंदर्भातील चर्चेवर आक्षेप घेतलेला नाही आपण समजून घ्यावे म्हणून मी बोललो की, माझ्यावर हेत्वारोप होत आहेत. सभापती महोदांनी सांगितले की, मी यासंदर्भात मध्यवर्ती सभागृहामध्ये तीन वाजता बैठक घेणार होतो आणि त्या

Z - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

बैठकीचे मुद्देही सांगितले की, प्रश्नोत्तरे,नियम 93 अन्वयेच्या सूचना,नियम 289 अन्वयेच्या सूचना वगैरे वगैरे. मग माननीय सभापती महोदयांनी अशा प्रकारची विस्तृत चर्चा जर या सदनातील सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांना घेऊन मध्यवर्ती सभागृहामध्ये ठेवलेली असेल ज्यावेळेला सांगितले की, या ज्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेच्या मेरिट्सच्या संदर्भात चर्चा होत असेल तर यासंदर्भात मध्यवर्ती सभागृहामध्ये एक विस्तृत चर्चा आयोजित केलेली आहे त्यावेळी ही चर्चा सविस्तरपणाने आपण करु असे सांगावयाला पाहिजे. त्यानंतर माननीय सभापती महोदय म्हणाले की, प्रश्नोत्तराची एकूण 57 मिनिटे झालेली आहेत, याचा अर्थ असा होतो की, नियम 289 व नियम 93 अन्वयेच्या सूचनांच्या चर्चेच्या संदर्भात चर्चा करण्यामध्ये सभागृहाच्या प्रश्नोत्तराच्या तासातील 57 मिनिटे वेळ गेला. माझे म्हणणे एवढेच होते की, नियम 289 व नियम 93 अन्वयेची चर्चा करावयाला एक बैठक ठेवलेली आहे व त्यामध्ये त्याबाबत चर्चा करतांना सवड असतांना देखील या सभागृहामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अवमानासंदर्भातील नियम 289 अन्वयेच्या चर्चेसारखा महत्वाचा मुद्दा आलेला असतांना तो चर्चेसाठी तातडीने घेणे महत्वाचे होते. प्रश्नोत्तराचा तास देखील थांबविला जाणे भाग होते सभापती महोदयांनी ही भावना व्यक्त करणे महत्वाचे होते. हीच भूमिका घेऊन या सन्माननीय सभागृहाने छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान झाल्याबाबत कडक निषेधाच्या भावना व्यक्त करणे भाग होते. सभापती महोदय, मी अत्यंत नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, औकाफसारख्या एखाद्या प्रकरणी जर माननीय मुख्यमंत्र्यांवर आरोप होतात असे म्हटल्यानंतर त्यासंदर्भातील चर्चेसाठी केव्हाही, कुठेही आपण लगेच तयार आहोत हीच आपली भूमिका छत्रपती शिवाजी महाराजांच्या अवमानासंदर्भातील नियम 289 अन्वयेच्या सूचनेवर चर्चा घेण्यासंदर्भात अपेक्षित होती. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान झाला असेल तर आपण लगेच सर्व कामकाज थांबवा आणि आताच यावरील चर्चा उपस्थित करा असे न म्हणता आपण ही चर्चा नंतर करु असे सांगितले, हे म्हणजे असे झाले की, " भोजन झाल्यावर आपण लढावयाला जाऊ." या चर्चेबाबत माझ ा आक्षेप नाही, ही जी चर्चा झाली आणि त्यामधून जे मुद्दे पुढे आले ते गौण होते असेही माझे म्हणणे नाही. या महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अपमानाच्या काहीही महत्वाचे असू शकत नाही, चर्चा असू शकत नाही,प्रश्न असू शकत नाही. सातबाराचे किंवा इतर प्रश्न पुढच्या अधिवेशनात आपण सोडवू शकतो. माझ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या

Z - 3



JPK/ MAP/ SBT प्रथम श्री. शिगम एम ....... 15:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

अस्तित्वावर घाला घातल्याबाबतच्या घटनेसंदर्भातील प्रश्न ज्यावेळी मी येथे प्रश्न उपस्थित करतो त्याबाबत फक्त बोलले जाते की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान सहन केला जाणार नाही परंतु ती वीरश्री कुठे गेली ? हा खरा महत्वाचा प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे. यासंदर्भात आपली भूमिका अशी पाहिजे होती की, यासंदर्भातील नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेवर आताच्या आता सर्व कामकाज थांबवून चर्चा करण्यात यावी पण ही भूमिका त्यावेळी समोर येत नव्हती. परंतु आपण नियम 93 आणि नियम 289 अन्वयेच्या सूचनेविषयी चर्चा मध्यवर्ती सभागृहामध्ये यासंदर्भामध्ये विस्तृत चर्चा आयोजित केलेली असतांना देखील त्यासंबंधी सभागृहामध्ये चर्चा घेण्यात आली. सदर चर्चेवर माझा आक्षेप नव्हता म्हणूनच मी म्हटले होते की, माझ्यावर हेत्वारोप केले जात आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेजी समजा विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये एखादा मुद्दा उपस्थित केला असता आणि त्यावर मी म्हटले असते की, यासंदर्भात सायंकाळी 6.00 वाजता मध्यवर्ती सभागृहामध्ये चर्चा घेण्यात येणार आहे तर ते गैर दिसले असते. विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेली एखादी मौलिक सूचनाही तेवढीच महत्वाची आहे. त्याचबरोबर आपण मांडलेला जो नियम 289 अन्वयेचा विषय होता त्या विषयाच्या अनुषंगाने ज्यावेळेला मी बोललो त्यावेळेला मी हेही सांगितले होते की, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे दैवत आहे आणि त्या दैवताबाबत लिखाण करतांना कोणालाही कोणत्याही पध्दतीने विषारी वक्तव्ये करता येणार नाहीत. या प्रवृत्तीने हे जे केले आहे, त्या अनुषंगाने आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर विषय नसला तरी मी यासंबंधी एक तासाची चर्चा मान्य करीत आहे.

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

त्यावर माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विचारल्यानंतर मी सांगितले की ही चर्चा आजच घेत आहोत. या चर्चेच्या अनुषंगाने त्यावेळी जो निर्णय घेतला गेला तो माननीय संसदीय कामकाजमंत्र्यांनी देखील मान्य केला......

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, चर्चेची वेळ मी ठरवीन असे आपण म्हणाला.

**सभापती** : उद्याही ही चर्चा घेता येईल असे मी म्हटल्यानंतर चर्चा आजच घ्यावी असा आग्रह धरला गेला. त्यावेळी मी सांगितले की आजच ही चर्चा सदनामध्ये घेऊ या. ज्यावेळी एखादा विषय सदनामध्ये चर्चेला येतो त्यावेळी काही माननीय सदस्यांना बोलू देणे आणि काही माननीय सदस्यांना बोलू न देणे हे बरोबर नाही. नियम 93 च्या बाबतीत सविस्तर चर्चा जरी मध्यवर्ती सभागृहामध्ये असली तरी नियम 93 च्यासंदर्भात काही मुद्यावर येथे जरी चर्चा झाली तरी त्यामध्ये फार काही गैर आहे असे मला वाटत नाही. आता शोक प्रस्ताव चर्चेला घेतला जाईल आणि त्यानंतर मी चर्चा उपस्थित करण्यासाठी परवानगी देतो.

----------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव.

**मु.शी.**: मरहुम अब्दुल रहेमान खान यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, मरहुम अब्दुल रहेमान खान, माजी विधान परिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोकप्रस्ताव मांडतो :-

" मरहुम अब्दुल रहेमान खान यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सभापती महोदय, मरहुम अब्दुल रहेमान खान यांचा जन्म 25 सप्टेंबर 1925 रोजी परभणी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.,एलएल.बी.पर्यंत झाले होते. मरहुम खान यांनी "तमीर ए-मिलान" या धार्मिक संस्थेचे अध्यक्ष, परभणी मित्रमंडळ, वाचनालय व शिवाजी महाविद्यालयाचे सचिव, परभणी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, इंदिरा गांधी शिक्षण संस्थेचे सदस्य, परभणी जिल्हा वक्फ समितीचे अध्यक्ष व मराठवाडा वक्फ बोर्डाचे सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले होते.

मरहुम खान हे सन 1962,1967,1974 मध्ये परभणी नगरपरिषदेचे सदस्य होते व काही काळ नगराध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

मरहुम खान यांनी आयुष्यभर सर्वधर्मसमभाव जोपासला होता. ते एक संवेदनशील साहित्यिक होते. "स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत" या त्यांच्या ग्रंथाला राज्यपुरस्कारही प्राप्त झाला होता.

मरहुम खान हे सन 1958 मध्ये मराठवाडा स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून व सन 1990 मध्ये राज्यपालांद्वारा नामनियुक्त सदस्य म्हणून विधानपरिषदेवर तर सन 1980 मध्ये परभणी मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवरही निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे व विचारवंताचे गुरुवार, दिनांक 26 जुलै 2007उ रोजी दु:खद निधन झाले.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, संसदीय कामकाजमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी मरहुम अब्दुल रहेमान खान यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. कै. खान यांचे वयाच्या 82 व्या वर्षी 26 जुलै,2007 रोजी दु:खद निधन झाले. कै.खान हे 1958 आणि 1990 मध्ये या सदनाचे सदस्य होते. परभणीसारख्या जिल्हयामध्ये त्यांचे आयुष्य गेले. शेती आणि शेतमजूर या विषयांशी त्यांचा जवळचा संबंध होता. रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचारासंबंधी ते अनेक वेळा सदनामध्ये बोलत असत. 1980 मध्ये ज्यावेळी ते विधानसभेवर निवडून आले होते त्यावेळी मी देखील विधानसभेचा सदस्य होतो. विधानसभेमध्ये त्यांची जी भाषणे होत असत त्यामध्ये विशेष करुन रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचारासंबंधी बोलताना आम्ही त्यांना बघितलेले आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

गावतळी, बंधारे, तलाव, रस्ते म्हणजे या देशाची मिळकत आहे असे ते म्हणत असत. त्यामुळे त्यांचे रक्षण करण्यावर त्यांचा भर असे. गावतळी, बंधारे, तलाव जर बुजले तर शेती आणि बागायतीचे खूप नुकसान होते म्हणून ते सुरक्षित राहण्यासाठी मरहुम खान हे सतत प्रयत्नशील असत. परभणी जिल्हयात रोहयो अंतर्गत जी कामे सुरु असायची, त्यांची ते स्वत: जातीने पाहणी करीत आणि भ्रष्टाचार रोखण्याचा प्रयत्न करीत असत. विविध संस्थांवर विशेषकरुन मराठवाड्यात आणि परभणी जिल्हयामध्ये काम करीत असताना ते सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानायचे आणि सर्वधर्मसमभाव जोपासत असत. अशा या वयोवृध्द ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक 26 जुलै, 2007 रोजी दु:खद निधन झाले. सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला समर्थन देतो आणि माझ्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, माननीय विधानकार्य मंत्री यांनी मरहुम अब्दूल रहेमान खान यांच्या देहावसानाबद्दल याठिकाणी शोक प्रस्ताव मांडला आहे, आमच्या पक्षातर्फे या शोक प्रस्तावाला मी पाठिंबा देतो. या सदनामध्ये मरहुम खान यांनी काही काळ काम केले होते. मरहुम अब्दूल खान हे सन 1962, 1967, 1974 मध्ये परभणी नगरपरिषदेचे सदस्य होते व काही काळ नगराध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्यांनी आयुष्यभर सर्वधर्मसमभाव जोपासला होता. ते संवेदनशील साहित्यिक होते. "स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत" या त्यांच्या ग्रंथाला राज्य पुरस्कार प्राप्त झाला होता. मरहुम खान हे 1980 मध्ये परभणी मतदारसंघातून विधानसभेवर निर्वाचित झाले होते. सन 1958 मध्ये मराठवाडा स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून आणि सन 1990 मध्ये राज्यपालांद्वारा नामनियुक्त सदस्य म्हणून त्यांनी विधानपरिषदेत काम केले होते. माझा त्यांच्याशी परिचय नव्हता ही वस्तुस्थिती आहे. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक 26 जुलै, 2007 रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दलचा शोकप्रस्ताव हे सभागृह मंजूर करीत आहे, त्यात आम्ही सर्व सदस्य सहभागी आहोत. धन्यवाद !

---------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींसाठी घटनेने एक विशेष तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी या सभागृहात निवडून येतात, त्यात मरहुम अब्दूल रहेमान हे एक या सभागृहाचे सदस्य होते. विशेषत: मराठवाड्याचे प्रश्न मांडण्यामध्ये ते अधिक सहभागी असत. त्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे या सभागृहात काम करण्याची त्यांना संधी मिळाली. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याबद्दल मी सद्‌भावना व्यक्त करुन मरहुम अब्दूल रहेमान खान यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुळकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, संसदीय कार्यमंत्री सन्माननीय श्री.हर्षवर्धन पाटील यांनी या सदनाचे माजी सदस्य मरहुम अब्दूल रहेमान खान यांच्या दुःखद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्या प्रस्तावाचे माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मरहुम अब्दूल रहेमान खान यांनी या सभागृहाचे दोन वेळा सदस्य म्हणून काम केले होते. सन 1958 मध्ये मराठवाडा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून ते निवडून आले होते. सन 1990 मध्ये राज्यपालांद्वारे नामनियुक्त सदस्य म्हणून त्यांची या सभागृहात नियुक्ती झाली होती. सन 1980 मध्ये परभणी मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर ते निर्वाचित झाले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक 26 जुलै, 2007 रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल सन्माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला माझ्या वतीने आणि माझ्या पक्षाच्या वतीने समर्थन देऊन श्रध्दांजली अर्पण करतो.

-----------------------

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय संसदीय कामकाज मंत्री यांनी जो शोकप्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्या प्रस्तावाला सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंगजी फुंडकर यांनी पाठिंबा दिलेला आहे. या ठिकाणी मांडण्यात आलेल्या शोक प्रस्तावावर मी या ठिकाणी माझे विचार मांडणार आहे.

मरहुम अब्दूल रहेमान यांचा जन्म सप्टेंबर 1925 रोजी परभणी येथे झाला होता. त्यांचे शिक्षण बी.ए., एलएल.बी. पर्यंत झाले होते. त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनामध्ये विशेषत: मराठवाडयामध्ये मराठवाडा स्थानिक प्राधिकारी संस्था आणि त्यांनतरच्या काळामध्ये परभणी विभागातील लोकप्रतिनिधी म्हणून अनेक वर्ष काम केले होते. मरहुम अब्दूल रहेमान खान 1962, 1967 आणि 1974 मध्ये परभणी नगरपरिषदेचे सदस्य म्हणून काम केले होते तसेच त्यांनी नगराध्यक्षपदही भुषविले होते. मरहुम खान हे सन 1958 मध्ये मराठवाडा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून व सन 1990 मध्ये राज्यपालांद्वारा नामनियुक्त सदस्य म्हणून विधानपरिषदेवर तर सन 1980 मध्ये परभणी मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवरही निर्वाचित झाले होते.

एक अत्यंत ध्येयवादी, सर्वधर्मसमभाव हा विचार त्यांनी सातत्याने जोपासला होता. एक ज्येष्ठ नेता म्हणून त्यांचे नाव मराठवाडयामध्ये सातत्याने उज्वल राहील. "स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत" या त्यांच्या ग्रंथाला "राज्य पुरस्कार" ही प्राप्त झाला होता. असे या सदनाचे माजी सदस्य, समाजसेवक मरहुम अब्दूल रहेमान खान यांचे दु:खद निधन 26 जुलै, 2007 रोजी इ ाले. मरहुम अब्दूल रहेमान यांच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटूंबियांकडे पाठविण्यात येईल.

आता मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 3.22 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली. )

--------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 38 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली)

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : आता सभागृहामध्ये नियम 97 अन्वये चर्चा सुरु होईल. चर्चेस सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते सुरुवात करतील. एकत्रित चर्चेचा वेळ उत्तरासह एक तासाचा आहे. याबाबतीत माननीय सभापती महोदयांच्या दालनामध्ये बैठक होऊन या विषयावर प्रत्येक पक्षाचे एकच सन्माननीय सदस्य व तेही 5-7 मिनिटे बोलू शकतील, त्यानंतर माननीय मंत्रिमहोदय उत्तर देतील. असे सर्वानुमते मान्य करण्यात आले आहे. मी विनंती करतो की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी चर्चेस सुरुवात करावी.

नंतर श्री.रोझेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MAP/ KGS प्रथम श्री.पुरी.......... 15:55

**पृ.शी.**: रायगड जिल्हयातील एका महाविद्यालयामधील प्राध्यापकाने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल काढलेले बदनामीकारक उद्‌गार

**मु.शी.**: रायगड जिल्हयातील एका महाविद्यालयामधील प्राध्यापकाने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल काढलेले बदनामीकारक उद्‌गार या विषयावर श्री.दिवाकर रावते, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी एक तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :

"रायगड जिल्हयातील एका महाविद्यालयामधील एका प्राध्यापकाने नुकतेच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल काढलेले बदनामीकारक व अतिशय हीन उद्‌गार, त्यांचा अत्यंत उर्मट शब्दात उपमर्द करण्यात येणे, सदर प्राध्यापकाची कृती ही जेम्स लेन्सची पुनरावृत्ती असणे, याबाबत एका विद्यार्थ्याने आक्षेप घेतल्याने त्या विद्यार्थ्याला महाविद्यालयात येण्यास घालण्यात आलेली बंदी यामुळे मराठी भाषिकांच्या दुखावलेल्या भावना."

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अत्यंत खेदजनक असा प्रकार घडला, तो मांडण्याकरिता मी उभा राहिलो आहे. मनाला आनंददायी आहे, असे नाही, हे मांडल्यामुळे फार मोठी महान घटना मांडत आहे, अशातला भाग नाही, मोठेपणा घ्यावा, असेही नाही. असा प्रसंग आमच्यावर येणे, हे आमच्या जीवनातील दुर्देव आहे. छत्रपती शिवप्रभू हे केवळ महाराष्ट्राचे दैवत आहेत, असे नाही तर ते राष्ट्रपुरुष होते. शिवप्रभूंच्या संदर्भामध्ये काहीही दुर्देवी घटना घडली, चुकून वा नकळत घडली तरी आपल्या भावनांना एवढी ठेच पोहोचते की, भावना पराकोटीला जातात, हे क्षात्रतेज आहे, हा या संस्कृतिचा गुणधर्म आहे. आई-वडिलांबद्दल घडले तर एकवेळ आपण सहन करु शकतो, पण महाराजांबद्दल सहन होत नाही, एवढया तीव्र भावना, महाराजांबद्दल आहेत. म्हणून ही घटना घडली ती दुर्देवी तर आहे. महाराष्ट्रामध्ये जेम्स लेन्ससारखी अवलाद आली होती, त्याची चिरफाड झाली, किती व्यक्तव्ये झाली, काय घटना घडली ? महाराष्ट्रातील

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

कानाकोप-यातून ज्यांनी आयुष्यामध्ये पुस्तक हातामध्ये धरले नव्हते, त्यांच्याही भावना एवढया तीव्र होत्या, त्या छत्रपतींबद्दलची घटना असल्यामुळे. शिक्षितापासून ते अशिक्षितापर्यन्त छत्रपती सर्वांच्या हृदयामध्ये बसले आहेत. सदनामध्ये यासंदर्भातील चर्चा झाली. सन्माननीय सदस्या, डॉ.नीलम गो-हे यांनी माननीय मुख्यमंत्री सदनात उपस्थित असतांना असे आवाहन केले की, काही झाले तरी जेम्स लेन्स हिंदुस्थानमध्ये येऊ शकणार नाही, यासाठी त्याचा व्हिसा नाकारला गेला पाहिजे. त्याच तडफेने माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, होय, महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मी परराष्ट्र खात्याला सांगून व्हिसा दिला जाणार नाही, याकडे जातीने लक्ष घालतो. त्यातून काय निर्माण होईल की नाही, हा भाग वेगळा. पण ती अवलाद येता कामा नये, कारण हा भावनेचा प्रश्न आहे. जेन्स लेन यांनी छत्रपतींची निर्भत्सना करण्याचा प्रयत्न केला, सरकारने त्याची गंभीर दखल घेतली, सर्वोच्च न्यायालयामध्ये जी याचिका होती, ती फेटाळली गेली. दोष कुणाचा याच्या शोधात आपण पडलो नाही. गृहमंत्र्यांनी सांगितले, आम्हीही त्यावर तीव्र पडसाद उमटू दिले नाहीत. एवढाच आग्रह धरला की, सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला तो दिला, पण ही अवलाद महाराष्ट्रात येऊ देता कामा नये. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, निर्णय काहीही असला तरी जेम्स लेन्सच्या पुस्तकावर महाराष्ट्र राज्याची बंदी कायम राहील, येथे उभे राहूनच त्यांनी हे सांगितले. छत्रपतींबद्दलच्या आदराचा, अस्मितेचा, स्वाभिमानाचा हा एक अविष्कार आहे, जो आपण जपून वापरतो. छत्रपतींच्या नावाने राजकारण निर्माण होणार नाही, याची काळजी घेतो. परंतु, मला या ठिकाणी खेदाने म्हणावेसे वाटते की, सन्माननीय सदस्या, डॉ.नीलम गो-हे यांनी केलेली विनंती फुकट गेली. जेम्स लेन्सला या राज्यात नाकारले असले तरी जेम्स लेन्स या देशात क्लोन सोडून गेला आहे, बियाणे सोडून गेला आहे, जे सर्व नासवित आहेत, त्यांचे काय करायचे ? हा खरा प्रश्न आहे. ही कालची घटना घडली, यामुळे जी चिंतेची बाब निर्माण होणार आहे, ती मोठी गंभीर आहे. जनता शिक्षण मंडळ, अलिबाग ही आमच्या विधिमंडळाचे विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते, श्री.दत्ता पाटील यांची संस्था आहे. सध्या या संस्थेचा कारभार त्यांचे चिरंजीव, श्री.संजय पाटील हे बघत आहेत. मला अभिमान वाटतो की, घटना घडल्यानंतर त्यांनी या घटनेची तातडीने नोंद घेतली, आम्ही शिवप्रेमी आहोत, आम्ही ही घटना सहन करणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

यानंतर श्री.बोरले...........

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ......... 16:00

श्री.दिवाकर रावते ........

श्री.दत्ता पाटील यांच्यासारख्या व्यक्तिमत्वाकडून हेच उत्तर अपेक्षित होते. सभापती महोदय, काय घटना घडली ? टी.वाय.बी.ए.च्या वर्गामध्ये श्री.सुर्यवंशी नावाचे प्राध्यापक त्यांचा विषय शिकवित असतांना काही कारण नसतांना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल तोंडसुख घेण्यास सुरुवात केली. कदाचित असे तोंडसुख नेहमी घेतले जात असेल. पण शिक्षकापुढे काय बोलावे, अशी विद्यार्थ्यांना भिती असते. शिक्षक सांगतात तेच योग्य आहे. शिक्षकांसमोर कसे बोलावे, याचे विद्यार्थ्यांवर मानसिक दडपण असते. मला एका गोष्टीचा आनंद झाला. त्या वर्गातील एक विद्यार्थी उठून उभा राहिला आणि त्याने विरोध केला की, तुम्ही आमच्या छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल असे बोलू नका. परंतु जेम्स लेनचे वारस पुत्र, प्राध्यापक पुढे अजून बडबडले. त्यांना संताप आला. त्यांनी त्या विद्यार्थ्याला वर्गाच्या बाहेर काढले आणि दोन दिवस या विद्यार्थ्याला वर्गात बसू दिले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान सहन न झाल्यामुळे त्या विद्यार्थ्यांने त्या शिक्षकाला विनंती केली की, तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल असे बोलू नका. त्या विद्यार्थ्याने शिक्षकाला धमकी दिली नाही किंवा अरेरावीही केली नाही. त्या विद्यार्थ्याला दोन दिवस वर्गात बसू दिले नाही. त्या विद्यार्थ्याने स्वतःच्या हस्ताक्षरात प्राचार्यांना रितसर पत्र लिहिले. ते पत्र माझ्या हातात आहे. वर्गामध्ये जे घडले ते त्या विद्यार्थ्याने बाहेर कोठेही सांगितले नाही. एका विद्यार्थ्याने जे करावयास पाहिजे, ते त्या विद्यार्थ्याने केले. ती शाळा श्री.दत्ता पाटील यांची आहे. त्या शाळेतील एका शिक्षकाला रहावले नाही, म्हणून त्या शिक्षकाने त्या विद्यार्थ्याच्या पत्राची झेरॉक्स बाहेर काढली, ती झेरॉक्स माझ्या हातात आहे. सभापती महोदय, शिवप्रेमी सगळीकडे आहेत. यासंदर्भात वर्तमानपत्रांमध्ये बातम्या आल्या होत्या. महत्वाचे मुद्दे मांडण्यापूर्वी मी मुद्दाम सांगू इच्छितो की, ही घटना घडल्यानंतर यबाबत 25 तारखेच्या लोकसत्ता वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती. सकाळ वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती. कृषिवल, टाईम्स, मुंबई मित्र अशा अनेक वर्तमानपत्रांमध्ये बातम्या आल्या होत्या. रायगड जिल्हयातील शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अवमानाची घटना घडत असतांना त्याच वेळी महाराष्ट्राच्या सौ.प्रतिभाताई पाटील यांचा दिल्लीमध्ये सन्मान होत होता. त्यावेळी दिल्लीमध्ये सौ.प्रतिभाताई पाटील राष्ट्रपती पदाची शपथ घेत होत्या. एका बाजूला अभिमान

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ........

होता आणि दुस-या बाजूला दु:खाची डागणी देणारी बातमी होती. ही बातमी आल्यानंतर शासनाने याची नोंद घ्यावयास पाहिजे होती. त्या शाळेतील वर्गात काय घडले ? याची शासनाने नोंद घ्यावयास पाहिजे होती. सभापती महोदय, मी त्या विद्यार्थ्याची तक्रार वाचून दाखवितो. परंतु त्या शिक्षकाने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जे उद्गार काढले, ते मी वाचू शकणार नाही. मला ते सांगता येणार नाहीत. त्या विद्यार्थ्यांने लिहिलेले पत्र मी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील, माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना दाखविले. माननीय श्री.पतंगराव कदम यांना पत्र दाखविले असता त्यांनी जीभ बाहेर काढून हे फार गंभीर आहे, असे म्हणून ते निघून गेले. मी ते पत्र सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना सुध्दा दाखविले.

यानंतर श्री.गागरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

हे पत्र गंभीर स्वरुपाचे आहे, हे पत्र सभागृहात वाचल्यास कोणासही सहन होणार नाही म्हणून मी सभागृहात वाचू शकत नाही. परंतु यातील आक्षेपार्ह भाग सोडून पत्रातील काही भाग मी वाचून दाखवितो. पत्र लिहिणारा किशोर नथुराम काजारे हा टिळकांचा वारसा घेऊन निर्माण झालेला एक विद्यार्थी आहे. शासनाने या विद्यार्थ्याचा सन्मानाने सत्कार करावा. अशी तेजस्वी माणसे आपण जपली तर भविष्यात महाराष्ट्र घडेल. त्या कॉलेजमध्ये टी.वाय.बी.ए. वर्गात इंग्रजी साहित्य शिकणारा हा विद्यार्थी आहे. श्री.सुर्यवंशी या शिक्षकांविषयी त्या विद्यार्थ्याने तक्रार लिहिलेली आहे. "दिनांक 14.7.2007 रोजी श्री.सुर्यवंशी यांचे लेक्चर सुरु असताना मध्येच त्यांनी छत्रपती शिवरायांबद्दल असे उद्गार काढले की, छत्रपती शिवाजी हे एक लुटेरे होते" काही वर्षांपूर्वी पंडीत नेहरुंनी असेच उद्गार काढल्यानंतर त्यांना महाराष्ट्रात येणे मुश्किल झाले होते व त्यांनी माफी मागितल्यानंतर ते महाराष्ट्रात येऊ शकले होते. एवढे हे शब्द गंभीर होते. त्यांच्यानंतर आज हे शब्द माझ्या वाचनात आले आहेत. या पत्रातील पुढील मजकूर वाचतो "तदनंतर मी त्यांना विनंती केली, सर आपण कृपया या विषयावर कॉमेंट्स करु नका. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल मी तसेच महाराष्ट्रातील कोणीही व्यक्ती एक वाईट शब्दही ऐकू शकणार नाही" "So, Sir, please do not comment on this matter" टी.वाय. बी.ए. च्या विद्यार्थ्याने इंग्रजीतही त्यांना समजावून सांगितले. पुढे असे लिहिले आहे की, "माझे विधान ऐकल्यानंतर त्यांनी माझ्या विनंतीला न जुमानता पुन्हा दोन विधाने केली" यापुढील वाक्ये मी सभागृहात वाचली तर कोणीही ऐकू शकणार नाही इतकी भयानक वाक्ये त्यांनी म्हटलेली आहेत. पत्रात पुढे म्हटले आहे की, "त्यांची ही वाक्ये ऐकून मी त्यांचे लेक्चर सोडून बाहेर आलो. मी त्यांना विरोध केल्यामुळे त्यांना राग आल्याबद्दल पुढील दोन दिवस त्यांनी मला लेक्चरला बसू दिले नाही, म्हणून Head of the Department Mrs.Vishakha Patil यांच्याकडे, मी याबाबत तक्रार केली, पाटील मॅडम मला म्हणाल्या, "Mistake has been done by Mr.Suryawanshi Sir, he should not have to comment on this subject, so, I will discuss with Mr.Suryawanshi and tell you his reply." श्रीमती विशाखा पाटील यांनी प्रा.सुर्यवंशी यांच्याबरोबर चर्चा करुन मला

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

श्री.दिवाकर रावते .....

सांगितले की, "I have discussed with Mr.Suryawanshi and I also advised him not to comment on this type of subject, so you can attend his lecture from tomorrow". हे सांगून मॅडमने मला लेक्चरला बसण्याची परवानगी दिली. एक विद्यार्थी म्हणून माझी आपणास विनंती आहे की, श्री.सूर्यवंशी यांनी केलेला शिवरायांचा अवमान हा सर्व महाराष्ट्राचा अवमान आहे. मी आपणास विनंती करतो की, श्री.सूर्यवंशी यांनी केलेल्या अपराधासंबंधी योग्य ती कारवाई आपणातर्फे केली जावी". अशी तक्रार टी.वाय.बी.ए. च्या एका विद्यार्थ्यांनी केलेली आहे. या विद्यार्थ्याने इतर कोठेही बोंब मारलेली नाही. घडलेली घटना दिनांक 14.7.2007 ची असून दिनांक 25 व 27.7.2007 च्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली आहे. घडलेला प्रकार अत्यंत निंदनीय आहे, यावर फक्त मोठी चर्चा करुन उपयोग नाही. परंतु वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेले जनतेचे विचार आपल्या परवानगीने मी मुद्दाम वाचून दाखवितो. दैनिक कृषीवल या वर्तमानपत्रात "सूर्यवंशी सरांना धडा" या विषयावर संपादकीय लिहिले गेले आहे. त्यामध्ये शिक्षक कसे असावेत ? शाळेचा उद्देश काय असावा ? हे सर्व पहिल्या परिच्छेदात लिहिले आहे. यात म्हटले आहे की,

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

"... शिक्षकी व्यवसायाचे पावित्र्य माहीत नसलेली पोटार्थी मंडळी कुठे तरी चार पैशाची नोकरी हवी म्हणून शिक्षणाच्या या पवित्र्य व्यवसायात येतात आणि आपल्या कृत्याने शिक्षण क्षेत्रातील पावित्र्य संपुष्टात आणतात. अलिबाग येथील जे.एस.एम.कॉलेजमधील कोणी प्रा.एम.एस.सूर्यवंशी याच पंथातील असावेत. कॉलेजच्या व्यवस्थापनाने आपली नियुक्ती ज्ञानदानासाठी केली आहे याचे विस्मरण सूर्यवंशी यांना झाले आणि त्यांनी विषय सोडून छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलच अपशब्द वापरायला सुरूवात केली. इतिहासाचे विकृतीकरण करीत जेम्स लेनलादेखील मागे टाकील ... सभापती महोदय, मी मघाशी त्यांनी वापरलेले शब्द येथे का वाचून दाखविले नाहीत त्याचे हे कारण आहे. .... त्याने यात म्हटले आहे की, जेम्स लेनलाही मागे टाकील अशा प्रकारे प्रा. सूर्यवंशी यांनी मराठी मनाचे श्रद्धास्थान असलेल्या शिवरायांबद्दल अनुद्गार काढले. सूर्यवंशी यांनी आपल्या अकलेचे जे तारे तोडले आहेत ते अजाणतेमुळे नव्हेत तर जाणीवपूर्वक आणि शिवरायांबद्दल द्वेष मनात ठेवूनच त्यांनी वाह्यातपणाची ही बडबड केली आहे. प्रा. सूर्यवंशी यांना याची कल्पना असायला हवी होती की, आपण वर्गात जे सांगतो ते मुलांच्या मनावर कायम स्वरूपी कोरले जाते. गुरूजी जे सांगतात ते सत्यच असते अशी भाबडी समजूत बऱ्याच विद्यार्थ्यांची तसेच पालकांचीही असते. म्हणूनच गुरूजींनी सत्य आणि सत्यच कथन केले पाहिजे. समाज अगोदरच विविध कारणांनी दुभंगला आहे. त्याला सांधण्याची, किमान त्या दृष्टीने उद्याचा नागरिकांवर सुसंस्कार घडविण्याचे काम शिक्षकांनी करावे अशी अपेक्षा असताना सूर्यवंशी सारखे शिक्षक आगीत तेल ओतण्याचे काम करीत असतील, करणार असतील तर त्याची सरकारने गंभीर दखल घेतली पाहिजे. सूर्यवंशी यांनी शिवरायांबद्दल ज्या भाकडकथा वर्गात ऐकवल्या त्या त्यांना कोठून मिळाल्या होत्या ? सभापती महोदय, मी माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो की, याबाबतच्या चौकशी मध्ये नेमके काय असावे याबद्दल त्यांनी हे लिहिलेले आहे, ते आपण लक्षात घ्यावे. त्या सूर्यवंशी यांना जेम्स लेनचा फोन आला होता का ? बंदी घातलेले जेम्स लेनचे ते चोपडे त्यांना मिळाले होते का ? हे कळायला मार्ग नाही. पण या माणसाच्या रोमारोमामध्ये शिवरायांबद्दल द्वेष भरलेला आहे हे नक्की. .." सभापती महोदय, त्याहीपुढे जो मजकूर आहे तो महत्त्वाचा आहे. त्या तक्रारीत त्या मुलाने लिहिले आहे की, "... खाजगीत बोलतानादेखील सूर्यवंशी महाशय आपल्या अकलेचे असेच तारे तोडीत असतात असे आम्हाला सांगण्यात आले. विशिष्ट जातीचा उल्लेख

....... आयआय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करून शिवराळ पद्धतीची भाषा वापरायची, महापुरूषांबद्दल चिखलफेक करायची असे प्रकार सूर्यवंशी हे नेहमीच खाजगीमध्ये करतात असेही बोलले जाते. यापूर्वी देखील त्यांनी वर्गामध्ये असेच उपद्व्यापी वक्तव्य केलेले आहे. शेवटी विद्यार्थ्यांच्या सहनशीलतेलाही अंत असतो. जगात त्यांनीही काही प्रमाणात ज्ञान मिळविलेले असते. आपण शालेय जीवनात जे शिकलो, पुरस्काराने जे वाचले त्याचा विपर्यास करून जर कोणी काही सांगत असेल तर कॉलेजची मुले फार दिवस ते ऐकून घेणे शक्य नाही. जीएसएम मध्ये हेच घडले. सूर्यवंशींनी अतिरेक केला, मुले संतापली. आणि त्यांनी सूर्यवंशीच्या तोंडाला काळे फासले. अशा प्रकारे तोंडाला काळे फासणे, मारहाण करणे हे समर्थनीय नसले तरी सूर्यवंशी यांची खोड मोडणे आवश्यक होते. ..."

सभापती महोदय, या अग्रलेखातील काही मजकूर मी येथे वाचला आहे. त्यातून हे जे काही तेथे घडले आणि ते घडविणारा जो कोणी आहे त्याचे व्यक्तिमत्त्व कसे आहे याचे वर्णन आलेले आहे. सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही आणि तसे पाहिले तर हा जास्त बोलण्यासारखे विषयही नाही. मी या ठिकाणी माननीय उपमुख्य मंत्र्यांना अत्यंत नम्रपणे सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी पोलीस इन्स्पेक्टर श्री.गरूड नावाचेही एक व्यक्तिमत्त्व आहे. मी त्यांना त्यांच्या 9850810681 या भ्रमण ध्वनी क्रमांकावर संपर्क साधला आणि त्यांना हे सारे सांगून याबाबत तुम्ही काही कारवाई केली आहे का ? अशी विचारणा केली. मी 27 तारखेला दुपारी 2.15 वाजता त्यांच्याशी संपर्क साधून हे बोललो. त्यावर त्यांनी मला सांगितले की, याबाबत कारवाई करण्याचा काही संबंधच येत नाही, कारण आमच्याकडे याबाबत काही तक्रारच आलेली नाही. मी त्यांना त्यावर असेही म्हणालो की, वर्तमानपत्रामध्ये हे सारे आलेले असताना आणि कायदा व सुव्यवस्थेचा जेव्हा प्रश्न असतो तेव्हा आपण अशा प्रकरणी दखल घेऊन प्रतिबंधात्मक अटक करतो आणि जनतेच्या भावनांची दखल आपण घेतली असा संदेश त्यातून जातो. पण त्यांचे एकच म्हणणे होते की, आमच्याकडे याबाबत काहीही तक्रार आलेली नाही त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्नच येत नाही. मग मी त्या शाळेचे जे प्राचार्य श्री. गुरव म्हणून आहेत त्यांच्याशी त्यांच्या भ्रमणध्वनी क्र. 9226323288 यावर संपर्क साधून बोललो. त्यांनी मला सांगितले की, हो, हे सारे घडले आहे आणि त्यांनी माफी मागितली आहे. पण आमच्या शाळेची त्यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने चौकशी चालू आहे. हे जे काही घडले ते सत्य असले तरी त्या सर्व बाबत

...... आयआय 3 ....



KBS/ SBT/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 16.10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

आम्ही आमच्या पद्धतीने चौकशी करणार आहोत आणि दुसरे म्हणजे शासनाच्या अनुदानातून त्यांना पगार मिळतो आहे त्यामुळे आम्हाला याबद्दल शासनाला देखील जबाब द्यावा लागणार आहे. म्हणून आम्ही त्यांची रितसर चौकशी करून कारवाई करू. सभापती महोदय, हे सगळे घडत असताना, त्या पोलीस इन्स्पेक्टरला फोन करण्यात माझी चूक झाली असे मला आता वाटते आहे. त्यामुळे साहेब जागे झाले. उद्या विधीमंडळामध्ये हा प्रश्न येणार आणि मग मला त्याचे उत्तर द्यावे लागेल ही जाणीव त्यांना झाली आणि मग त्या शहाण्याने काय करावे ? त्यांनी कायद्याचा बडगा दाखविला. ..

( यानंतर श्री. सरफरे ..... जेजे 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

तो कायद्याचा बडगा दाखवून त्या विद्यार्थ्यांसहीत 200 जणांवर जमावबंदीचा गुन्हा नोंदविला. उद्या आबा तुम्हाला उत्तर द्यावयाचे झाले तर सरकारने याची नोंद घेतली आहे. ज्ञात आणि अज्ञात अशा 200 लोकांवर जमावबंदीचा गुन्हा दाखल केला आहे असे तुम्हाला सांगावे लागेल. हे विचित्र झाले आहे. मला सांगता की तक्रार आली नाही? माझ्याकडे एक सी.डी. आहे, त्यामध्ये घडलेल्या घटनेशी संबंधित असलेले प्राचार्य गरुड हे त्या ठिकाणी उभे आहेत. ते स्वत: श्री. सूर्यवंशी यांना घेऊन गेले अशी वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली. त्यांनी सर्व लोकांसमोर श्री. सूर्यवंशी यांच्या तोंडाला काळे फासून त्यांना अटक करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी घेऊन गेले व नंतर त्यांना सोडून दिले. या बाबतीत आपण म्हणता ते बरोबर आहे. या प्रकरणाची तक्रार करण्यात आली पाहिजे. त्या शिवाय कारवाई करता येत नाही. कारण हा कोर्ट-कचेरीचा मुद्दा आहे. हे अत्यंत दुर्देवी प्रकरण रायगड जिल्हयामध्ये झाले आहे. महाराजांच्या राजधानीमध्ये झाले आहे. यावरुन जेम्स लेन अजून मेलेला नाही तर तो महाराष्ट्रामध्ये जीवंत आहे. लोकमान्यांचा वारसा घेऊन एक विद्यार्थी याविरुध्द उभा रहातो म्हणून हे सर्व कळले. अशाप्रकारची वक्तव्ये करणारे जेम्स लेन या महाराष्ट्रामध्ये वावरत असतील हे आपल्याला माहीत नाही. या प्रकरणामधून अशा लोकांमध्ये वचक निर्माण होईल अशाप्रकारची कारवाई आपण करा व त्याला महाराष्ट्रामध्ये प्रसिध्दी द्या. आणि या महाराष्ट्रामध्ये मनामध्ये इच्छा असूनसुध्दा कुणी दुष्टाव्याने, कारस्थानाने कां होईना जातीय भावना भडकविण्यासाठी छत्रपतींचा पुन्हा वापर करणार नाही अशाप्रकारची जरब बसेल अशी कारवाई आपणाकडून होणे आवश्यक आहे. श्री. सूर्यवंशी यांचे काय करावयाचे हे आपण ठरवा. आज त्यांनी भीतीपोटी जाहीर केले आहे की, मी असे बोललो नव्हतो. परंतु तेथील मुलांनी कोर्टामध्ये जाऊन स्टँपपेपरवर ॲफिडेव्हिट करुन दिले आहे की, आम्ही त्या वर्गामध्ये होतो आणि आमच्यासमोर हे सर्व घडले आहे. अशाप्रकारचे वक्तव्य त्यांनी केले आहे. पुन्हा चोरावर मोर अशाप्रकारची परिस्थिती निर्माण होत आहे. अनेक आरोपी, दरोडेखोर, लुटारु सुटले तरी चालतील परंतु अशाप्रकारची अवलाद महाराष्ट्रामध्ये औषधाला सुध्दा शिल्लक रहाता कामा नये अशी मी नम्रपणे आपणास विनंती करतो. या प्रकरणामधून महाराष्ट्रामध्ये एक वेगळा संदेश जाईल. बारबालांपेक्षा जास्त चांगला संदेश जाण्याचे भाग्य आपल्याला मिळावे. अशाप्रकारची कारवाई आपण करु शकला तर तो इतिहास होईल, ती कारवाई आपण करावी अशी विनंती करतो. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

30-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) JJ 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,...

**उपसभापती** : माननीय सभापतींनी निर्णय दिल्याप्रमाणे या प्रस्तावावरील चर्चेमध्ये प्रत्येक पक्षाच्या वतीने एकाच माननीय सदस्यांनी बोलावयाचे असे ठरले आहे. माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांना बोलण्यास परवानगी दिली तर सर्वच पक्षांच्या माननीय सदस्यांकडून भाषण करण्यासाठी संधी द्यावी म्हणून मागणी करण्यात येईल आणि ती आपल्याला नाकारता येणार नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे नाव व सही आहे. त्यामुळे या प्रकरणामध्ये काय घडले आहे यासंबंधीचे मुद्दे मला याठिकाणी मांडले पाहिजेत.

**उपसभापती** : या संदर्भात माननीय सभापतींनी निर्णय दिलेला आहे, व तो सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी मान्य केलेला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावावरील चर्चेची मागणी केली व तिला आपण मान्यता दिली. त्यामुळे अतिशय गंभीर अशा विषयावर या सदनामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आली आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे हा चर्चेचा विषय होऊ शकत नाही. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडलेल्या मुद्दयांची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु घडलेली घटना ही अतिशय वाईट व दुर्दैवी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या महाराष्ट्रामध्ये त्यांचा अवमान करण्याची हिंमत जेम्स लेन नंतर पुन्हा होऊ पहात आहे. जेम्स लेन हा परदेशी होता, याबाबतीत मी फार मागे जाणार नाही व जेम्स लेन या विषयावर पुन्हा चर्चा करणार नाही. परंतु जेम्स लेनने छत्रपतींविषयी काही वक्तव्य केले.....

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाडुरंग फुंडकर (पुढे सुरु....

आणि तो सहीसलामत हिंदुस्थानातून निघून गेला. त्याच्या पुस्तकावर सुरुवातीला महाराष्ट्र सरकारने बंदी आणली. पण काही अवलाद अशी निघाली की, ते पुस्तकावरील बंदी उठविण्यासाठी न्यायालयात गेले. न्यायालयामध्ये आपण कमजोर पडलो, म्हणून सर्वोच्च न्यायालयाने आपला अर्ज फेटाळला. परंतु सरकारने त्या पुस्तकावर बंदी आणण्याची हिंमत केली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी मघाशी सांगितले की, जेम्स लेनला व्हिसा द्या, त्याला परत हिंदुस्तानात येऊ द्या. या त्यांच्या मताशी मी सहमत नाही. ज्या अवलादिने छत्रपतींचा अवमान केला. शिवछत्रपती हे महाराष्ट्राचाच नव्हे तर हिंदुस्थानचा स्वाभिमान होते, ते हिंदुस्थानचे दैवत आहेत, त्या दैवताचा त्यांनी अपमान केला, त्याला हिंदुस्थानात येण्याची परवानगी द्यावी असे सन्माननीय सदस्य कशासाठी बोलले, हे मला समजले नाही. कोणा व्यक्तीने अवमान करावा असे नाही तर ती एक प्रकारची प्रवृत्ती आहे, हे मी मघाशी देखील बोललेलो आहे. श्री. सूर्यवंशीच्या माध्यमातून जेम्स लेनच्या प्रवृत्तीने तोंड वर काढले. अशा प्रवृत्ती समोर येत असतील आणि जाणूनबुजून आमच्या श्रध्दास्थानावर घाला घालण्याचा प्रयत्न करणार असतील, तसे हिंदुस्थानामध्ये षड्यंत्र कोणी रचत असेल तर ते शोधले पाहिजे. आमच्या श्रध्दास्थानाचा अवमान करायचा आणि हिंदुस्थानची कायदा आणि सुव्यवस्था खिळखिळी करावयाची, असा प्रकार झालेला आहे. पाठ्यपुस्तक मंडळाने तर शिवछत्रपतींचा धडाच गाळून टाकलेला आहे. हे कशाचे द्योतक आहे ? पाठ्यपुस्तक मंडळाकडून शिवछत्रपतींचा धडा गाळून टाकला जातो आणि अमिताभ बच्चन यांचा डायलॉग पुस्तकामध्ये अंतर्भूत केला जातो, या प्रवृत्ती ठेचल्या पाहिजेत.

सभापती महोदय, मी भाषण करणार नाही, भाषण करण्याचा हा विषय नाही. याची गांभीर्याने चौकशी करून ताबडतोब निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. हिंदुस्थानामध्ये इंग्रजांच्या काळामध्ये लॉर्ड मेकॉले हा शिक्षण तज्ज्ञ होता. त्याने भारतीयांच्या मनातून राष्ट्रीय पुरूषांबद्दल तिरस्कार कसा निर्माण होईल या दृष्टीने सतत प्रयत्न केला. तोच परिपाठ आज येथे चालला आहे. आज देश स्वतंत्र झाला, इंग्रज या देशातून निघून गेले. स्वातंत्र्याला 60 वर्षे झाली तरी छत्रपती शिवयायांची गौरव गाथा 350-400 वर्षे चाललेली आहे. असे असूनही महाराष्ट्रात छत्रपतींचा अवमान करण्याची हिंमत करणारे अवलादी जिवंत असतील तर असे म्हणावे लागेल की, छत्रपतींच्या महाराष्ट्रातील माणसे षंढ झाली आहेत काय ? अशी हिंमत होणार नाही अशाप्रकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरग फुंडकर (पुढे सुरू.....

कारवाई सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो. यासाठी वेळ लावू नका. आपण नेहमीप्रमाणे चौकशी करण्यासाठी एखादा अधिकारी नेमणार, त्या अधिकाऱ्याचा अहवाल आल्यानंतर कारवाई करणार. अशी लेंदी कार्यवाही करण्याचा हा विषय नाही. अशाप्रकारचा महाराष्ट्रात मेसेज गेला तर महाराष्ट्र एका क्षणात पेटून उठेल, हे सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी सांगितले, त्याप्रमाणे अशाप्रकारचा महाराष्ट्रामध्ये उद्रेक होऊ शकतो. म्हणून शक्यतो हे अधिवेशन संपण्याच्यापूर्वी याबाबतची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केल्याचे जाहीर करावे. जे कोणी श्री.सूर्यवंशी आहेत, ते स्वत:ला शहाणे समजणारे आहेत. श्री.पाटील साहेबांच्या वर्तमानपत्रामध्ये त्यांनी अग्रलेख लिहिलेला आहे.

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

कोण हा सूर्यवंशी ? एक शिक्षक, जो या छत्रपतींच्या राज्यामध्ये राहतो, जो या ठिकाणी जन्मला, जो येथील अन्न खातो, जो येथील अन्नावर जगतो तो छत्रपतींचा अशा पध्दतीने अवमान करण्याची हिंमत करीत असेल तर कोण हा सूर्यवंशी ? त्याच्या पाठीमागे कोणती प्रवृत्ती आहे हे आबासाहेब आपण शोधून काढावे आणि पुन्हा या महाराष्ट्राच्या विधिमंडळात छत्रपतींचा अवमान झाल्याबद्दलची चर्चा होणार नाही अशा पध्दतीची कारवाई आपण करावी एवढीच अपेक्षा व्यक्त करतो. मी याबाबतीत एवढेही बोलणार नव्हतो. मी आपल्याला विनंती करतो की, आबासाहेब आपण याची ताबडतोब चौकशी करावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

**उपसभापती** : यानंतर एकूण 3 सन्माननीय सदस्य बोलावयाचे राहिलेले आहेत. त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री जितेंद्र आव्हाड, उल्हास पवार आणि कपिल पाटील यांची नावे आहेत. सायंकाळी 5.00 वाजता ही चर्चा संपवावयाची आहे. माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरासाठी किती वेळ लागणार आहे ?

श्री. आर. आर. पाटील : मला 15 मिनिटे लागतील.

**उपसभापती** : उरलेल्या साधारणत: 14 मिनिटांमध्ये सन्माननीय सदस्यांची भाषणे संपवावयाची आहेत. त्यादृष्टीने प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी पाच मिनिटांपेक्षा अधिक वेळ बोलू नये अशी मी विनंती करतो. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड बोलतील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर कै. यशवंतरावजी चव्हाण मुख्यमंत्री झाले. ते मुख्यमंत्री झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माच्या काळावरुन काही इतिहास तज्ज्ञांमध्ये मतभेद झाले. त्यांनी इतिहास तज्ज्ञांची बैठक घेतली आणि सांगितले की, कोठलाही इतिहास लिहिताना येथील सामाजिक समीकरण बिघडणार नाही, सामाजिक समतोल बिघडणार नाही याची काळजी घेऊनच इतिहास लिहिला गेला पाहिजे. त्यानंतर तो वाद महाराष्ट्रापुरता तरी थांबला होता. जेम्स लेन प्रकरणानंतर तो वाद नव्याने उदयास आला. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब यांना सांगू इच्छितो की, त्यांना व्हिसा द्या असे मी म्हणालो त्याची अनेक कारणे आहेत. जेम्स लेन हा काही नावाजलेला इतिहास तज्ज्ञ नाही. इतिहासाबद्दलची आवड असल्या कारणाने परदेशातून भांडारकर इन्स्टिटय़ूटमध्ये आलेली ती व्यक्ती होती. भांडारकर इन्स्टिटय़ूटमध्ये असलेले जे काही पुरावे आहेत, जी कागदपत्रे आहेत त्यावरुन त्यांनी तो इतिहास लिहिला आहे. आपण ते पुस्तक व्यवस्थित वाचले तर त्यामध्ये असे असे लिहिले आहे की, " It is jokingly said in Pune..." नंतर त्यांनी महाराजांबद्दल म्हटलेले आहे. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, त्यांच्या तोंडी हे वाक्य घालून या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली. आपण ते पुस्तक व्यवस्थित वाचले आणि त्या पुस्तकातील नावे वाचली तर, ज्या संबंधित व्यक्तींच्या बद्दल नंतर आम्ही रस्त्यावर उतरलो आणि काही जणांनी जाऊन त्यांची माफीही मागितली, पण आम्ही ज्यांच्याविरुध्द रस्त्यावर उतरलो, हे पुस्तक छापण्याच्या आधी ज्यांची त्यामध्ये नावे असतात त्यांना रेफरंससाठी पुस्तक दिले जाते की, आपण हे पुस्तक वाचून फायनल ॲप्रूव्ह करण्यास हरकत नाही, परंतु त्या नावांच्या बाबतीत राज्य शासनाने काही कारवाई केली नाही. जर जेम्स लेन इंग्लंडमध्ये राहिला तर त्याच्या मुखात हे शब्द कोणी घातले हे महाराष्ट्राला कधीही कळणार नाही. जेम्स लेनला येथील इतिहासाबद्दल काहीच माहिती नव्हती. त्यांनी पुस्तकात नमूद केले आहे की, " I was told..." या टोल्ड शब्दाचा अर्थ असा की, त्यांना तसे सांगितले गेले. त्याला कोणी सांगितले हे जोपर्यंत जेम्स लेनला महाराष्ट्रात आणत नाही तोपर्यंत कळणार नाही. मग सूर्यवंशी सारखी पिल्लावळ कायम तयार होत राहील. जोपर्यंत एखाद्याला धडा शिकवत नाही तोपर्यंत मागचे शहाणे होणार नाहीत. त्यामुळे हे प्रकरण

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT

श्री. जितेंद्र आव्हाड ......

गंभीर आहे. कोणीही उठावे आणि शिवाजी महाराजांचा अपमान करावा, कोणीही उठावे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल बोलावे, कोणीही उठावे आणि लोकमान्य टिळकांबद्दल बोलावे आणि आपण मुकाटपणे पाहात राहावे हे बरोबर नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, हे प्रकरण गंभीर आहे. जेम्स लेन प्रकरण हळूहळू तापत गेले आणि नंतर परिस्थिती हाताबाहेर गेली. यासंदर्भात माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांची भूमिका कौतुकास्पद होती. माझी आजही आपल्याला विनंती आहे. भांडारकर इन्स्टिटयूटमध्ये बसलेले जे शिवव्देषी आहेत त्यांना शोधून काढावे. जे इतिहासाचा उपमर्द करणे आपला कर्तव्यधर्म समजतात त्यांना धडा शिकविण्याची गरज आहे. इतिहास जसे सामाजिक समीकरणे जुळवत असतो तर काही ठिकाणी त्यामध्ये झालेले बदल सामाजिक समीकरणे बिघडवित असतात. भांडारकर इन्स्टिटयूटमध्ये गेल्या काही वर्षात ज्या काही घडामोडी घडत आहेत त्यामध्ये महाराष्ट्रातील सामाजिक समीकरण बिघडविण्याचे काम केले जात आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जितेंद्र आव्हाड...

ही केशव कुलकर्ण्यांची अवलाद कोण आहे ? ते का म्हणून या गोष्टी करतात ? हे कधी तरी महाराष्ट्राला कळले पाहिजे. महाराजांच्या जन्म दाखल्या विषयी गोंधळ, महाराजांच्या मातृ विषयी गोंधळ. हे करण्याचे कारण काय ? जे कोणी इतिहास तज्ज्ञ असतील त्यांचा सन्मान करुन मी एवढेच सांगतो की, महाराजांबद्दल अपशब्द वापरुन महाराष्ट्रातील जी काही सामाजिक चळवळ आहे तिला दिशाहिन करु नका. हे जे काही सूर्यवंशी प्रकरण सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी समोर आणलेले आहे त्या सूर्यवंशीची लायकी काय आहे ते मला माहीत नाही. परंतु कोणीही उठावे आणि महाराजांबद्दल बोलावे हे नक्कीच महाराष्ट्राला न परवडणारे आहे. तेव्हा या सूर्यवंशीच्या बाबतीत माझे म्हणणे असे आहे की, 2 तारखेला हे अधिवेशन संपेपर्यन्त या प्रकरणी चौकशी करण्यापेक्षा त्याने केलेला गुन्हा पुराव्यानिशी सिध्द होत असल्यामुळे त्याला आज संध्याकाळच्या आत घरी पाठवा. महाराष्ट्राला हे कळू द्या की, असे महाराष्ट्रामध्ये कुठेही आणि कधीही सहन केले जाणार नाही. या प्रकरणी आपण योग्य ती कारवाई करावी. जेम्स लेन प्रकरणी माननीय गृह मंत्र्यांनी घेतलेली आक्रमक भूमिका महाराष्ट्राने पाहिलेली आहे. त्यामुळे त्यांनी तिच भूमिका या प्रकरणी घेऊन महाराष्ट्राला एक नवीन दिशा द्यावी एवढी प्रामाणिक विनंती करुन मला बोलण्याची संधी दिल्या बद्दल सभापती महोदय, मी आपले आभार मानतो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी चर्चा उपस्थित केली. त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. त्याही पेक्षा सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या प्रकरणी जी भूमिका घेतली त्याबद्दल मला त्यांचे विशेष अभिनंदन करावयाचे आहे, आभार मानायचे आहेत. प्रश्न एका व्यक्तीचा नाही तर प्रवृत्तीचा आहे आणि प्रवृत्ती ठेचून काढली पाहिजे. सूर्यवंशीने काय सांगितले, काय केले हे तपासात निघेल. त्याबाबतीत शासन शिक्षा देईल. प्रश्न असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी ज्याचा उल्लेख केला, शिवरायांच्या बदनामीची सुरुवात जेथून झाली, त्या भांडारकर इन्स्टिटयूट बद्दल आपली भूमिका नेमकी काय आहे ? महाराष्ट्रामध्ये क्षोभ उसळला होता, भांडारकर इन्स्टिटयूटवर हल्ला झाला होता. लोकशाहीमध्ये अशा प्रकारचे हल्ले होऊ नयेत, कुणावरही अशा प्रकारचे हल्ले होऊ नयेत या मताचा मी आहे. पण तुम्ही जर तुमचा बाप विचारत असाल तर माणसे त्या टोकाला जाणारच. भांडारकर इन्स्टिटयूट उभारण्यासाठी इथे प्रयत्न झाले. प्रश्न भांडारकर इन्स्टिटयूट उभारण्याचा नव्हता. डॉ. भांडारकर हे अत्यंत प्रागतिक विचारांचे होते, सुधारणावादी होते. किंबहुना अब्राह्मणी चळवळीशी संबंधी असलेला त्या काळातील एक सुधारणावादी विचारवंत होते. परंतु ती इन्स्टिटयूट ज्यांनी ताब्यात घेतली त्यांनी तिचे पुढे वाटोळे केले. त्यांनी केवळ त्या इन्स्टिटयूटचे वाटोळे केले नाही तर सबंध इतिहासाचे वाटोळे केले. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे वाटोळे केले. महापुरुषांबद्दल किंवा जी श्रध्दास्थाने आहेत त्यांच्या बद्दल पुन्हा पुन्हा ज्या पध्दतीने बोलले जात आहे, जे आजकाल तथाकथित इतिहासकार करतात ते योग्य नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी जन्माच्या वादाचा उल्लेख केला. जन्माचा वाद उपस्थित करण्यामागे सुध्दा हेच कारस्थान होते. आपण कमिटी नेमली. 19 फेब्रुवारी नक्की झाल्यानंतर सुध्दा त्यावर जे प्रश्न निर्माण करीत होते त्यांची भूमिका यामध्ये वेगळी नाही. शिवरायांचे गुणगान करणारी आणि जन्माबद्दल शंका व्यक्त करणारी , 19 फेब्रुवारी ही तारीख मान्य न करणारी ही मंडळी एकच आहेत. कोणी वेगळे नाहीत. या राज्यामध्ये महात्मा फुल्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न बाळ गांगल यांनी केला त्यावेळी संबंध महाराष्ट्र उभा राहिला होता. हा बाळ गांगल कोण होता ? त्याच्या मागे कोण होते ? हीच भांडारकर इन्स्टीटयूटमधील मंडळी

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील...

आहेत. अरुण शौरीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निंदानालस्ती केली त्यावेळी या महाराष्ट्राने काय भूमिका घेतली ? त्या अरुण शौरीला केन्द्रामध्ये मंत्रीपद मिळते. जो या देशातील घटनाकारांची ज्या पध्दतीने निंदानालस्ती करतो त्याला मंत्री पद मिळते. इतिहासाची चिकित्सा झाली पाहिजे. , महापुरुषांची देखील चिकित्सा झाली पाहिजे. कोणीही महापुरुष काही देव नाही. ती देखील माणसेच आहेत. महापुरुष देखील चुका करतात. त्यामुळे महापुरुषांची देखील चिकित्सा झाली पाहिजे. परंतु चिकित्सा याचा अर्थ त्यांचा जन्म काढणे आणि त्यांच्या व्यक्तिगत चरित्रामध्ये ढवळाढवळ करणे हेही खपवून घेता कामा नये. नसलेले काही टाकणे हे कधीही खपवून घेता कामा नये. सलमान रश्दीची जातकुळी आणि जेम्स लेनची जातकुळी, सलमान रश्दीची जातकुळी आणि बाळ गांगलची जातकुळी, सलमान रश्दीची आणि अरुण शौरीची जातकुळी एकच आहे हे लक्षात घेतले पाहिजे. जी कोणी थोर मंडळी आहेत मग ते हुतात्मे असतील प्रेषित असतील, ज्यांच्या बद्दल जनतेच्या श्रध्दा आहेत, आदर आहे, ज्यांनी मानव जातीच्या उत्थानासाठी काम केलेले आहे त्यांच्या व्यक्तिगत चारित्र्यावर जर शिंतोडे उडविले जात असतील तर ते आपण कायद्याने रोखले पाहिजे . ही काही इतिहासाची चिकित्सा नाही हे मला या सभागृहाच्या नजरेस आणून द्यावयाचे आहे.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील..........

भांडारकर इन्स्टिटयूटबाबत त्यावेळेला माननीय उप मुख्यमंत्र्यांनी चांगली भूमिका घेतली. तेथे हल्ला का झाला ? हा प्रश्न त्यांनी विचारला होता. माझे म्हणणे असे होते की, भांडारकर इन्स्टिटयूट सरकारने ताब्यात घ्यावयाला पाहिजे होती. सरकारने ज्या उद्देशाने भांडारकर इन्स्टिटयूट उभे केले होते त्या उद्देशाचे वाटोळे झाले. ज्या पध्दतीने जेम्स लेन्सला इतिहासाबाबत चुकीची माहिती पुरविण्यात आली त्या सर्व चुकीच्या इतिहासकारांना शिक्षा होणे महत्वाचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिगत जीवनाबद्दल, जन्माबद्दल चर्चा करणारी जी मंडळी आहेत तीच मंडळी स्वत:ला इतिहासकार म्हणवून घेतात. राज्यातील पाठयपुस्तके निर्मितीचे काम सुध्दा अशा लोकांनाच दिले जाते ही त्याहूनही खेदाची आणि दु:खाची बाब आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी म्हटलेले आहे की, शिवरायांचा धडा वगळण्याचे धाडस केलले आहे. पण या पुस्तकामध्ये जे वगळलेले आहे किंवा ज्या न घातलेल्या गोष्टी आहेत इतिहास चिवडण्याचे काम करुन त्यातील काही गोष्टी जाणीवपूर्वक झाकण्याचे व दडपण्याचे काम करावयाचे आणि चित्र असे उभे करावयाचे की, पुढच्या पिढीला इतिहासाबद्दलच संशय निर्माण होईल.

श्री.मधुकर चव्हाण :अफजलखानचा कोथळा कोणी काढला ? हे त्यामध्ये सांगितलेले नाही.

श्री.कपिल पाटील : होय, महात्माजींचा खून कोणी केला हे आपली पाठयपुस्तके सांगत नाहीत. महात्माजींचा खून कोणी केला ? महाराष्ट्रातील माणसाने जर तो खून केला असेल तर त्यामध्ये लाज वाटण्याचे काय कारण आहे ? राक्षसी व सैतानी प्रवृत्ती आमच्याकडे होती, हे लपविण्याचा प्रयत्न केला जात आहे. जर्मनीमध्ये हिटलरचे नाव घेतले जाते कारण तो लोकशाहीचा तसेच मानवी जातीचाही विरोधक होता, असे आज जर्मनीमध्ये सांगितले जाते म्हणून जर्मनीला आज जगामध्ये आणि लोकशाहीमध्ये मान आहे. महाराष्ट्रामध्ये नथ्थूराम गोडसे या नावाची प्रवृत्ती होती तीच आता शिवरायांबद्दल बोलत आहे. त्याच प्रवृत्तीने सातत्याने छत्रपती शिवाजी महाराजांची, जिजाऊंची, महात्मा फुलेंची आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची बदनामी केली हे विसरता कामा नये. या प्रवृत्तीबद्दल आपण नेमकी काय भूमिका घेणार आहात? हा महत्वाचा प्रश्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.......

मी तपशिलात जात नाही, कारण यासंदर्भातील सर्व तपशील येथे सांगितला गेला आहे. अलिबागला काय घडले आणि त्यावर लोकांच्या प्रतिक्रिया काय होत्या ? हे तपासाअंती सिध्द होईल पण या निमित्ताने पुन्हा एकदा जेम्स लेनबद्दल सभागृहाने भावना व्यक्त केल्या की, त्याला व्हिसा नाकारला गेला पाहिजे. अगदी बरोबर आहे, अशा माणसाला भारतात येऊ देता कामा नये परंतु त्याला चुकीची माहिती पुरविणा-या इतिहासकारांच्या या प्रवृत्तीला बाहेर काढण्यासाठी आपण काही करणार की नाही ? याचेही स्पष्टीकरण झाले पाहिजे. जेम्स लेनला इतिहासाबद्दल चूकीची माहिती पुरविणारी जी नामांकित इतिहासकार मंडळी आहे, ती आजही पुण्यात बसलेली आहेत. या नामांकित इतिहासकारांना आज पाठयपुस्तक निर्मितीचे काम देण्यात आले आहे, त्यांना शिक्षा देण्याऐवजी पाठयपुस्तक निर्मितीसारखे काम दिले जाते, ही खेदाची बाब आहे. या मंडळींना जर शिक्षा देण्याचे धैर्य तुमच्या ठायी नसेल तर निदान उद्याच्या पिढीला सांगावयाचा जो इतिहास आहे तो खोटा सांगितला जाऊ नये, विपर्यस्त सांगितला जाऊ नये, एवढेतरी काम राज्य शासन करणार आहे का? हा माझा प्रश्न आहे आणि या प्रश्नाचे आपण जर उत्तर देणार नसाल तर शिवरायांचे फोटो लावणे सोपे आहे, शिवरायांचा जयजयकार करणे सोपे आहे, ते शिवप्रभू आहेत, हे सांगणे त्याहूनही सोपे आहे. एकदा देव केल्यावर त्याला खुंटीवर टांगून हार घालायला आपण मोकळे होतो परंतु त्यांच्या विचाराने चालण्याचे धाडस आपण करु शकत नाही. हा महाराष्ट्र शिवरायांचा आहे, महात्माजींचा आहे, महात्मा फुल्यांचा, डॉ.बाबासाहेबांचा आहे आणि यांच्यावर शिंतोडे उडविणा-यांना आणि उडवायला लावणा-यांना आपण जर वेळीच धाक दाखवून शिक्षा देणार नसाल तर ही चर्चा व्यर्थ होईल, एवढेच मी सांगतो आणि पुन्हा एकदा भांडारकर इन्स्टिटयूट सरकारने आपल्या ताब्यात घ्यावी आणि या राज्याच्या पाठयपुस्तक मंडळामध्ये जी मंडळी शिरलेली आहेत, त्यांना खडयासारखे उचलून बाहेर काढावे. या दोन गोष्टी जरी केल्या तरी कायदा कायद्याचे काम करेल. परंतु ज्या गोष्टी शासनाच्या हातात आहेत त्या शासनानेच कराव्यात, एवढी विनंती करुन मी माझे भाषण थांबवितो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यासंदर्भात या ठिकाणी या सभागृहामध्ये जे बोलले त्याबाबत माझा एक हरकतीचा मुद्दा आहे, तो असा की, शिवजयंतीबाबत ते बोलले की, शासकीय जयंती ही 19 फेब्रुवारीला असते, हा शासनाने घेतलेला निर्णय आहे, यासंदर्भात वाद आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ही शिवजयंती अक्षय तृतीयेला साजरी केली जाते आणि ही प्रथा परंपरा अनेक वर्षापासून चालू आहे, नको त्या विषयाला स्पर्श करुन सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील या विषयामध्ये सुध्दा राजकारण आणण्याचा प्रयत्न करीत आहेत, ते योग्य नाही. पाठय पुस्तकामध्ये लिहिले आहे हे पाठयपुस्तक मंडळ आणि शिक्षण खात्याने तपासावे. आजचा विषय आणि पाठयपुस्तक मंडळ यांचा काही संदर्भ किंवा विषय आहे, असे मला वाटत नाही पण काही तरी संदर्भ घेऊन कुठेतरी तुटून पडावयाचे ही भावना योग्य नाही, एवढेच मला म्हणावयाचे आहे. आजचा विषय मर्यादित आहे, यासंदर्भातील जी प्रवृत्ती आहे, त्या प्रवृत्तीवर टीका करा पण नको त्या विषयाचा संदर्भ घेऊन उगाच वितंडवाद निर्माण करण्याची ही जी प्रवृत्ती आहे ती एक विकृती आहे.

श्री.कपिल पाटील : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्या भूमिकेबाबत मी काहीही वाद करीत नाही. मला फक्त या गोष्टीचे मूळ येथे सांगून त्या गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे होते, एवढेच मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

यानंतर श्री. कानडे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि खऱ्या अर्थाने अखिल भारतामध्ये स्वराज्याच्या मूलमंत्राचा स्त्रोत ज्यांनी निर्माण केला ते आपल्या सर्वांचे श्रध्दास्थान असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल रायगड जिल्हयातील अलिबाग येथील एका महाविद्यालयातील प्राध्यापक श्री. सूर्यवंशी यांनी छत्रपतींबद्दल जे अनुद्‌गार काढले त्याबाबत एका अत्यंत गंभीर विषयावर चर्चा उपस्थित केली आहे. प्राध्यापकांनी अनुद्‌गार काढल्यानंतर त्या वर्गातील विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांना नम्रतापूर्वक विनंती केल्यानंतरही अनेक वेळ ते तसेच बोलत राहिले आणि यापेक्षाही मी अधिक बोलेन असे ते म्हणाले त्यातील काही वाक्ये सदस्यांनी येथे वाचून दाखविली नाहीत ती अधिक गंभीर असली पाहिजेत. या घटनेचा जेवढा म्हणून निषेध करावा तेवढा थोडाच आहे. त्या महाविद्यालयामध्ये नररत्न धुंडिराज शास्त्री यांच्या संस्थेचा एक कार्यक्रम म्हणून एकदा मी गेलो होतो. ज्या रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी आहे आणि ज्या ठिकाणी महाराजांना राज्याभिषेक झाला असे एक अत्यंत ऐतिहासिक अत्यंत महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि आताचे केंद्रीय मंत्री बॅ. अंतुले यांनी कुलाबा हे जिल्हयाचे नांव बदलून आणि या ऐतिहासिक घटनेची नोंद घेऊन छत्रपतींची राजधानी ज्या किल्ल्यावर होती त्या किल्ल्याचे नांव या जिल्हयाला दिले असा हा ऐतिहासिक जिल्हा आहे. छत्रपतींच्या इतिहासाने विविध कंगोरे निर्माण झालेले आहेत. अशा जिल्हयामध्ये एक प्राध्यापक विद्यार्थ्यांनी उठून विरोध दर्शविला असताना सुध्दा हट्टाने वारंवार छत्रपतींबद्दल अनुद्‌गार काढतो ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्याच्याही पुढे सदस्यांनी वृत्तपत्रातील काही बातम्या वाचून दाखविल्या आणि त्यांनी स्वत: पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर त्याच्याकडून त्यांना उत्तर ऐकायला मिळाले आणि त्याच्याहीपेक्षा उलट विद्यार्थ्यांनाच त्याने अटक करायला लावली असे वाचायला मिळाले ही त्याहून गंभीर बाब आहे. यानिमित्ताने मी एक मुद्दा उपस्थित करु इच्छितो. महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये किंवा कक्षेमध्ये किंवा विद्यापीठाच्या एखाद्या संस्थेमध्ये कुठलीही घटना घडली तर जोपर्यंत संस्थेचा प्रमुख पोलिसांना काही सांगत नाही तोपर्यंत दखल घेतली जात नाही ही फार गंभीर बाब आहे. महाराष्ट्रामध्ये आपण अनेक महाविद्यालयातील घटना पाहतो. परवाच रॅगिंगचे प्रकरण घडले आहे.अनेक ठिकाणी अनेक घटना घडल्या आहेत. मुंबईमध्ये अशा घटना घडलेल्या आहेत. पोलीस तक्रारी झालेल्या आहेत. परंतु संस्थेची अब्रू जाईल म्हणून संस्थाचालकांनी अशा प्रकारची नोंद न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ 16:40

श्री. उल्हास पवार ....

संस्थेकडे किंवा पोलीस खात्याकडे न केल्यामुळे याची दखल घेतली जात नाही असा आणखी एक विचित्र कायदा आहे. अर्थात या कायद्याची गरज असेल तर तो ठेवला पाहिजे. परंतु असे होते त्याचे दुष्परिणाम म्हणून अनेक गोष्टी घडत आहेत. परवाच जळगांवच्या एका विद्यार्थ्याने आत्महत्या केली. त्या रॅगिंगमध्ये प्राध्यापक देखील सामील झालेले प्रथमच आढळून आले आहे. सूर्यवंशी नांवाचा कोणत्या जिल्हयातील कोण माणूस आहे की जो इतिका उद्दामपणे आणि उर्मट व उध्दटपणाने बोलतो आणि त्याच्यावर कारवाई करण्याच्याऐवजी कारण सदनाचे सदस्य सांगतात ते सत्य मानून आणि पेपरमधील बातमी लक्षात घेतली तर त्या विद्यार्थ्यांवरच कारवाई झाली असेल तर याची गंभीर देखील घेतली पाहिजे. प्राचार्यांना देखील त्या विद्यार्थ्यांनी पत्र दिले आणि त्याच्यानंतर मग दोन-तीन दिवसांनी प्राध्यापकांनी खुलासा केला की मी असे बोललोच नाही. त्यानंतर पुन्हा वर्गातील अनेक विद्यार्थ्यांनी ते असे बोलले असे दिल्यानंतर त्वरित त्या प्राध्यापकावर कारवाई झाली किंवा नाही हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार..........

याची गंभीर दखल घेऊन त्याला जास्तीत जास्त जी काही कोणती शिक्षा भारतीय कायद्यामध्ये असेल ती देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याला फक्त घरी पाठविणे ही साधी गोष्ट आहे. तो घरी देखील क्लासेस घेईल. त्याच्या क्लासेसला देखील लोक गर्दी करतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी पाठ्यपुस्तक मंडळाचा उल्लेख केला. जगद्‌गुरु संत तुकाराम महाराजांबद्दल एक प्रश्न उपस्थित केला आहे. मी या सदनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला आवाहन करु इच्छितो. मेहता पब्लिकेशन्सने 30 वर्षापूर्वी एक गाईड तयार केले, त्यामध्ये हे छापले होते. महाराष्ट्राची माणसे 30 वर्षे हे वाचत होते. प्रश्नपत्रिकेत हा विषय आल्यानंतर आपण जागे झालो. पालकांचे लक्ष कुठे होते? महाराष्ट्रातील मातापित्यांचे, सुजाण नागरिकांचे लक्ष कुठे होते? मेहता पब्लिकेशन्सच्या गाईडमध्ये 30 वर्षापूर्वी असे छापले गेले आणि ते वाचून आपली मुले परीक्षेला जातात याची दखल कोणी घेतली नाही ही गंभीर बाब आहे. मी आपले लक्ष एवढ्यासाठी वेधू इच्छितो. केवळ एखादी घटना घडल्यानंतर प्रश्न उपस्थित करण्यापेक्षा असे काही बारकावे आहेत, त्याकडे लोकप्रतिनिधी आणि जनतेने अतिशय गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

19 फेब्रुवारी या तारखेबद्दल याठिकाणी बोलले गेले. मी नम्रपणे सदनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, मी ज्या वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष आहे, त्या वैधानिक विकास मंडळाचे युती सरकारच्या काळात श्री.जोग हे अध्यक्ष होते, त्यांनी मेहेंदळेंच्या पुस्तकाला सांस्कृतिक विभागामार्फत निधी दिल्यानंतर त्यांनी संशोधन करुन 19 फेब्रुवारी ही तारीख छत्रपती शिवरायांच्या जयंतीची जाहीर केली. ती सर्वांनी मान्य केली. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, तारखेप्रमाणे जयंती, पुण्यतिथी साजरी करतो आणि तिथीप्रमाणेही साजरी करतो. तारखेप्रमाणे किंवा तिथीप्रमाणे जयंती साजरी केल्याने काही बिघडत नाही. लोकमान्य टिळक यांची जयंती तिथीप्रमाणे आणि तारखेप्रमाणेही साजरी होते. तो काही फारसा गंभीर विषय नाही. परंतु हेतू असा होता की, जगभर छत्रपती शिवरायांची जयंती 19 फेब्रुवारीला साजरी व्हावी. ही तारीख केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता सर्व जगाला तारीख कळावी. छत्रपती शिवरायांवर प्रेम करणारी जी जी मंडळी असतील त्यांनी या तारखेला छत्रपती शिवरायांची जयंती साजरी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार..........

करावी हा हेतू होता. त्या प्रामाणिक हेतूने ही तारीख शासनाने जाहीर करुन 19 फेब्रुवारीला जयंती साजरी करावी असे आवाहन केले एवढाच मुद्दा या निमित्ताने मी लक्षात आणून देतो.

सभापती महोदय, याठिकाणी भांडारकर इस्टिट्यूटबद्दल बोलले गेले. भांडारकर इन्स्टिटट्यूट ही पुरोगामी संस्था असून तिने ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, संत तुकाराम यांच्यापासून प्रेरणा घेतलेली आहे. त्या संस्थेमध्ये पुढे कोण आले, कोण गेले याची चर्चा मी करु इच्छित नाही. त्याची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. परंतु प्रत्येक गोष्ट सरकारने ताब्यात घ्यावी या मताचा मी नाही. कोणत्याही गोष्टीचे सरकारीकरण करावे हे योग्य नाही. ही चिकित्सक संशोधन करणारी संस्था आहे. त्याठिकाणी सरकारी कामकाजाप्रमाणे काम होणार असेल तर घोटाळा होण्याची शक्यता आहे. चिकित्सक संशोधन करणाऱ्या संस्थेबद्दल दखल मात्र घेतली पाहिजे. ती संस्था कोणाच्या ताब्यात आहे? तिथे कोण माणसे आहेत? याची दखल घेतली पाहिजे.

सभापती महोदय, प्राध्यापक सूर्यवंशी कोण आहेत, त्यांची दखल घेऊन त्यांना जास्तीत जास्त शासन झाले पाहिजे. माननीय उपमुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत, म्हणून मुद्दाम सांगू इच्छितो की, एखाद्या महाविद्यालयात किंवा एखाद्या शिक्षण संस्थेच्या प्रिमायसेसमध्ये घटना घडली आणि त्या संस्था चालकांनी पोलिसांकडे जाऊ दिले नाही तर त्याचे दुष्परिणाम होतात याची गंभीर दखल घेऊन नियमामध्ये कोणती दुरुस्ती करता येईल, याची दखल कशाप्रकारे घेतली पाहिजे याकडे लक्ष देऊन शासनाने योग्य ती कारवाई करावी.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो गंभीर मुद्दा याठिकाणी उपस्थित केला त्या मुद्याची शासनाने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी राज्यामध्ये एका महाविद्यालयात घडलेल्या प्रसंगाबद्दल याठिकाणी प्रश्न उपस्थित केला. वर्गामध्ये शिकवत असताना छत्रपतींची बदनामी झाली, खरे तर या घटनेचा करावा तितका निषेध हा थोडा आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ......

अधून मधून आपण नियमित बघतो, कधी देवदेवतांची विटंबना करणारी चित्रे कधी इंटरनेटवर येतात तर कधी लावली जातात. कधी "अल्ला"चे काल्पनिक चित्र काढून अल्पसंख्याकांच्या भावना दुखावल्या जातात. अशाच रीतीने छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी अधून मधून करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारची बदनामी करण्याच्या पाठीमागचा हेतू काय आहे हे आजपर्यंत माझ्यासारख्या माणसाला समजलेले नाही. केवळ विक्षिप्तपणातूनच या गोष्टी वेळोवेळी होतांना आपल्याला दिसतात. जी घटना घडलेली आहे त्या घटनेच्या बाबतीत सदनामध्ये दिली गेलेली माहिती, वर्तमानपत्रात छापून आलेली माहिती आणि पोलिसांना आतापर्यंत मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्हा नोंद करण्यात येईल आणि आय.जी. लेव्हलच्या वरिष्ठ अधिका-यामार्फत या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात येईल. काळ सोकावता उपयोगाचा नाही, अशा चुका करण्याची हिंमत महाराष्ट्रात पुन्हा करण्याची हिंमत कोणी करणार नाही यासाठी जे काही करावे लागेल ते शासनामार्फत केले जाईल. सरकार म्हणून आणि व्यक्ती म्हणून सुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी आम्ही कधीही सहन केली नाही, करणार नाही आणि भविष्यात कोणताही माणूस, कोणताही महाराष्ट्रीयन माणूस, या देशाचा कोणताही नागरिक ही बदनामी कधीही सहन करणार नाही. आपण हे अनुभवले आहे की, कोणी तरी जेम्स लेन्स महाराष्ट्रात येतो, छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करतो, जिजामातेची बदनामी करतो. सभापती महोदय, ताठपणे यासंदर्भात मी जेव्हा उभा राहण्याचा प्रयत्न केला होता त्यावेळी मला बोधामृत पाजण्याचा प्रयत्न सुध्दा झाला होता. विचारांचा मुकाबला विचाराने केला पाहिजे हे जरी खरे असले तरी विचारांचा मुकाबला विचाराने केला जाऊ शकतो परंतु अविचाराचा मुकाबला कशाने केला जाऊ शकतो? एखादा जर आईच्या चारित्र्यावर संशयच घेत असेल तर या अविचाराचा मुकाबला अगदी महाराष्ट्रीयन भाषेत बोलावयाचे झाले तर "कानाखाली सणकून आवाज" या एकाच पध्दतीने घेतला जाऊ शकतो, यापेक्षा अजून दुसरा कोणता मार्ग आहे असे मला स्वत:ला वाटत नाही. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या, जेम्स लेन्स हा परकीय मेंदू घेऊन महाराष्ट्रात आला होता. तो येण्यापूर्वी सुध्दा कोणाच्या तरी मेंदूमध्ये शंकेचे, कुशंकेचे किडे वळवळत होते. जेम्स लेन्सचे पुस्तक हा संशोधनाचा ग्रंथ होता तर त्या संशोधनाच्या पुस्तकात रस्त्यावर उभे राहून



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

30-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) QQ-2

SGJ/ SBT/ MAP/ 16:50

श्री. आर.आर.पाटील....

काय बोलले जाते हे छापण्याची त्यात काय आवश्यकता होती? रस्त्यावर कोणत्या बाजारगप्पा मारल्या जातात ते या ग्रंथात संशोधन होते, त्या बद्दलचा तो ग्रंथ होता, की भांडारकर इंस्टिटट्यूटमध्ये बसून त्याने केलेले ते संशोधन होते? सभापती महोदय, मला आणखी एका गोष्टीचा मनापासून खेद झाला. ज्यावेळी या पुस्तकावर बंदी आणण्याचा सरकारने निर्णय घेतला त्यावेळी आपल्यातीलच काही महाभाग हायकोर्टात गेले. घटनेप्रमाणे आम्हाला विचाराचे स्वातंत्र्य आहे, आमचे विचार हा आमचा मूलभूत हक्क आहे. मी कधी कोणाला सांगत नाही परंतु मी सुध्दा एलएल.बी. ब-या मार्कांने पास केलेले आहे. आपल्या घटनेने आपल्याला दिलेले मूलभूत अधिकार आणि मूलभूत हक्क हे भारतीय नागरिकाला दिलेले आहेत. ते अधिकार अमेरिकेच्या नागरिकाला, इंग्लडच्या नागरिकाला दिलेले नाहीत. जगातील कोणत्याही घटनेमध्ये दिलेले मूलभूत हक्क आणि मूलभूत अधिकार हे त्या त्या देशाच्या नागरिकाला दिलेले असतात. परंतु अलिकडच्या काळात अमेरिकेपेक्षाही अधिक, इंग्लंडपेक्षाही अधिक, आम्ही मानवतावादी आणि मूलभूत हक्कवादी बनलो आहोत. तेथे जे अधिकार मिळत नाही ते अधिकार आपल्याकडे मिळत आहेत. दुर्दैवाने मुंबईच्या हायकोर्टातील केस आम्ही हरलो परंतु सुप्रिम कोर्टात या संपूर्ण गोष्टीचे हिअरिंग होऊन स्टे मिळालेला आहे. या पुस्तकावर बंदी आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणारे पुस्तक कोणत्याही व्यक्तिच्या व्यक्ती स्वातंत्र्यांच्या हक्कावर गदा आणणार असेल तर,

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...........

असे हक्क पायदळी तुडविण्याची भूमिका महाराष्ट्र पसंत करेल, पण असे हक्क मान्य करण्याची भूमिका महाराष्ट्रात कधीच पसंत केली जाणार नाही. जेम्स लेनने त्यांच्या देशातील महापुरुषांबद्दल त्यांच्या देशात अशी विधाने केली तर तेथील जनता, तेथील सिस्टीम ती विधाने मान्य करतील काय ? तर मग आपण हे का सहन करावे याची उत्तरे कधी देता येत नाहीत. जेम्स लेन परकीय होता. पण जी माणसे आमच्या रक्तामासाची आहेत, आपल्या भूमीत जन्मलेली आहेत त्यांनी अशाप्रकारचे कृत्य करावे ही निश्चित शरमेची बाब आहे. एकवेळ जेम्स लेन परवडला पण यांना... मी गृहमंत्री असल्यामुळे मला जबाबदारीने बोलणे भाग पडते. ही माणसे खूप दोषी आहेत.

सभापती महोदय, कायदा काय आहे हे मला माहीत नाही. पण या शिक्षण संस्थेस सूचना देण्यात येतील की, तुमच्या शिक्षण संस्थेस सरकारी अनुदान दिले जाते आणि अशा शिक्षण संस्थेत प्राध्यापक असा उजेड पाडत असतील तर अशा संस्थांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. संस्थेने या घटनेची वेळीच दखल घेण्याची गरज होती. काही संस्था खूप मोठ्या आहेत. प्रत्येक वर्गामध्ये प्राध्यापक काय शिकवितात याची माहिती त्यांना असणे शक्य नाही. परंतु ज्यावेळी विद्यार्थी तक्रार करतो त्यावेळी त्या संस्थेनेच "सु-मोटो" तक्रार करावयास पाहिजे होती. संस्थेने वेळीच तक्रार केली असती तर पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला असता आणि विद्यार्थ्यांना चिडून जाऊन प्राध्यापकांना काळे फासण्यासारखे गैरकृत्य विद्यार्थ्यांना करावे लागले नसते. या विद्यार्थ्यांवर जे गुन्हे लावण्यात आलेले आहेत ते सर्व गुन्हे परत घेण्यात येतील. विद्यार्थ्यांनी जो स्वाभिमान दाखविला त्याचे कौतुक केले पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी सोलापूर येथील घटनेचा उल्लेख करण्यात आला. आपण पोलिसांच्या अडचणी सुध्दा लक्षात घेतल्या पाहिजेत. शिक्षण संस्थामध्ये पोलिसांनी जावे की नको, हस्तक्षेप करावा की नको या गोष्टी सुध्दा लक्षात घेतल्या पाहिजेत.

सभापती महोदय, मी या निमित्ताने सदनाला एक घटना सांगतो. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि डॉक्टर्सची संघटना यांनी आझाद मैदानावर रिझर्व्हेशनच्या विरोधात आंदोलन सुरु केले. चार दिवस आंदोलन सुरु होते. पण त्या ठिकाणी कोणीही गेले नाही. या आंदोलनाची

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...........

दखल मीडियाने व सरकारने घ्यावी अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु त्याठिकाणी ना मीडिया फिरकला, ना सरकारचे कोणी फिरकले. शेवटी त्यांनी सर्वांचे लक्ष वेधण्यासाठी एक नामी शक्कल शोधली. ते तेथून उठले आणि सरळ राजभवनात घुसले. आझाद मैदानावरील आंदोलन हे मीडियासाठी न्यूज नव्हती, पण आंदोलक राजभवनात घुसले ही मीडियासाठी मोठी न्यूज होती. त्याठिकाणी पोलीस जाण्या अगोदर मीडिया पोहोचली. त्याठिकाणी पोलिसांची संख्या कमी होती आणि विद्यार्थ्यांची संख्या जास्त होती. राज्यामध्ये जी प्रोटेक्टेड ठिकाणे आहेत त्यामध्ये राजभवन हे पहिल्या नंबरवर आहे. त्याठिकाणी एक इन्स्पेक्टर होता. विद्यार्थी तर आत चालले आहेत आणि त्यांनी आंदोलनाची कोणतीही कल्पना दिलेली नाही. विद्यार्थी आत गेले तर एक नंबरवर असलेल्या प्रोटेक्टेडच्या ठिकाणी सुरक्षितता ठेवली नाही तर आपल्यावर कारवाई होईल. विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत पोलिसांची संख्या कमी होती. त्यामुळे पोलिसांना विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करावा लागला. त्या लाठीचार्जमध्ये एकही विद्यार्थी जखमी झाला नव्हता की, एकाही विद्यार्थ्यास दवाखान्यात न्यावे लागले नव्हते. परंतु पोलिसांनी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केला असे चित्र मीडियाने देशभरात दाखविले. या घटनेमुळे माननीय मुख्यमंत्र्यांना व मला देखील दिल्लीहून फोन आले. विद्यार्थ्यांवर लाठीजार्च झाला म्हणून अनेक राज्यातून मला फोन आले. एकाही विद्यार्थी ॲडमिट व्हावयाचे नाही अशाप्रकारचे ॲफिडेव्हीट एका वकिलाने केले. यावरुन लाठीचार्ज किती हेव्ही होता याची आपणास कल्पना येईल.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

परंतु काहीतरी केले पाहिजे आणि विद्यार्थ्यांचे समाधान केले पाहिजे, ही मागणी अनेक जणांनी लावून धरली. याबाबतीत अग्रलेख आले, समाजातील संवेदनशील माणसांनी विचारायला सुरुवात केली. मी माझ्यासमोर डी.सी.पी.ला आणि सी.पी.ला बोलावून घेतले व त्यांना विचारले की, आपण विद्यार्थ्यांना इतके मारल्यामुळे आपल्याला सस्पेंड करायला पाहिजे. ते दोन्ही अधिकारी माझ्याकडे बघत उभे राहिले. ही चूक झाली होती. याबाबत मी निमित्त शोधले. हा लाठीचार्ज ज्यावेळी टी.व्ही. वर दाखविला जात होता, त्यावेळी मी संबंधित इन्स्पेक्टरला फोन करुन विचारले होते की, लाठीचार्ज फार मोठयाप्रमाणात झाला होता का ? त्यात किती विद्यार्थी जखमी झाले ? त्यावेळी त्या इन्स्पेक्टरने सांगितले की, फार किरकोळ स्वरुपाचा जुजबी लाठीचार्ज आहे. त्यावेळी मी निमित्त शोधले आणि गृहमंत्र्यांना चुकीची माहिती दिली म्हणून त्यांना सस्पेंड केले. 15 दिवसानंतर एन.ए.सी.यू.आय.च्या विद्यार्थ्यांनी विल्सन कॉलेजमध्ये एका प्राध्यापकाला गाठले. प्रवेश दिला नसल्याचे त्यांचे कारण होते. त्यावेळी प्राध्यापकाच्या तोंडाला काळे फासण्यात आले. तेच पोलीस स्टेशन होते व तेथे पोलीस होते. त्यावेळी पोलिसांना प्रश्न पडला होता की, लाठीचार्ज करावा तर सस्पेंड आणि नाही केला तरीही सस्पेंड. अर्धा किलोमीटर त्या प्राध्यापकाची धींड एन.ए.सू.यू.आय.च्या विद्यार्थ्यांनी पोलीस बंदोबस्तात काढावी तशी काढली. यासंदर्भात पुन्हा मी पोलीस अधिकाऱ्यांना बोलावून घेतले व त्यांना विचारले की, आपण तेथे हजर असतानाही काहीच कार्यवाही का केली नाही ? त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केला तरी सस्पेंड आणि आता लाठीचार्ज केला तरी आम्ही सस्पेंड होणार असू तर याबाबत सरकारने नेमकी भूमिका स्पष्ट करावी. आज या कॉलेजमध्ये हा प्रसंग घडला तर आपण याठिकाणी प्रश्न उपस्थित करतो की, तेथे पोलीस का गेले नाहीत ? आज याठिकाणी मी सरकारचे हेही धोरण घोषित करतो की, सोलापूर सारख्याठिकाणी आज महाराष्ट्राच्या, देशाच्या आणि जगातील कानाकोपऱ्यातून विद्यार्थी येत असताना, रॅगिंगमध्ये एखाद्या पोस्ट गॅज्यूवेट डॉक्टरला जर आत्महत्या करावी लागत असेल व असे प्रकार होत असतील तर बाहेर जर माहित्या मिळाल्या तर व्यवस्थापकांबरोबर चर्चा् करुन पोलीस हस्तक्षेप करु शकतील, त्यांना तो करावा लागेल. आणि नंतरच पुढील अनर्थ टळतील. म्हणून अशा भूमिका आम्ही या राज्यामध्ये निश्चितपणाने स्वीकारु. केवळ एखाद्या

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

शिक्षण संस्थेमध्ये जायचे नाही, हे पथ्य पाळले म्हणून जर अनर्थ घडत असतील तर त्याही भूमिका घेऊन चालणार नाहीत. कॉलेजमध्ये, हायस्कूलमध्ये शांतता राखण्याच्या दृष्टीने ज्या भूमिका घ्याव्या लागतील त्या भूमिका शासनामार्फत घेतल्या जातील आणि या घटनेच्या बाबतीत ज्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले आहेत, ते आम्ही परत घेऊ. त्याचबरोबर संपूर्ण खोलात जाऊन या घटनेमध्ये अशी अद्दल घडवू की, छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द बोलण्याची व वापरण्याची हिम्मत कोणी करणार नाही, असा धडा शिकविण्याचे काम शासनामार्फत निश्चितपणाने करण्यात येईल. ज्या संवेदनशीलपणाने आपण याठिकाणी हा विषय उपस्थित केला, तेवढयाच गांभीर्याने कार्यवाही केली जाईल, या गोष्टीची मी सदनाला ग्वाही देतो आणि कार्यवाहीचे आश्वासनही देतो.

**उपसभापती** : आता चर्चा संपलेली आहे. आता आपण पुढील कामकाज घेऊ.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3....

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "दिवा, जिल्हा ठाणे येथे उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी अवैधरित्या देशी दारु बनविणाऱ्यांवर छापा टाकून हजारो लिटर रसायन जप्त केल्याबाबत" या विषयावरील श्री.मुझफ्फर हुसेन सैय्यद, श्रीमती सुधा जोशी, श्री.रमेश निकोसे, श्री.गोविंदराव आदिक, श्री.धनाजी साठे, श्री.सय्यद जामा व श्री.संजय दत्त यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 25101 ला दिनांक 30 मार्च,2007 रोजी सभागृहाच्या प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : तारांकित प्रश्नाची अधिक माहिती पटलावर ठेवण्यात आली.

( प्रेस : येथे अधिकची माहिती छापावी. )

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**अर्धा तास चर्चेची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे**.</u>

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्या,डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेल्या "मिथेनॉलच्या गैरवापरामुळे मानवी जीवनाला निर्माण होणारा धोका" या विषयावरील दिनांक 24 मार्च,2006 रोजी अर्धा तास चर्चेच्या वेळी सभागृहात दिलेले आश्वासन क्रमांक 196 च्या बाबत समितीने केलेल्या शिफारशींबाबत अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

( प्रेस : येथे अधिकची माहिती छापावी. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ विकास महामंडळाचा (नागपूर) सन 2005-2006 चा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : विदर्भ विकास महामंडळाचा (नागपूर) सन 2005-2006 चा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

---------

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन 2006-2007 मधील वितरीत तरतूद व मार्च, 2007 अखेर जिल्हानिहाय तपशील इत्यादी तपशिलासह अनुपालन अहवालाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भातील अनुपालन अहवालाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------------

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचा सन 2000-2001 व 2001-2002 चा अनुक्रमे एकोणतिसावा व तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------------------

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम 2000 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक जमृनो. 1099/ 896/ प्र.क्र.173/ कु.क.3, दिनांकित 20 एप्रिल 2000 सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

--------------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री.मधुकर सरपोतदार (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा अकरावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, हा अहवाल सभागृहाला सादर करीत असतांना या अहवालांतील काही प्रमुख बाबी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

हा अहवाल महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ आणि शिवशाही पुनर्वसन प्रकल्प या महामंडळाच्या कामकाजासंबंधातील आहे. या अहवालात बांधलेली निवासस्थाने पोलीस विभागाला हस्तांतरित करण्यामधील विलंब, पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्यामधील जादा खर्च, अहेरी गडचिरोली येथील निवासस्थानांचे बांधकाम, वर्धा येथील पोलीस निवासस्थानाचे बांधकाम तसेच शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या हस्तांतर योग्य विकास हक्कांची विक्री यासंदर्भातील परिच्छेद असून पहिल्या प्रकरणात बांधलेली निवासस्थाने विभागाला विलंबाने हस्तांतरण केल्यामुळे 31.14 कोटी रुपयांचे व्याजाचे नुकसान महामंडळाला सहन करावे लागले आहे. या प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यात यावी व यापुढे भविष्यात महामंडळाने अधिक सतर्कता धोरण अवलंबिण्यात यावे, अशी समितीने शिफारस केली आहे.

**उपसभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अकरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----------------

..3...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>दिनांक 17 जुलै, 2007 रोजी विधानपरिषद सभागृहातील विद्युत पुरवठा खंडित होणेबाबत माननीय सभापतींचा निर्णय</u>**

**उपसभापती** : मंगळवार, दिनांक 17 जुलै, 2007 रोजी विधानपरिषद सभागृहातील विद्युत पुरवठा दुपारी 3.51 ते 3.54 या कालावधीसाठी खंडित झाल्याप्रकरणी निश्चित वस्तुस्थिती जाणून घेण्याकरिता मी बेस्ट कंपनीचे महाव्यवस्थापक, श्री.खोब्रागडे, सचिव, सार्वजनिक बांधकाम आणि मुख्य अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून अहवाल मागितला. त्यांनी मला पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती कळविली आहे.

मंगळवार, दिनांक 17 जुलै, 2007 रोजी संपूर्ण नरिमन पॉईंट विभागातील वीज पुरवठा बेस्ट कंपनीच्या जॉली चेंबर या उपकेंद्रातील ट्रान्सफॉर्मरमध्ये अचानक झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे बंद पडला. 110 के.व्ही. नरिमन पॉईंट संग्राही केंद्रातील 45 एम.व्ही.ए.क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बंद पडून या परिसरातील वीज पुरवठा खंडित झाला. मात्र त्यानंतर लगेच 3 मिनिटांमध्ये पर्यायी व्यवस्थेने विद्युत पुरवठा पुर्ववत करण्यात आला.

बेस्ट कंपनीचा विद्युत पुरवठा अचानक खंडित झाल्याने विधान भवनात पर्यायी व्यवस्था म्हणून 160 के.व्ही.ची 2 जनित्रे त्वरित सुरु करण्यात आली. मात्र तत्पूर्वी, बेस्ट कंपनीचा विद्युत पुरवठा सुरु झाला. सदर जनित्रे विधान भवनात 1980 सालापासून कार्यरत आहेत व त्यात विद्युत पुरवठा खंडित झाला असता स्वयंचलितपणे विद्युत पुरवठा सुरु करण्याची प्रणाली नाही. (सन 1980 मध्ये ही प्रणाली विकसीत झालेली नसल्यामुळे) त्यामुळे खंडित विद्युत पुरवठा जनित्रामार्फत चालू करण्यास थोडा कालावधी लागला.

सदरहू घडलेली घटना ही पूर्णपणे तांत्रिक असून ट्रान्सफॉर्मरमधील बिघाडामागील कारणे शोधण्याची कार्यवाही बेस्ट कंपनीमार्फत सुरु आहे. तसेच विधान भवनातील जनित्रे स्वयंचलित करण्याबाबतही कार्यवाही करण्यात येईल.

असा प्रकार गत 27 वर्षात प्रथमत: घडला आहे. विधान भवनातील संपूर्ण विद्युत यंत्रणा अद्ययावत करण्यासाठी बेस्ट कंपनी, सार्वजनिक बांधकाम तसेच टाटा व विद्युत मंडळाच्या मुख्य अभियंत्यांची एक तज्ञ समिती नेमण्यात येईल. सदर समिती विधान भवन, मुंबई व नागपूर येथील संपूर्ण विद्युत व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेऊन योग्य त्या उपाययोजना सूचवेल. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---------------- यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचे मुद्दे.**

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, छत्तीसगड राज्यात नॅशनल थर्मल पॉवर कंपनीची यंत्रसामुग्री नेणारा ट्रॉलर जवळ जवळ दोन महिने कसारा घाटामध्ये पडून होता. गंभीर गोष्ट अशी आहे की, ज्यावेळी मोदी सदरकारने विजेसाठी लागणा-या गॅसची पाईप लाईन काही दिवसासाठी अडविली त्यावेळी सभागृहामध्ये गदारोळ माजविण्यात आला होता. छत्तीसगड राज्यातील थर्मल पॉवर प्लँटसाठी ही यंत्रसामुग्री मागविण्यात आली होती. थर्मल पॉवर प्लँटसाठी रशियामधून यंत्रसामुग्री मागविण्यात आली होती. ऑर्डर दिल्यानंतर रशियावरुन ही यंत्रसामुग्री येण्यासाठी साधारणत: चार वर्षे लागतात. एक तर महाराष्ट्र राज्यात लोडशेडींग आहे. या यंत्रसामुग्रीच्या वाहतुकीसाठी सहा कोटी रुपये खर्च झालेला आहे. वास्तविक छत्तीसगड राज्याच्या ग्रिडमधून महाराष्ट्र राज्याला वीज मिळते. महाराष्ट्र शासनाच्या गृह खात्यातील वाहतूक अधिका-यांनी तो ट्रॉलर जाण्यासाठी आम्ही परवानगी देणार नाही, असे आदेश काढले आणि तो ट्रॉलर कसारा घाटामध्ये एका बाजूला उभा करुन ठेवण्यात आला. मला हे मान्य आहे की, या ट्रॉलरमुळे कसारा घाटामध्ये 6-7 तास वाहतुकीवर परिणाम झाला, लोकांना त्याचा त्रास झाला. छत्तीसगडमध्ये भारतीय जनता पार्टीचे राज्य आहे, म्हणून हे आकसाने करण्यात आले आहे काय ? असा प्रश्न निर्माण होतो. मी जी माहिती मिळविली ती माहिती मी जबाबदारीने सभागृहामध्ये सांगतो की, सुमारे 30 ते 35 लाख रुपये वाहतूक विभागाने या कंत्राटदाराकडून घेतले, भ्रष्टाचार केला. हा ट्रॉलर दररोज 10 ते 12 किलोमीटर जाईल, असे वाहतूक विभागाचे अधिकारी सांगू शकत होते. सभापती महोदय, थर्मल पॉवरची यंत्रसामुग्री घेऊन जाणारा ट्रॉलर दोन महिने कसारा घाटामध्ये अडून पडल्यामुळे थर्मल पॉवर प्लँटचे टेम्परेचर कायम ठेवण्यासाठी तेथे कुलर लावण्यात आले होते. आता पावसाळा सुरु झ ाालालेला आहे. कोटयावधी रुपयांची हानी होऊ शकते, असा प्रकार करण्याचे कारण काय ? हे आकसाने केले गेले आहे काय ? उत्तर प्रदेशातील राज्ये या ग्रिडमधून जास्त वीज खेचून घेतात आणि या ग्रिडमधून महाराष्ट्र राज्याला कमी वीज मिळते, यासाठी ती यंत्रसामुग्री मागविण्यात आली होती. विजेचे समन्यायी वाटप व्हावे, सर्व राज्यांना समान वीज मिळावी, यासाठी ती यंत्रसामुग्री मागविण्यात आली होती. छत्तीसगड राज्यातील वीज निर्मिती

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ........

करणा-या थर्मल पॉवर प्लँटसाठी मागविण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीचा ट्रॉलर कसारा घाटामध्ये का अडविण्यात आला ? त्याच्या पाठीमागे कोणाचा हात होता आणि छत्तीगड राज्यामध्ये ती यंत्रसामुग्री नेण्यासाठी त्या ट्रॉलरला शासन केव्हा परवानगी देणार आहे ? सभापती महोदय, यासंदर्भात आपण शासनाला आज किंवा उद्या निवेदन करण्यास सांगावे, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उपसभापती** : यासंदर्भात शासनाने उद्यापर्यंत निवेदन करावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, होय.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, महसूल न्यायाधिकरण मागच्या अनेक वर्षापासून बंद आहे. महसूल न्यायाधिकरण सुरु करण्यासाठी शासनातर्फे हायकोर्टात ॲफिडेव्हिट करण्यात आले त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, एक महिन्याच्या आत म्हणजे चार आठवडयामध्ये आम्ही हे महसूल न्यायाधिकरण सुरु करु. मागच्या नागपूर अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेला उत्तर देतांना माननीय महसूल मंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, महसूल न्यायाधिकरण एक महिन्यात सुरु करण्यात येईल. या एकंदर प्रकरणामध्ये हजारो शेतक-यांच्या शेत जमिनीचे प्रश्न रखडलेले आहेत आणि महसूल न्यायाधिकरण नसल्यामुळे ते रखडलेले आहेत. सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, शासनाने हायकोर्टाला आणि सुप्रिम कोर्टाला जे ॲफिडेव्हिट सादर केलेले आहे आणि सभागृहामध्ये माननीय महसूल मंत्र्यांनी जे आश्वासन दिलेले आहे त्याच्या अधीन राहून शासनाने महसूल न्यायाधिकरण ताबडतोब सुरु करावे व याबाबत सभागृहामध्ये निवेदन करावे, अशी मी शासनाला विनंती करतो.

**उपसभापती** : महसूल न्यायाधिकरण स्थापन करण्याबाबत शासनाने निवेदन करावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, निवेदन करण्यात येईल.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.बोरले 17:15

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मागील वर्षी झालेल्या नागपूर अधिवेशनात एका प्रश्नाला उत्तर देताना माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी सभागृहात सांगितले होते की, आय.सी.एस.ई. व सी.बी.एस.ई. बोर्डाच्या शाळांना मराठी विषय सक्तीचा करण्यात येईल. परंतु मागील शुक्रवारी त्यांनी खालच्या सभागृहात एका प्रश्नावर उत्तर देताना सांगितले आहे की, आय.सी.एस.ई व सी.बी.एस.ई. मध्ये मराठी विषय ऐच्छिक करण्यात येईल. हा विरोधाभास आहे. मंत्री महोदयांनी या सभागृहात पूर्वी आश्वासन दिले होते की, मराठी विषय सक्तीचा करण्यात येईल व आता खालच्या सभागृहात आश्वासन दिले आहे की, मराठी विषय ऐच्छिक करण्यात येईल. मंत्री महोदयांनी दोन्ही सभागृहात परस्परविरोधी स्टेटमेंट केलेले आहे. मी माननीय सभापतींना विनंती करतो की, त्यांनी याबाबत शासनाकडून माहिती मागवावी.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, खालच्या सभागृहात व वरच्या सभागृहात एका प्रश्नावर वेगवेगळे स्टेटमेंट करु नये. या विषयावर शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी उद्या सायंकाळपर्यत सभागृहात खुलासा करावा.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

**पृ.शी.**: अमरावती शहरातील शासकीय गोदामातील धान्याचा घोटाळा

**मु.शी.**: अमरावती शहरातील शासकीय गोदामातील धान्याचा घोटाळा याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "अमरावती शहरातील शासकीय गोदामातील धान्याचा घोटाळा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मी अत्यंत गंभीर विषयाबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. परंतु मंत्री महोदयांचे निवेदनातील उत्तर बघितले तर आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझे प्रश्न असे आहे की, आरोपींवर कोणत्या प्रकारची कारवाई झालेली आहे ? पोलिसांनी गुन्हा रजिस्टर केल्याचे म्हटले आहे परंतु पोलिसांनी आरोपीची कस्टडी घेतली होती का ? कस्टडीमध्ये आरोपींची चौकशी करण्यात आली आहे का ? यावर अद्यापपर्यंत योग्य ती कारवाई झालेली दिसत नाही. आजही तेथील पोलीस धान्य विक्रेत्यावर सातत्याने वॉच ठेवत आहेत. पोलीस केंव्हाही जाऊन त्या दुकानदारांना का त्रास देत आहेत ? प्रमुख आरोपी शेख दादू मन्सूरी असून तो काँग्रेस पक्षाचा पदाधिकारी आहे. त्याला वाचविण्यासाठी हे निवेदन केलेले आहे का ? याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सदरील प्रकरणातील आरोपी कोणत्या पक्षाचा आहे, याची माझ्याकडे माहिती नाही. याबाबत स्थानिक गुन्हे शाखा अमरावती यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वितरीत करण्यात आलेल्या निवेदनाच्या सुरुवातीस म्हटले आहे की, श्री.शेख दादू मन्सूरी हे काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आहेत. मंत्री महोदयांनी सभागृहात येताना याबाबतची सर्व माहिती घेऊन व ब्रिफिंग करुन यायला हवे होते. मंत्री महोदयांनी आता जाहीर करावे की, ते काँग्रेस पक्षाचे सदस्य नाहीत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, श्री.शे्ख दादू मंसूरी हे कोणत्या पक्षाचे पदाधिकारी आहेत, याची माहिती घेऊन सभागृहाला देण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम 93 अन्वये देण्यात आलेली ही सूचना राखून ठेवण्यात यावी, अशी मी विनंती करतो. मंत्री महोदयांनी सभागृहात येताना या विषयाची माहिती घेऊन येणे आवश्यक होते. आता मंत्री महोदयांनी जाहीर करावे की, ते काँग्रेस पक्षाचे सदस्य नाहीत. सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये चर्चा उपस्थित केल्यानंतर अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून उत्तर मिळण्यासाठी पुरेसा वेळ दिलेला आहे. तरीही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही.

.....4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, वितरीत करण्यात आलेल्या निवेदनाच्या सुरुवातीस म्हटले आहे की, "काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी शेख दादू मंसूरी यांच्या अमरावती शहरातील नूरनगर येथील गोदामात दिनांक 13.7.2007 रोजी छापा टाकला आहे".

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये जी सूचना दिलेली होती, त्याच्या सुरुवातीस काँग्रेस पक्षाबद्दल उल्लेख केलेला आहे, परंतु मी केलेल्या लेखी निवेदनात कॉग्रेस पक्षाबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 17:20

श्री. सुनील तटकरे (पुढे चालू..)

सभापती महोदय, ते कोणत्या पक्षाचे सदस्य आहेत याची माहिती घेण्यात येईल. ....

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, तर मग हे निवेदन येथेच रोखून धरण्यात यावे. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या नियमानुसार, कायद्यानुसार मंत्र्यांनी ही सारी माहिती येथे घेऊन यायला पाहिजे होती. आम्ही आमच्या सूचनेमध्येच त्याचा उल्लेख केलेला आहे आणि आपल्या निवेदनामध्ये देखील आपण त्याचा उल्लेख केलेला आहे. तेव्हा तसे नसेल तर आपण तसे जाहीर करावे. खरे तर ही नियम 93 ची नोटीस दिल्यानंतर, योग्य वेळी आम्ही त्यातून माहिती दिल्यानंतर, शासनाकडून आलेल्या निवेदनावर जे प्रश्न सदस्यांकडून विचारले जातील त्याबाबतची माहिती सभागृहापुढे आली पाहिजे. वाटल्यास, आपण हे निवेदन येथेच रोखून धरावे आणि उद्या ही सारी माहिती घेऊन पुन्हा सभागृहापुढे यावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या निवेदनाची सुरूवातच अशी आहे की, कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी असलेले दादू मन्सुरी, त्यांचे अमरावती शहरातील गोदामामध्ये....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सदस्यांनी जी सूचना दिली त्याप्रमाणे निवेदनामध्ये उल्लेख आलेला आहे. मात्र ते कोणत्या पक्षाचे सदस्य आहेत हे त्यातून अभिप्रेत होत नाही....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण हे नेहमीच येथे म्हणत असतो आणि ते सत्य देखील आहे की, गुन्हेगाराला जात नसते, पक्ष नसतो, धर्म नसतो. ... तेव्हा मला वाटते यावर आपले अधिक उपप्रश्न नाहीत. तेव्हा मी पुढील निवेदन चर्चेला घेतो. निवेदन क्रमांक 1 ....

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर आलेलेच नाही. ...

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याची माझी तयारी आहे, ....

( काही सन्माननीय सदस्य घोषणा देतात .... )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर आलेले नाही. असे असता आपण अशा प्रकारे पुढे जाणे योग्य होणार नाही. कृपा करून ...

**उपसभापती** : ठीक आहे. मी आपल्या म्हणण्याखातर या निवेदनावर सदस्यांना एक प्रश्न विचारण्याची संधी देतो. त्यानंतर मात्र मी पुढील निवेदन चर्चेला घेईन.

....... 2डब्ल्यू 2 ....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, त्या आरोपीला पाठीशी घालण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत हे खरे आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, कोणाही आरोपीला पाठीशी घालण्याचा सरकारचा प्रयत्न नाही वा तसा प्रश्नच येत नाही. याबाबतीत आवश्यकता वाटत असेल तर पुन्हा चौकशी करून उचित ती कारवाई करण्यात येईल इतकेच मी सांगू इच्छितो.

*****

....... 2डब्ल्यू 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईच्या पश्चिम उपनगर सांताक्रूझ ग्रीन स्ट्रीट, एसव्ही रोड, सहार रोड येथे करण्यात येत असलेल्या विकास कामामुळे पडलेले मोठ्ठे खड्डे व त्यामुळे होणारा त्रास.

**मु.शी.** : मुंबईच्या पश्चिम उपनगर सांताक्रूझ ग्रीन स्ट्रीट, एसव्ही रोड, सहार रोड येथे करण्यात येत असलेल्या विकास कामामुळे पडलेले मोठ्ठे खड्डे व त्यामुळे होणारा त्रास याबाबत डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

---

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबईच्या पश्चिम उपनगर सांताक्रूझ ग्रीन स्ट्रीट, एसव्ही रोड, सहार रोड येथे करण्यात येत असलेल्या विकास कामामुळे पडलेले मोठ्ठे खड्डे व त्यामुळे होणारा त्रास " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

........2डब्ल्यू .. 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 च्या सूचनेवरील मा.नगरविकास राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर...)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, डिसेंबर 2005 पासून आजपर्यंत हा प्रश्न प्रलंबित आहे. सांताक्रूझ ग्रीन स्ट्रीट वर पाणी साचू नये म्हणून आपण लाखो रूपये खर्च केले आहेत आणि ते सारे पैसे वाया केले आहेत. आज देखील त्या रस्त्यावर 2-2, 3-3 फूट पाणी साचते आहे. कालच जो पाऊस झाला त्यामध्ये देखील तेथे एक फूट पाणी झाले होते. आपण तेथे सर्व केले, नवीन रस्ता केला, पेवमेंट केले, परंतु तरीही पाणी साचते आहे त्याबद्दल आपण काय करणार आहात ? तसेच पीएपीच्या बाबतीत, आपण रस्ता रूंदीकरणाचा प्रस्ताव काढला त्यावेळेस माहिती नव्हते की, किती दुकानदार त्यामुळे बाधित होणार आहेत हे आपल्याला माहिती नव्हते का ? त्याचा अभ्यास आपण केला नव्हता का ? आणि तिसरा प्रश्न असा की, आपण तेथे जे पीएपी करणार आहात तर कोठपर्यात करणार आहात ? म्हणजे ग्राऊंड फ्लोअरपर्यंतच्या लोकांनाच देणार आहात का ? सभापती महोदय, या प्रश्नासंबंधात यापूर्वी माननीय राज्यमंत्र्यांनी देखील हस्तक्षेप केला होता. यासंबंधात त्यांनी 4-5 बैठका घेतल्या होत्या, माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील बैठक घेतली होती. तेव्हा ज्या अधिकाऱ्यांनी यामध्ये चालढकल केली आहे त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ?

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

( यानंतर श्री. सरफरे .... 2एक्स 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी दोन-तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. ग्रीन स्ट्रीट रोडच्या ठिकाणी पाणी साचते. त्यामुळे तेथील नाल्याचे रुंदीकरण करण्याचे मान्य केले आहे. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाकरिता केंद्र सरकारने 1200 कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यामधून उपनगरामधील नाल्यांची वायडनिंग आणि डिपनिंगची कामे हाती घेतली जाणार आहेत. ज्यामुळे निश्चितपणे यापुढे पाणी साचणार नाही अशी व्यवस्था केली जाईल. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी पी.ए.पी. किती दिवसात केले जाणार आहे? असा प्रश्न विचारला आहे. याबाबत संपूर्ण माहिती घेऊन बाधित 165 दुकानांपैकी 10 दुकाने 50 टक्क्यापेक्षा जास्त बाधित होत असल्यामुळे त्यांचे पी.ए.पी. घोषित करुन ती स्थलांतरीत केली जातील. त्यांचे स्थलांतरणाचे काम लवकर केले जाईल. तसेच, त्यांनी तळमजल्याची मागणी केली असेल तर त्यांना तळमजला देण्यासंदर्भात निश्चितपणे सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या जातील. तसेच, या संबंधात काही गोष्टी करण्यास दोन वर्षांचा अवधी कां लागला? याची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, जे दुकानदार बाधित झाले आहेत त्यांना पहिल्या मजल्यावर दुकान देण्याची व्यवस्था करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. परंतु मंत्रिमहोदयांनी सूचना देऊनसुध्दा जे अधिकारी मंत्रिमहोदयांचे ऐकत नाहीत अशा अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रकरणी झालेल्या दिरंगाईबाबत प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेमार्फत चौकशी केली जाईल. आणि या प्रकरणी कारण नसतांना जाणीवपूर्वक उशीर लावला असेल तर संबंधितांविरुध्द निश्चितपणे कारवाई केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमध्ये अनधिकृत प्रेरिकांची नियुक्ती करणे

मु.शी. : स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमध्ये अनधिकृत प्रेरिकांची नियुक्ती करणे याबाबत सर्वश्री. जगदीश गुप्ता, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, यांनी "स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमध्ये अनधिकृत प्रेरिकांची नियुक्ती करणे" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अमरावती जिल्हयामध्ये सन २००६-०७ मध्ये प्रकल्प संचालक, बचत गटाच्या क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संस्था व समाजाला विश्वासात न घेता योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचा विचार न करता प्रेरिकांची नियुक्ती करण्यात आली हे खरे आहे काय? तसेच, या नियुक्त्या आचारसंहिता सुरु असतांना केल्या हे खरे आहे काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, नियम ९३ च्या सूचनेमध्ये आचारसंहितेचा उल्लेख नसल्यामुळे प्रेरिकांच्या नियुक्त्या आचारसंहिता सुरु असतांना केल्या किंवा नाहीत याची माझ्याजवळ आता माहिती नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांना पाहिजे असल्यास याबाबतची माहिती घेऊन उद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही विसंगती मघाशी आपल्या नजरेस आणली तरीसुध्दा आम्हाला न्याय मिळाला नाही. नियम ९३ च्या सूचनेमध्ये उल्लेख न झाल्यामुळे मंत्रिमहोदय प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाहीत. आणि दुसरीकडे निवेदनामध्ये उल्लेख असतांना देखील मंत्रिमहोदय उत्तर देऊ शकत नाही. अशाप्रकारे हे शासन विरोधी पक्षाशी दोन तोंडाने बोलत आहे. याबाबतीत आपणाकडून आम्हाला न्याय मिळावा यासाठी आम्ही आग्रह धरतो. या सरकारकडून स्वपक्षातील लोकांच्या भ्रष्टाचाराला वाचविण्याचा प्रकार होत असेल तर तो आम्ही कां सहन करावयाचा? याकरिता आम्हाला आपणाकडून संरक्षण हवे आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम ९३ अन्वये सूचनेच्या निवेदन क्रमांक तीन बाबत**</u>

**तालिका सभापती :** नियम ९३ अन्वये सूचना क्रमांक तीनच्या निवेदनावर संबंधित मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित झाल्यानंतर चर्चा होईल.

---

पृ.शी. : सरकारी-निमसरकारी कर्मचारी शिक्षक संघटनेच्या मागण्यांवर शासनाने घेतलेला निर्णय

मु.शी. : सरकारी-निमसरकारी कर्मचारी शिक्षक संघटनेच्या मागण्यांवर शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत सर्वश्री. व्ही. यू. डायगव्हाणे, बी. टी. देशमुख, वसंतराव खोटरे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही. यू. डायगव्हाणे, बी. टी. देशमुख, वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी "सरकारी-निमसरकारी कर्मचारी शिक्षक संघटनेच्या मागण्यांवर शासनाने घेतलेला निर्णय" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : अतिशय महत्वाच्या अशा राज्यातील 20-21 लाख कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या संदर्भात दिनांक 5 जून 2007 रोजीच्या पत्रान्वये सरकारी व निमसरकारी कर्मचारी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्राध्यापक दिनांक 24 व 25 जुलै,2007 ह्या दोन दिवशी आणि 28,29 व 30 ऑगस्ट, 2007 ह्या तीन दिवशी लाक्षणिक संप करणार असल्याची नोटीस दिली होती. वर्तमानपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने निवेदन केलेले आहे. त्यामध्ये एक मागणी अंशत: मान्य केलेली आहे. बाकीच्या मागण्यांच्या संदर्भात कोणताही उल्लेख केलेला नाही. खरे तर माननीय वित्त मंत्री किंवा मुख्यमंत्री यांनी उत्तर द्यायला पाहिजे होते. 20 लाख कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, 1 जुलैपासून केंद्र सरकारच्या महागाई भत्त्यामध्ये जी काही वाढ होईल, ती वाढ जशीच्या तशी राज्य सरकारी कर्मचारी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना देऊ, अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली. वर्तमानपत्रामध्ये आलेली बातमी वाचून दाखवितो, " 1 जुलै 2007 पासून केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता लागू करण्यात येईल, असे आश्वासन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी दिले ", हे खरे आहे काय ? असल्यास, त्याप्रमाणे ते केव्हापासून देणार आहात? दुसरा प्रश्न असा की, शिक्षकांच्या संदर्भातील महाराष्ट्र खाजगी शाळा नियमावली 1981 मध्ये जी सुधारणा प्रस्तावित केलेली आहे, या संदर्भात संघटना आणि प्रतिनिधींना विश्वासात घेऊनच सुधारणा करण्यात येईल काय ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांच्या दोन्ही प्रश्नांना उत्तर "होय"असे आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : संघटनेला असे लिहून दिलेले आहे की, या संबंधाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे, त्याप्रमाणे महागाईभत्ता दिला जाईल. माझा प्रश्न असा आहे की, संघटनेचे असे म्हणणे आहे की, 28 महिने निर्णय घेण्यासाठी उशीर केला. त्या 28 महिन्याच्या कालावधीतील थकबाकी देण्याच्या संदर्भात चर्चेमध्ये निर्णय झालेला आहे काय ?

श्री.राजेश टोपे : 28 महिन्याच्या थकबाकीच्या संबंधातील निर्णय झालेला नाही. केंद्र सरकार जसा महागाई भत्ता वाढवेल त्याप्रमाणे राज्य सरकारी, निमशासकीय कर्मचाऱ्याना महागाई भत्ता यापुढे रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टने नाही तर प्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टने दिला जाईल, असा निर्णय झालेला आहे.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ.शी.** : पंढरपूरच्या यात्रेला निघालेल्या भाविकांच्या दिंडीला पंढरपूर-कुर्डूवाडी रस्त्यावरील आढीव गावाजवळ मागून ट्रकने धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात 3 भाविक ठार होणे

**मु.शी.** : पंढरपूरच्या यात्रेला निघालेल्या भाविकांच्या दिंडीला पंढरपूर-कुर्डूवाडी रस्त्यावरील आढीव गावाजवळ मागून ट्रकने धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात 3 भाविक ठार हाणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, यांनी "पंढरपूरच्या यात्रेला निघालेल्या भाविकांच्या दिंडीला पंढरपूर-कुर्डूवाडी रस्त्यावरील आढीव गावाजवळ मागून ट्रकने धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात 3 भाविक ठार हाणे", या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, टेम्पो, ट्रकच्या अपघाताच्या संबंधात वर्णन केलेले आहे. निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "भरधाव वेगात जाणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल आहेत..." सभापती महोदय, मी यापूर्वीच औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला होता. दोन घटना घडलेल्या आहेत. एका घटनेमध्ये टेम्पो आणि एस.टीच्या अपघातामध्ये दोनजण ठार आणि 23 जण जखमी झालेले आहेत, 25 जुलै रोजी मुख्यमंत्री महोदयांचे पंढरपूर येथे आगमन इ ाालेले असताना, विजयदूर्ग-पंढरपूर या बसखाली एक वारकरी चिरडून ठार झालेला आहे. माझा प्रश्न असा आहे की,या अपघातामध्ये ज्यांचे मृत्यू झालेले आहेत, त्यांच्या विम्याच्या संदर्भाने, कुटुंबियांना मदत, नुकसानभरपाई देण्याच्या संबंधात कोणती पावले उचललेली आहेत ? या पंढरपूरच्या यात्रेसाठी पोलीस पुरेसे नाहीत, असे वाटत असेल या पुढे वारीला पोलिसांचा फौजफाटा वाढविणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलला होत, परंतु त्या ठिकाणी 12-13 लाख भाविक आलेले होते, त्या मानाने पोलीस बंदोबस्त कमी वाटत होता. त्या ठिकाणी दोन घटना घडल्या. त्यामध्ये मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना मुख्यमंत्री निधीतून मदत करण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : आमच्या माहिती प्रमाणे पंढरपूरला 10 हजारपेक्षा जास्त भाविक दर महिन्याच्या एकादशीला येत असतात. आषाढी एकादशी किंवा कार्तिकी एकादशी नसताना सुध्दा दर महिन्याला मोठ्या प्रमाणावर भाविक येत असतात. माननीय मंत्रिमहोदय सोलापूर जिल्ह्यातील आहेत. पंढरपूरकडे जाणारे सर्व मार्ग अपघातापासून मुक्त होण्याच्या दृष्टीने आताचा पोलीस फोर्स पुरेसा नाही. त्यामुळे ज्यामध्ये जास्त प्रमाणामध्ये पोलीस अधिकारी असतील असे खास झोन पंढरपूर परिक्षेत्रासाठी तयार करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

**पृ. शी.** : मुंबईतील वांद्रे पूर्व येथील म्हाडा इमारतीमधील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयात लागलेली आग

**मु. शी.** : मुंबईतील वांद्रे पूर्व येथील म्हाडा इमारतीमधील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयात लागलेली आग याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर सन्माननीय सदस्यांनी "मुंबईतील वांद्रे पूर्व येथील म्हाडा इमारतीमधील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयात लागलेली आग" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री. रामनाथ मोते )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संदर्भातील 11 प्रकरणांची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत सुरु आहे त्याचे काय झाले याबाबतचे उत्तर या निवेदनामध्ये दिलेले नाही. या 11 प्रकरणांची चौकशी पूर्ण झाली काय ? यासबंधी कोणाला दोषी पकडण्यात आले आहे काय ? त्याचे पुढे काय झाले ? जी आग लागली त्याबाबत प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत यामध्ये घातपाती प्रकार नाही, कोणतीही कागदपत्रे हरवलेली नाहीत किंवा भिजलेली नाहीत, चौकशी करीत आहोत असे उत्तर दिलेले आहे. परंतु झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संदर्भातील ज्या 11 प्रकरणांची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे करण्यात आली त्याबाबत काय झाले ? त्यामध्ये कोणते निष्कर्ष आले ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : याबाबतीत चौकशी चालू आहे.

श्री. मधुकर चव्हाण : चौकशी केव्हा पूर्ण होणार आहे ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : अद्याप त्याची पूर्ण चौकशी झालेली नाही.

श्री. मधुकर चव्हाण : शासनाने एस.आर.ए. योजनेमधील 11 प्रकरणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रेफर केली होती त्याचे काय निष्कर्ष आले ? किती लोकांना अटक करण्यात आली.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : आता माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही.

श्री. मधुकर चव्हाण : मंत्रिमहोदयांकडे माहिती नाही म्हणजे काय ? सभापती महोदय, उद्या हे निवेदन पुन्हा घ्यावे. हे निवेदन राखून ठेवावे.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी संबंधित माहिती विचारलेली आहे. या ठिकाणी ही सूचना स्वीकारल्यानंतर सूचनेमध्ये तो मुद्दा आलेला आहे. संपूर्ण मुंबईतील झोपडपट्टीतील 11 प्रकरणांची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सुरु आहे ती माहिती अधिकाऱ्यांनी दिली पाहिजे. मी लेखी न देता व्हेग प्रश्न विचारलेला नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात माझी विनंती राहील की, सन्माननीय सदस्यांनी जी अतिरिक्त माहिती या ठिकाणी मागितलेली आहे त्यासंदर्भात उद्या अधिक माहितीसह निवेदन करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : ठीक आहे.

----

RDB/ KGS/ MAP

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये केलेल्या निवेदनाच्या संदर्भात अधिक माहिती देणे

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 2 च्या अनुषंगाने एक माहिती द्यावयाची होती. ती माहिती उद्या देण्याच्या ऐवजी आता माझ्याकडे उपलब्ध आहे. ती माहिती मी आता देऊ इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : आचारसंहितेमध्ये जागा भरल्या गेल्या काय याबाबत मी विचारणा केली होती.

श्री. रणजित कांबळे : प्रेरिकांची नेमणूक 1 एप्रिलला झालेली आहे. आचारसंहिता 17 मार्चपर्यंत होती. 1 एप्रिलला त्यांची नियुक्ती झालेली आहे.

---

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामधील तंत्रनिकेतनच्या प्रवेश क्षमतेत करण्यात आलेली घट

**मु. शी.** : वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामधील तंत्रनिकेतनच्या प्रवेश क्षमतेत करण्यात आलेली घट याबाबत प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी "वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयामधील तंत्रनिकेतनच्या प्रवेश क्षमतेत करण्यात आलेली घट" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, नियम 93 ची सूचना देणारे सन्माननीय सदस्य अनुपस्थित असले तरी नियम 93 अन्वये असलेल्या आठव्या निवेदनाबाबत मी सांगू इच्छितो. वॉलचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या संदर्भातील उत्तर सभागृहासमोर आले पाहिजे. त्यांच्या संदर्भातील जी इन्टेक कॅपॅसिटी कमी केली होती ती रिस्टोअर केलेली आहे. त्यामुळे तो प्रश्न आता शिल्लक राहिलेला नाही.

-----

...7....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

**पृ. शी.** : मुंबई विद्यापीठातून प्रथम श्रेणीत बी.एस्सी. परीक्षा उत्तीर्ण केलेल्या कु. वर्षा पाटील या अपंग मुलीवर विद्यापीठाकडून झालेला अन्याय

**मु. शी.** : मुंबई विद्यापीठातून प्रथम श्रेणीत बी.एस्सी. परीक्षा उत्तीर्ण केलेल्या कु. वर्षा पाटील या अपंग मुलीवर विद्यापीठाकडून झालेला अन्याय याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी "मुंबई विद्यापीठातून प्रथम श्रेणीत बी.एस्सी. परीक्षा उत्तीर्ण केलेल्या कु. वर्षा पाटील या अपंग मुलीवर विद्यापीठाकडून झालेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : अपंगांच्या बाबतीत हे शासन किती संवेदनशील आहे हे नियम 93च्या सूचनेवरील निवेदनावरुन दिसून येते. ही सूचना दिली नसती तर या गंभीर प्रकरणाकडे शासनाचे लक्ष गेले नसते. दिनांक 23.7.2007 रोजी ही सूचना दिली. त्यानंतर 25 जुलैला या प्रकरणी शासनाने चौकशी केली. कु. वर्षा पाटील ही अपंग विद्यार्थीनी असून तिने अकार्बनी रसायनशास्त्र या अभ्यासक्रमासाठी एम.एससी, पार्ट-वनसाठी पहिले प्राधान्य ईस्माईल युसूफ कॉलेज, दुसरे प्राधान्य विल्सन कॉलेज आणि तिसरे प्राधान्य महर्षी दयानंद कॉलेज असे दिले असताना तिचे पहिल्या आणि दुस-या यादीमध्ये नाव लागले नाही. तिस-या यादीमध्ये तिचे नाव लागले. तिने तिसरा प्राधन्य क्रमांक दिलेल्या महर्षी दयानंद कॉलेजप्रमध्ये तिला प्रवेश देण्यात आला. ही विद्यार्थीनी अपंग आहे. तिच्यावर अन्याय झालेला आहे. निवेदनामध्ये असे नमूद केलेले आहे की, कु. वर्षा पाटील या अपंग विद्यार्थीनीने अपंगासाठी असलेल्या राखीव कोट्यातून प्रवेश मिळण्यासाठी अर्ज केला असता, अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, 1995 नुसार अपंगासाठी 3 टक्के जागा राखीव ठेवण्याचे शासनाचे धोरण असतानाही तसेच एम.एससी भाग-1 प्रवेशाकरिता कु. वर्षा पाटील ह्या फक्त एकाच अपंग विद्यार्थीनीकडून अर्ज प्राप्त झाला असतानाही, मुंबई विद्यापीठाने कु. पाटील हिने अपंग आरक्षणाबाबतच्या केलेल्या दाव्याची दखल न घेऊन संबंधित विद्यार्थीनीवर अन्याय केला आहे ही वस्तुस्थिती आहे. शासनाने याप्रकरणी चूक झाल्याचे मान्य केलेले आहे. तेव्हा या प्रकरणी जे कोणी दोषी असतील, ज्यांनी या अपंग मुलीवर अन्याय केलेला आहे, त्यांच्यावर हे अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई केली जाईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी प्रश्न विचारताना शासनावर आरोप केले आहेत. मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासन आणि मुंबई विद्यापीठ या दोन वेगवेगळ्या एण्टीटीज आहेत. मुंबई विद्यापीठ ही स्वायत्त संस्था आहे. ॲडमिशन प्रोसिजरमध्ये झालेली चूक ही मुंबई विद्यापीठाच्या केमिस्ट्री विभागाच्या ॲडमिशन कमिटीने केलेली आहे आणि विद्यापीठाने ते मान्य केलेले आहे. ही चूक झाल्याचे निवेदनामध्ये मान्य केलेले आहे. आता त्या विद्यार्थीनीला इस्माईल युसूफ कॉलेजमध्ये ॲडमिशन दिलेली आहे. या प्रकरणी 25 जुलैला मुंबई विद्यापीठाला पत्र लिहून रिपोर्ट मागविला, 27 जुलैला दुसरे पत्र लिहिल्यानंतर त्यांचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुरेश शेट्टी....)

रिपोर्ट आला. ॲडमिशन प्रोसेसमध्ये ज्या कोणी अधिका-यांनी चूक केली असेल त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : या प्रकरणी कारवाई करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. 1995च्या अधिनियमाप्रमाणे 3 टक्के जागा अपंगासाठी राखून ठेवायला पाहिजेत. म्हणजे 800 पैकी 24 जागा अपंगासाठी राखून ठेवायला पाहिजेत. या प्रकरणामध्ये एकाच अपंग विद्यार्थीनीने अर्ज केलेला होता. मुंबई विद्यापीठाने तिचा दावा विचारात घेतला नाही असे निवेदनामध्येही नमूद करण्यात आलेले आहे. या प्रकरणी जे कोणी जबाबदार आहेत त्यांच्यावर किती दिवसात कारवाई करण्याचे आदेश मंत्री महोदय देतील ? तसेच या कारवाई बाबतची माहिती पुढच्या अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यामध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : मुंबई विद्यापीठाकडून रिपोर्ट सादर झाल्यानंतर ताबडतोब कारवाई केली जाईल आणि त्याचा अहवाल पुढच्या अधिवेशनामध्ये पटलावर ठेवण्यात येईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील गोरेगाव आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यातील बालके कुपोषणाच्या तिस-या टप्प्यावर असणे

**मु. शी.** : मुंबईतील गोरेगाव आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यातील बालके कुपोषणाच्या तिस-या टप्प्यावर असणे याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हर्षवर्धन पाटील (महिला व बाल विकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "मुंबईतील गोरेगाव आरे वसाहतीतील आदिवासी पाडयातील बालके कुपोषणाच्या तिस-या टप्प्यावर असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आजपर्यन्त कुपोषण हे मेळघाट, चिखलदरा, नंदूरबार, मोखाडा या आदिवासी भागात पहायला मिळत होते. गेल्या वर्षी भांडूपमध्येही कुपोषण पहायला मिळाले.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.........

त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी त्यासंदर्भात फार मोठी परिषद घेतली होती आणि फार मोठमोठया घोषणा देखील केल्या होत्या. दुर्देवाने त्यांनी आम्हाला सदर परिषदेला बोलाविले नव्हते, परंतु आम्ही त्यासंदर्भात जे वाचले ते सांगत आहे. या निवेदनामध्ये त्यांनी चक्क डिनाय केलेले आहे की, माहे जून,2007 मध्ये आरे कॉलनीच्या परिसरात श्रेणी - 3 मध्ये 3 बालके व श्रेणी - 4मध्ये एक बालक असल्याचे आढळून आले, याचे आपण पुर्नसर्वेक्षण करणार का ? कारण येथे श्रेणी दोन मध्ये तीन बालके आहेत, ते श्रेणी तीनमध्ये जाऊ शकतात आणि श्रेणी तीन मध्ये जी बालके आहेत, ती श्रेणी चारमध्ये जाऊ शकतात, अशी वस्तुस्थिती आहे. आपण याचे फेर सर्वेक्षण करणार आहात का ? आणि सदर सर्वेक्षण किती कालावधीमध्ये करण्यात येईल ? असा माझा प्रश्न आहे. आपण गेल्यावर्षी कुपोषित बालकांसाठी 12 कोटीचे एक औषध खरेदी केले होते, ते येथे पोहोचविले गेले का ? या विषयावरती मुंबई महानगरपालिकेचे श्री.किशोर गजभिये यांना घेऊन एप्रिल महिन्यामध्ये एक बैठक झाली होती,त्या बैठकीला आम्हीही हजर होतो. आरे कॉलनीतील पाण्याच्या संदर्भामध्ये ज्यावेळी असे सांगितले होते की, आदिवासी विभागाकडून काही अनुदान येते हे अनुदान सदर आदिवासी पाडयाला लागू केले गेले नाही, ही गोष्ट खरी आहे का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सर्वेक्षणाच्या बाबतीमध्ये मागच्या तीन दिवसांपूर्वी माझ्या दालनामध्ये या संदर्भात एक बैठक झाली होती. सर्वेक्षण करण्याकरिता म्हणून मी सी.डी.पी.ओ. त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेची एक यंत्रणा आणि आरोग्य विभाग यांच्या सहाय्याने या सगळयांचे पुन्हा सर्वेक्षण केले जाईल आणि तातडीने सर्वेक्षण करुन वस्तुस्थिती सादर करुन शासन पुढची कार्यवाही केली जाईल. सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा होता की, आय.सी.डी.एस.कमिशनर च्या माध्यमातून जे सिरप निर्माण झाले, त्याच्यामध्ये या परिसरामध्ये या संदर्भामधील माहिती उपलब्ध करुन जो काही पुरवठा केला त्याची माहिती देण्यात येईल. सन्माननीय सदस्यांचा तिसरा प्रश्न असा होता की, आदिवासी विभागाकडून जे अनुदान येते, ते 27 जे पाडे आहेत आणि त्याचप्रमाणे त्या आदिवासी भागामध्ये एकही प्रायव्हेट किंवा महानगरपालिकेची जागा नाही. सदर बैठकीत ठरले होते की, महसूल विभागाकडून तेथील जर काही जागा रस्ते बांधण्यासाठी किंवा ड्रेनेज करण्याकरिता उपलब्ध करुन घेण्याबाबत चर्चा झाली. सदर मिटींगमध्ये श्री.किशोर गजभिये देखील उपस्थित होते. याकरिता आम्ही पाच अधिका-यांची एक कमिटी गठित

3B - 2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील......

केली होती व त्या कमिटीवर सचिव,आदिवासी विकास विभाग यांची देखील नेमणूक केली होती. आदिवासी विभागाकडून जे बजेट येईल त्याचा काही हिस्सा विकास कामांकरिता आपण खर्च करतो.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये मी व सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत कुपोषणावर प्रश्न विचारीत असतो, परंतु प्रत्येक वेळेस आम्हाला जे उत्तर मिळते त्या उत्तराच्या शेवटी हे वाक्य नेहमी असते की, शासनाने कुपोषणाच्या प्रश्नावर एक समिती गठित केलेली आहे. आतापर्यंत कुपोषणाच्या प्रश्नावर किती समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत ? आणि या सर्व समित्यांचे संनियंत्रण करण्याकरिता अजून एक समिती गठित करण्यात येणार आहे का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एखाद्या प्रश्नावर समिती गठित करणे म्हणजे तो प्रश्न प्रलंबित ठेवणे असा त्याचा अर्थ होत नाही. हा प्रश्न काही एका विभागाचा नाही कारण मुंबईमध्ये स्लम एरियामध्ये देखील मोठया प्रमाणात कुपोषणाचे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. आपण यापूर्वी केवळ आदिवासी विभागाबाबतच कुपोषणाच्या प्रश्नाचा विचार करीत होतो. परंतु आता शहरामध्ये देखील कुपोषणाचा प्रश्न उपस्थित होत आहे, त्याचे उच्चाटन करण्याकरिता ही समिती गठित केलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : माझा प्रश्न एवढाच आहे की, आपण यासंदर्भातील सगळी माहिती देण्यात येईल, असे सांगितले. मी माननीय मंत्रिमहोदयांना या अधिवेशनाच्या सुरुवातीला एक पत्र दिले होते की, आपण जे 12 कोटी रुपयाला माल्ट खरेदी केले त्यामध्ये कुपोषित बालकांना आवश्यक ती पोषक तत्वे त्यात नाहीत आणि तरीदेखील तेच माल्ट पुन्हा कुपोषित बालकांना देणार आहात, असे समजते. जर मी त्यासंबंधात आपल्याला पत्र दिलेले आहे तर मला त्यासंबंधातील सर्व माहिती मिळावयाला पाहिजे. जे जीवनावश्यक किंवा कुपोषित बालकांना जे आवश्यक घटक आहेत, ते या माल्टमध्ये नाही ही गोष्ट खरी आहे का ? माझे पत्र आपल्याला मिळाल्यानंतर आपण हे तपासून पाहिले का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सभागृहातच मला पत्र दिले होते. ते पत्र प्राप्त होताच, मी कमिशनर,आय.सी.डी.एस.यांना कळविले





JPK/ KGS/ MAP प्रथम श्री.शिगम एम. ........ 17:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.......

आहे.  त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,मागील आठवडयात श्री.दयानंद चव्हाण या विद्यार्थ्याच्या संदर्भात मी प्रश्न उपस्थित केला होता, त्यावेळी मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते की, नियम 8 ( 4) अनुसार कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले असून पाच दिवसात शासन यावर निर्णय घेईल.  आज या गोष्टीला आठ दिवस झालेले आहेत अजून कारवाई झालेली दिसत नाही.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शासनाने या विषयाच्या संदर्भात समिती नेमली आहे त्या समितीचा अहवाल आल्यानंतर सभागृहास माहिती सादर केली जाईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**तालिका सभापती** ( श्री. रामनाथ मोते ) : माननीय सदस्य ॲड.अनिल परब, डॉ. नीलम गोऱ्हे, यांनी "सोलापूर येथील डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नेत्र शल्यचिकित्सेचे पदव्युत्तर शिक्षण (एम.एस.) घेणाऱ्या डॉ. दिग्विजय पाटील या डॉक्टराने सहाय्यक प्राध्यापिकेसह तेथील चार विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून दि. 26.7.07 रोजी केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान धोरणानुसार सिडकोने वाशी स्टेशनजवळ सेक्टर 30-अे येथील भूखंडावर इंटरनॅशन इन्फोटेक पार्क तयार केलेले असून त्यास वीज,दूरसंचार व डाटा कनेक्टीव्हीटी इ. सोई-सुविधा पुरविण्यात येणे, माहिती व तंत्रज्ञान या वापरासाठी भूंखंड वाटप केलेल्या कंपन्यांनी सदर भूखंडावर पूरक सेवेच्या वापरास परवानगी मिळण्याची केलेली विनंती" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा 1954 व अन्न भेसळ प्रतिबंधक नियम 1955 मधील नियम 62 च्या तरतुदीनुसार मॅग्नशियम कार्बोनेट हा पदार्थ कोणत्याही अन्न पदार्थात वापरावयाची परवानगी नसताना गुटख्यावर बंदी असताना देखील या पदार्थाचा गुटख्यामध्ये चव येण्यासाठी सर्रास वापर सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

यानंतर सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, श्रीकांत जोशी यांनी "राज्यातील सहा प्रशासकीय विभागात येणाऱ्या 35 जिल्हयातील एकूण 325 तालुक्यात शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत स्टीलच्या थाळयांचे वितरण करण्यात येणे. या थाळीची खुल्या बाजारात किंमत 120/- ते 140/- रु. असताना 111/- रु. प्रति नग विकत घेण्यात येणे. या थाळी विक्री प्रकरणात मोठा गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येणे" या विषयावर नियम 93





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**...........

अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, रामनाथ मोते, पाशा पटेल, श्रीकांत जोशी, गुरुमुख जगवानी "मुंबईतील धारावीमध्ये मोठया प्रमाणावर लघुउद्योग, चर्मउद्योग चालू असणे, धारावी पुर्नविकासाच्या नावावर सदर उद्योग बंद होऊ नये म्हणून त्या लोकांसाठी नवीन सर्व्हे करुन त्याऐवजी पर्यायी व्यवस्था करणे, या लघुउद्योजकांना पुर्नविकास करताना विश्वासात न घेतल्याने त्यांचा विरोध असणे, सदर उद्योगधंदे बंद होणार असल्याने त्यांचा रोजीरोटीचा प्रश्न निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

यानंतर डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दि. 29.07.07 रोजीच्या सुमारास हॉट परिडॉट कॉम व डेम्स एन डिझायर्स या वेबसाईटमार्फत देहव्यापाराचे स्वरुप नागपूर ग्रामीण पोलिसांनी उघड करणे. तसेच कुंटणखान्याच्या माध्यमातून पारंपारिक देह व्यवसाय करणाऱ्या वारांगनांनीही सायबर देह व्यवसाय सुरु केला असणे, या वेबसाईटचे लक्ष महाविद्यालयीन युवक/युवती होत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

यानंतर सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी यांनी "शहापूर तालुक्यातील सापगाव येथील लिबर्टी ऑईल मिलचे दूषित पाणी भातसा नदीच्या पात्रात सोडल्याने नागरिकांच्या आरोग्याला निर्माण झालेला गंभीर धोका, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेने नदीच्या पात्रातील पाण्याची चाचणी घेऊन भातसा नदीचे दूषित पाणी पिण्यासाठी अयोग्य असल्याचा अहवाल एक वर्षापूर्वी दिलेला असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, पाशा पटेल, श्रीकांत जोशी, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता, गुरुमुख जगवानी यांनी "नागपूर येथील सुरु असलेल्या मिहान कार्गो

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**..........

प्रकल्पात वॉटर ट्रिटमेंट प्लांटच्या खोदकामासाठी करण्यात आलेल्या प्रचंड स्फोटामुळे खुशबू चंद्रशेखर झरिया या सहा वर्षाच्या बालिकेचा जागीच मृत्यू होणे तसेच शासनाने उक्त प्रकल्पाकरिता नागपूर शहरालगत शेतजमिनी भूसंपादित केल्या असून सदर जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना अत्यंत अल्प दरात दिला असल्याने शेतकऱ्यांनी या प्रकल्पाकरिता शेतजमिनी देण्यास विरोध केल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

यानंतर सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे यांनी "चंद्रपूर जिल्हयातील खाजगी व शासकीय आश्रमशाळातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा आहार मिळत असल्याने त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होणे, नियमित वैद्यकीय उपचार न मिळणे, 25 टक्के शाळांमध्ये वीज पुरवठा नसणे तसेच शासनाने मंजूर केलेल्या निधीचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी होत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने या सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निदेश देतो.

इतर सूचनांना दालनातच अनुमती नाकारली आहे.

---------

(नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी प्रश्न विचारण्यासाठी उभे असतात)

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : माननीय सभापतींनी सूचित केले आहे की, सन्माननीय सदस्य सर्वश्री धोंडिराम राठोड व इतर यांचा म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावावरील चर्चा उद्या सकाळी 9.45 ते 12.15 या वेळेत घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता भरेल. यासाठी सभागृहाची अनुमती आहे का?

अनेक सन्माननीय सदस्य : होय.

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेतील उर्वरित कामकाज पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव चर्चेला उद्या घेण्यात येणार आहे, तो सत्ताधारी पक्षाकडून मांडण्यात आलेला आहे. त्यामुळे उद्या सकाळी सभागृहात गणपूर्ती राखण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे याची त्यांना समज देण्यात यावी.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना आणि अर्धातास चर्चेच्या सूचना पुढे ढकलण्यात येणार असल्या तरी त्यावर चर्चा केव्हा घेण्यात येईल?

**तालिका सभापती** : या संदर्भातील निर्णय माननीय सभापती घेतील.

सभा□ृहापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक -३१ जुलै, 2007 रोजी साळी 9.45 ते 12.15 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल व सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता पुन: भरेल.

( सभा□ृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 56 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 31 जुलै, 2007 च्या सकाळी 9.45 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही